सोलापूर

SOLAPUR TARUN BHARAT

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | गुरुवार, ११ जून २०२६ | वर्ष ४ थे अंक ९४ | पाने १२ | किंमत रु. ८/- | RNI No. MAHMAR/2023/86468 | Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### मणिपूरच्या मुख्यमंत्र्यांनी घेतली नितीन गडकरींची भेट

**इम्फाळ :** मणिपूरचे मुख्यमंत्री वाय. खेमचंद सिंह यांनी बुधवारी नवी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली आणि राज्यातील प्रमुख राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांच्या (यामध्ये इम्फाळ-जिरीबाम आणि इम्फाळ-दिमापूर रस्त्यांचा समावेश आहे) प्रगतीबाबत चर्चा केली. गडकरी यांच्या अधिकृत निवासस्थानी झालेल्या या बैठकीदरम्यान, मुख्यमंत्र्यांनी मणिपूरमधील प्रस्तावित एलिव्हेटेड हायवे (उंच पुलावरून जाणारा महामार्ग) प्रकल्पाला लवकरात लवकर मंजुरी मिळावी, अशी विनंतीही केली. केंद्रीय मंत्र्यांनी राज्याच्या या विनंत्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला, असे निवेदनात म्हटले आहे. नोनी जिल्ह्यातील जमिनीच्या मोबदल्याशी संबंधित प्रश्न सुधारित सर्वेक्षण आणि राज्य मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतर सोडवण्यात आले आहेत आणि या प्रकल्पाचे कामही सुरू झाले आहे, अशी माहिती राष्ट्रीय महामार्ग-३७ (इम्फाळ-जिरीबाम रस्ता) बाबत, सिंह यांनी गडकरी यांना दिली. कांगपोकपी जिल्ह्यातील समस्यांचे निराकरण करण्यात आले आहे आणि राज्य मंत्रिमंडळाने एका विशेष पॅकेजला मंजुरी दिली आहे, असे इम्फाळ-दिमापूर महामार्गाबाबत मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

जमिनीशी संबंधित समस्यांचा फटका अजूनही इम्फाळ-उखरुल-जेसामी महामार्ग प्रकल्पाला बसत आहे आणि यावर लवकरात लवकर तोडगा काढण्यासाठी राज्य सरकार संबंधित घटकांशी चर्चा करत आहे, असेही निवेदनात नमूद करण्यात आल्याचे सिंह यांनी केंद्रीय मंत्र्यांना सांगितले.




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वाधिक काळ सत्तेवर राहण्याचा पंडित जवाहरलाल नेहरु यांचा ४३९८ दिवसाचा विक्रम मोडल्याबद्दल तसेच मोदी सरकारला १२ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल रालोआच्या आज दिल्लीत झालेल्या बैठकीत मोदी यांचे जोरदार स्वागत आणि अभिनंदन करण्यात आले. यावेळी केंद्रीय मंत्रिमंडळातील सदस्य आणि 'रालोआ'चे नेते उपस्थित होते.

# रालोआच्या बैठकीत पंतप्रधान मोदी यांचे अभिनंदन

## ३५ पक्षांचे जवळपास ७५ नेत्यांची उपस्थिती; घेतला झालमुडीचा स्वाद

**नवी दिल्ली, १० जून**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वाधिक काळ सत्तेवर राहण्याचा पंडित जवाहरलाल नेहरु यांचा ४३९८ दिवसाचा विक्रम मोडल्याबद्दल तसेच मोदी सरकारला १२ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल रालोआच्या आज दिल्लीत झालेल्या बैठकीत मोदी यांचे जोरदार स्वागत आणि अभिनंदन करण्यात आले.

'भारत मंडपम्'मध्ये भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या रालोआच्या या बैठकीत केंद्रीय मंत्री, रालोआतील सर्व घटकपक्षांचे नेते आणि भाजपा तसेच रालोआशासित राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते.

या बैठकीत पंतप्रधान मोदी यांचे अभिनंदन करणारा प्रस्ताव तेलगू देसमचे नेते आणि आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी मांडला. या प्रस्तावाला नागालॅण्डचे मुख्यमंत्री नेफ्यु रियो यांनी अनुमोदन दिले. एकमताने हा प्रस्ताव पारित करण्यात आला.

### मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे, पवारांची उपस्थिती

उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी, बिहारचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी, आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार,गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्यासह अनेक भाजपाशासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री उपस्थित होते.

या बैठकीसाठी मोदी यांचे सभागृहात आगमन होताच उपस्थित सर्व केंद्रीय मंत्र्यांनी तसेच रालोआ आणि भाजपाशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी आपल्या जागेवर उभे होत आणि टाळ्या वाजवत मोदी यांचे स्वागत केले, तसेच मानवंदना दिली. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला रालोआतील ३५ पक्षांचे ७५ नेते उपस्थित होते. यात तेलगू देसमचे चंद्राबाबू नायडू, जदयुचे नितीशकुमार, केंद्रीय मंत्री आणि हमचे जितनराम मांझी, तेलगू देसमचे राममोहन नायडू, जदयुचे राजीवरंजनसिंह, जनता दल धर्मनिरपेक्षचे एच.डी. कुमारस्वामी, अपना दलच्या अनुपप्रिया पटेल यांच्यासह अनेक नेत्यांचा समावेश होता.

भारत मंडपममध्ये होत असलेल्या या बैठकीच्या ठिकाणी पश्चिम बंगालमधील निवडणूक फिरवणाऱ्या चर्चित अशा झालमुडीचा स्टॉल लावण्यात आला होता. पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांनी या स्टॉलवर पंतप्रधान मोदी यांना झालमुडी खाऊ घातली.

बैठकीला संरक्षण मंत्री राजनाथसिंह, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, गृहमंत्री अमित शाह, आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा, कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान, वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल, रेल्वे आणि माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासह भाजपाचे सर्व प्रमुख मंत्री उपस्थित होते.


### केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत पंतप्रधान मोदींना मानवंदना

निर्वाचित पंतप्रधान म्हणून पंडित जवाहरलाल नेहरु यांचा विक्रम मोडल्याबद्दल तसेच मोदी सरकारला १२ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अभिनंदनाचा विशेष प्रस्ताव पारित करण्यात आला. बुधवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी पंतप्रधान मोदी यांचे सभाकक्षात आगमन होताच उपस्थित सर्व मंत्र्यांनी उभे होत आणि टाळ्या वाजवत त्यांचे उत्स्फूत स्वागत केले. १२ वर्षाच्या उपलब्धीसाठी मोदी यांना एकप्रकारे मानवंदना देण्यात आली. मोदी यांच्या कार्यशैलीची प्रशंसा करतांना या प्रस्तावातून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

*(वृत्तसंस्था)*

### मंदिरात केली पूजा

भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्यासह भाजपाच्या अनेक केंद्रीय मंत्र्यांनी आणि नेत्यांनी राजधानीतील विविध मंदिरात जात पूजाअर्चा आणि आरती केली. नितीन नवीन यांनी झेंडेवाला देवी मंदिरात जात दर्शन घेतले. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोधीरोडच्या साईमंदिरात दर्शन घेत आरती आणि पूजा केली.



# मुंबई-पुणे महापौर कार्यालयासह संघ मुख्यालय उडविण्याची धमकी

## ● महाराष्ट्रात सुरक्षा यंत्रणा हाय अलर्टवर ● संवेदनशील ठिकाणी कडेकोट बंदोबस्त

**मुंबई, १० जून**

मुंबई आणि पुणे महापौर कार्यालयांच्या अधिकृत ई-मेल पत्त्यावर थेट बॉम्बस्फोटाची धमकी देणारा संदेश प्राप्त झाल्याने राज्यभरात खळबळ उडाली आहे. केवळ इतकेच नव्हे तर नागपूर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय उडवण्याच्या धमकीचा मेल महापौर नीता ठाकरे यांना प्राप्त झाला. या धमकीच्या ई-मेल्सची दखल घेत राज्यातील सुरक्षा यंत्रणांना तत्काळ अतिसतर्कतेचा इशारा देण्यात आला असन, सर्वच संवेदनशील ठिकाणी कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

या धमकीच्या ई-मेलमध्ये मुंबईच्या महापौर रितू तावडे यांच्या कार्यालयासह त्यांच्या वाहनाला, पुणे महापौर कार्यालयाला आणि नागपूरमधील काही प्रमुख ठिकाणांना आणि विशेषतः रा.



स्व. संघाच्या मुख्यालयाला लक्ष्य करण्याचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. ही माहिती समोर येताच पोलिस प्रशासन, बॉम्ब शोधक व नाशक पथक आणि सायबर गुन्हे शाखेच्या पथकांनी तातडीने धाव घेत तपास यंत्रणांना सक्रिय केले आहे सुरक्षा अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या ई-मेलमध्ये संबंधित सर्व ठिकाणांवर आयईडीच्या साहाय्याने भीषण हल्ला करण्याची योजना असल्याचा दावा करण्यात आला होता.

इतकेच नव्हे तर, धमकी देणाऱ्या अज्ञात व्यक्तीने या कथित हल्ल्यासाठी काही विशिष्ट तारखा आणि वेळेचाही उल्लेख संदेशात केला आहे. ई-मेल मिळताच खबरदारीचा उपाय म्हणून नमूद केलेल्या सर्वच ठिकाणांची सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली असून, पोलिस या धमकीची विश्वासार्हता तपासत आहेत. सायबर तज्ज्ञांच्या मदतीने या ई-मेलचा मूळ स्रोत (आयपी ॲड्रेस) शोधण्याचे आणि तो पाठवणाऱ्या व्यक्ती किंवा टोळीची ओळख पटवण्याचे युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. हा संदेश खरोखरच घातपाताच्या उद्देशाने पाठवला आहे की एखाद्या खोडसाळ प्रवृत्तीने अफवा पसरवण्यासाठी रचलेला कट आहे, याचा सखोल शोध सायबर शाखा घेत आहे.

*(तभा वृत्तसेवा)*

### गुजरात 'सीएमओ'लाही धमकी

**महाराष्ट्राप्रमाणेच गुजरातच्या गांधीनगर येथील मुख्यमंत्री कार्यालय, अहमदाबाद महापालिका आणि रा. स्व. संघाचे कार्यालय बॉम्बस्फोट घडवून उडवून देण्याची धमकी देणारा मेल 'खलिस्तान नॅशनल आर्मी'ने पाठवल्याची माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी दिली. धमकी देणारा मेल सरकारच्या आयडीवर आला. दुपारी १.११ वाजता सीएमो, अहमदाबाद महापालिका दुपारी ३.११ वाजता आणि मणिनगर येथील रा. स्व. संघाचे कार्यालय ५.११ वाजता उडवण्याची धमकी यात देण्यात आली.**

# चीनचा अमेरिकेला सर्वाधिक धोका

**वॉशिंग्टन :** आजच्या घडीला चीनचा अमेरिकेला सर्वाधिक धोका असून, भारत अधिक चांगला भागीदार आहे. दोन्ही देशां धील संबंध सातत्याने दृढ होत असून, अमेरिका-चीन संबंधां ध्ये संघर्ष टाळणे महत्त्वाचे असल्याचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या माजी उपराष्ट्रीय सुरक्षा सल्लागार व्हिक्टोरिया कोट्स यांनी वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत सांगितले. कोट्स म्हणाल्या चीनपेक्षा भारत अमेरिकेसाठी अधिक चांगला भागीदार आहे. भारत एक उत्कृष्ट संभाव्य मित्रराष्ट्र आहे.




### मालमत्ता लिलावातून १३०० कोटींचा महसूल

**नवी दिल्ली :** दिल्ली विकास प्राधिकरणाने १४२ मालमत्तांचा लिलाव करून १३२१ कोटी रुपयांचा महसूल मिळवला आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी बुधवारी दिली. जमीन आणि म ालमत्तांच्या या भव्य ई-लिलावात गुंतवणूकदार, संस्था आणि व्यावसायिक यांनी सहभाग घेतला आणि स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारे मालमत्तेचे उत्तम मूल्य प्राप्त झाले. या ई-लिलावात ४८०.३८ कोटी रुपयांच्या एकत्रित राखीव किम तीच्या तुलनेत १३२१.२१ कोटी रुपयांची सर्वोच्च बोली प्राप्त झाली. यामुळे राखीव मूल्याच्या जवळपास तिप्पट मूल्य मिळाले.

# महिला अधिकाऱ्याचा विनयभंग; सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

## गतवर्षी २७ मार्च ते १७ ऑगस्ट या कालावधीतील जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालयातील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जून-**

अश्लील, संतापजनक व लिंगभेदी भाषा वापरून, कामात अडथळा निर्माण करत एका महिला अधिकाऱ्याचा विनयभंग केल्याची घटना जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या कार्यालयात २७ मार्च २०२५ ते १७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत घडली. याप्रकरणी ६ जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रवींद्र कदम, मजुंथा गायकवाड (शासकीय लिपिक), श्रीकांत शिवलकर (कंत्राटी विधी अधिकारी), विशाल लगदिवे (कंत्राटी कर्मचारी), सूर्यकांत कटारे आणि स्वप्निल दुरुगकर अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आटोपींचे नावे असून याबाबत खुद्द पीडित महिला अधिकाऱ्याने फिर्याद दिली आहे. संबंधित महिला अधिकारी या काळात सोलापूर येथील जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयात कार्यरत होत्या. दरम्यानच्या काळात या कार्यालयातील काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी संगनमत करून फिर्यादी महिला अधिकाऱ्यांच्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला. आदेशांचे उल्लंघन करणे, वरिष्ठांच्या स्वाक्षरीनंतरही ऑनलाइन प्रमाणपत्रे वितरित करण्याच्या प्रक्रियेत विनाकारण दिरंगाई करून ती प्रकरणे प्रलंबित ठेवणे, असे प्रकार आरोपींकडून केले जात होते. केवळ कामात अडथळाच नाही, तर आरोपींनी महिला अधिकाऱ्यांशी अत्यंत उद्धट वर्तन केले. बायकांचे हाताखाली काम करण्याची वेळ आली आहे, अशी संतापजनक व लिंगभेदी भाषा वापरून त्यांना अपमानास्पद वागणूक देण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास संबंधित अधिकारी करीत आहेत.



# अमेरिकी सिनेटर्सकडून मोदींचे अभिनंदन

## सर्वाधिक काळ पंतप्रधानपदाचा ऐतिहासिक टप्पा

◆ **वॉशिंग्टन, १० जून**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा प्रदीर्घ कार्यकाळ हा आमूलाग्र परिवर्तन घडवणारा असल्याचे कौतुक करीत अमेरिकेतील सिनेटर्सष उद्योग क्षेत्रातील दिग्गज आणि अनिवासी भारतीयांना त्यांचे सर्वाधिक काळ पदावर राहिलेले निवडून आलेले पंतप्रधान बनल्याबद्दल अभिनंदन केले.

नरेंद्र मोदी बुधवारी भारताचे सर्वाधिक काळ पदभार सांभाळणारे पंतप्रधान बनले. त्यांनी ४,३९९ दिवसांचा अखंड कार्यकाळ पूर्ण करीत देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचा विक्रम मागे टाकला.

भारताचे सर्वाधिक काळ पदभार सांभाळणारे निवडून आलेले पंतप्रधान बनल्याबद्दल नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन. तीन लोकशाही जनमतांच्या माध्यमातून १.४ अब्ज लोकांचा विश्वास संपादन करून त्यांनी ४,३९९ दिवसांचे नेतृत्व केले आहे, असे टेक्सासचे रिपब्लिकन सिनेटर जॉन कॉर्निन यांनी 'एक्स'वरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे.



२५ कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढण्यापासून ते भारताला जगातील सर्वांत वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था बनवण्यापर्यंत पंतप्रधान नरेंद्र मोदींचा कार्यकाळ खऱ्या अर्थाने परिवर्तनकारी ठरला आहे. अमेरिका-भारत भागीदारी यापूर्वी कधीही इतकी मजबूत नव्हती, असे सिनेट इंडिया कॉकसचे सह-अध्यक्ष कॉर्निन यांनी म्हटले.

भारताचे सर्वाधिक काळ पंतप्रधानपद भूषवणारे नेते बनल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारत-अमेरिका भागीदारी खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक, जागतिक आणि धोरणात्मक बनली आहे, असे टेनेसी येथील रिपब्लिक सिनेटर बिल हॅगर्टी यांनी म्हटले. तीन लोकशाही जनादेशांद्वारे १.४ अब्ज लोकांचा विश्वास संपादन करून मिळवलेल्या नेतृत्वासाठी पंतप्रधान मोदींचे पॅलो अल्टो नेटवर्क्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी निकेश अरोरा यांनी अभिनंदन केले. (वृत्तसंस्था)

### भारत-अमेरिकेचे संबंध जोपासले : मॅरी मिल्बेन

पंतप्रधान मोदी आपले मित्र असून, भारताचे सर्वाधिक काळ पंतप्रधानपद भूषवणारे नेते बनल्याबद्दल अमेरिकी गायिका मॅरी मिल्बेन यांनी मनापासून अभिनंदन केले. तुम्ही अमेरिकेच्या अनेक राष्ट्राध्यक्षांचा कार्यकाळ पाहिला आहे. काहींशी तुमचे संबंध अत्यंत उत्तम होते, तर काहींच्या बाबतीत तुम्ही मोठेपणा आणि संयम राखला; तरीही भारतीय जनतेचे हित आणि आपल्या दोन्ही देशांमधील संबंधांची जोपासना करणाऱ्या मुत्सद्देगिरीच्या स्पष्ट मार्गावरून तुम्ही कधीही विचलित झाला नाहीत, असे मिल्बेन म्हणाल्या.



अनेक महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या विविध मागण्यांसंदर्भात बुधवारी झारखंड आंदोलनकारी संघर्ष मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री निवासस्थानावर मोर्चा काढला

# पाकिस्तानी 'वीरां'चा अफगाणी महिला-मुलांवर हल्ला

## हवाई हल्ल्यात ११ मुले, एक महिला आणि वृद्धाचा मृत्यू

◆ **काबुल, १० जून**

पाकिस्तानच्या भेकड सैन्याने पुन्हा एकदा अफगाणिस्तानातील महिला आणि मुलांवर हवाई हल्ला करण्याचा पराक्रम गाजवला आहे. पाकिस्तानी 'वीरां'च्या या अमानवी कृत्यात ११ बालक, एक महिला आणि एका वृद्धाचा मृत्यू झाला, तर १४ जण या हल्ल्यात जखमी झाले आहेत.

पाकिस्तानने खोस्त, कुनार आणि पक्तिका प्रांतात हवाई हल्ले केल्याची माहिती तालिबान सरकारचे मुख्य प्रवक्ते जबीबुल्लाह मुजाहिद यांनी बुधवारी दिली. पाकिस्तानच्या या कृत्यामुळे दोन्ही देशांतील तणाव पुन्हा एकदा वाढला आहे. हा हल्ला सामान्य नागरिकांना लक्ष्य करून करण्यात आल्याचा आरोप तालिबान सरकारने केला. मात्र, दुसरीकडे पाकिस्तानने या हल्ल्याबाबत तत्काळ कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया व्यक्त केलेली नाही. पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील तणाव मागील काही काळात शिगेला पोहोचला आहे. फेब्रुवारी महिन्याच्या शेवटी या दोन्ही देशांमध्ये झालेल्या संघर्षात शेकडो लोकांना प्राण गमवावे लागले होते.

अफगाणिस्तानच्या भूमीचा वापर अतिरेकी संघटना करीत असल्याचा आरोप दीर्घकाळापासून पाकिस्तान करीत आहे. विशेषतः तहरीक-ए-तालिबान पाकिस्तानवर (टीटीपी) हा देश सातत्याने चिंता व्यक्त करीत आहे. टीटीपीच्या अतिरेक्यांचे वास्तव्य अफगाणिस्तानात असून, ते पाकिस्तानात हल्ले घडवतात, असा आरोप आहे.

टीटीपी ही अफगाण तालिबानपेक्षा वेगळी संघटना आहे. मात्र, या दोन्ही संघटनांमध्ये वैचारिक आणि धोरणात्मक संबंध असल्याचे समजले जाते. २०२१ मध्ये अमेरिकी सैन्य परतल्यानंतर अफगाणिस्तानातील सत्तेची सूत्रे तालिबानने हाती घेतली. तेव्हापासून अफगाणिस्तान टीटीपीला आश्रय देत असल्याचा आरोप पाकिस्तान करीत आहे. (वृत्तसंस्था)

### अफगाणिस्तानने फेटाळले पाकिस्तानी आरोप

पाकिस्तान करीत असलेले आरोप अफगाणिस्तानने सातत्याने फेटाळले आहेत. कोणत्याही देशाच्या विरोधात आपल्या भूमीचा वापर करू दिला जात नाही, असा दावा अफगाणिस्तानमधील तालिबान सरकारचा आहे. पाकिस्तानने नुकत्याच केलेल्या हल्ल्यामुळे या परिसरातील स्थिती अत्यंत तणावपूर्ण झाली आहे. दोन्ही देशांनी चर्चेच्या माध्यमातून हा प्रश्न न सोडवल्यास सीमेवर हा संघर्ष चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# रशियाला मदत करणाऱ्या भारतीय कंपन्या लक्ष्य

## निर्बंध घालण्याचा युरोपियन युनियनचा इशारा

◆ **ब्रुसेल्स, १० जून**

युक्रेनविरुद्ध युद्धात रशियाला मदत केल्याच्या आरोपात भारतीय कंपन्यांवर निर्बंध लादणार असल्याची घोषणा युरोपियनम युनियनने केली आहे. काही भारतीय कंपन्यांना काळ्या यादीत टाकून त्यांच्यावर निर्यातबंदी लागू करणार असल्याचे संकेत युरोपियन युनियनने दिले असले तरी, अद्याप संबंधित कंपन्यांची नावे घोषित करण्यात आली नाही.

युरोपियन युनियनने यासाठी २१वे निर्बंध पॅकेज प्रस्तावित केले असून, यातंर्गत रशियाला मदत करणाऱ्या काही भारतीय कंपन्यांवर निर्यातबंदी लागू केली जाईल अशी माहिती युरोपियन आयोगाच्या उपाध्यक्षा काजा कलास यांनी बुधवारी दिली. गेल्या दोन वर्षांतील हा सर्वात मोठा आणि कठोर निर्बंधांचा प्रस्ताव आहे. रशियाच्या अर्थव्यवस्थेला कमकुवत करणे या कारवाईचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. नव्या निर्बंध पॅकेजचा मुख्य भर रशियाच्या लष्करी-औद्योगिक यंत्रणेवर मर्यादा आणणे आणि युद्धासाठी मिळणारा आर्थिक पुरवठा रोखणे आहे. निर्यात निर्बंधांच्या यादीत भारतासह चीन, तुर्की, किर्गिस्तान, कझाकस्तान आणि संयुक्त अरब अमिराती येथील कंपन्यांचा समावेश आहे. याशिवाय ड्रोन निर्मितीशी संबंधित ३० हून अधिक संस्था आणि कंपन्याही या यादीत आहेत.

### ९० बँकांची मालमत्ता गोठवणार

नव्या प्रस्तावांमध्ये रशियाला मदत केल्याचा आरोप असलेल्या बँका, शस्त्रनिर्मिती कंपन्या, तेल व्यापारी, तेल शुद्धीकरण प्रकल्प आणि क्रिप्टोकरन्सी ऑपरेटर यांनाही लक्ष्य करण्यात आले आहे. सुमारे ९० बँकांची मालमत्ता गोठवण्याचा प्रस्ताव असून ३० हून अधिक बँकांच्या व्यवहारांवर कठोर नियंत्रण ठेवले जाणार आहे. तसेच, ११ क्रिप्टोकरन्सी प्लॅटफॉर्म्सवरील व्यवहारांवर बंदी घालण्याचीही तयारी सुरू आहे. (वृत्तसंस्था)

# बालेंद्र शाहांच्या भ्रष्टाचारविरोधी लढ्याची पोलखोल

## वादग्रस्त गुरुंग यांची गृहमंत्रिपदी पुनर्नियुक्ती

◆ **काठमांडू, १० जून**

नेपाळचे पंतप्रधान बलेंद्र शाह यांनी मंगळवारी आपल्या मंत्रिमंडळाचा विस्तार केला. त्यांनी सुदान गुरुंग यांची गृहमंत्रीपदी पुनर्नियुक्ती केली. त्यांच्या या निर्णयावर गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. गुरुंग यांच्या नियुक्तीमुळे बालेन शाहा यांच्या भ्रष्टाचारविरोधी लढ्याची पोलखोल झाल्याचे बोलले जात आहे.

भ्रष्टाचारविरोधी आंदोलनातून उदयास आलेले नेते काही काळ सत्तेत राहिल्यानंतर अनेकदा आपल्या पूर्वग्रहानुसार त्याच प्रथा पुन्हा सुरू करतात. हे आपण भारतातही पाहिले आहे. त्याचा परिणाम असा होतो की, अशा आंदोलनांवरील जनतेचा विश्वास उडून जातो. पुढील अनेक वर्षे ते आंदोलन अशक्य होते. केवळ नेपाळच नाही तर भारतालाही बालेंद्र शाह यांच्याकडून मोठ्या अपेक्षा आहेत. ते एका आंदोलनानंतर निवडून आले होते. त्यामुळे त्यांनी किमान जनतेच्या अपेक्षांचा आदर करायला हवा होता.



नेपाळचे राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांनी मंगळवारी राष्ट्रपती भवनात आयोजित एका समारंभात सुदान गुरुंग यांना गोपनीयतेची शपथ दिली. त्यांच्या आर्थिक व्यवहारांमधील अनियमिततेच्या वादामुळे गुरुंग यांनी २२ एप्रिल रोजी गृहमंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. पण आता पंतप्रधान बालेन शाह यांनी त्यांच्याविरुद्धचा चौकशी अहवाल सार्वजनिक केला नसतानाही ते पुन्हा गृहमंत्री झाले आहेत.

दोन महिन्यांपेक्षा कमी काळात, बालेन सरकारने चौकशी अहवाल सार्वजनिक न करताच सुदान गुरुंग आपल्या पदावर परतले आहेत. उलट, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने सुदान गुरुंग यांच्याविरुद्ध चौकशीची शिफारस केली आहे. आयोगाचा दावा आहे की, सुदान गुरुंग यांनी गतवर्षी सप्टेंबरमध्ये झालेल्या जनरेशन झीच्या आंदोलनांना चिथावणी देऊन हिंसक वळण दिले. (वृत्तसंस्था)

### चौकशी अहवालाच्या आधारावर नियुक्ती

सुदान गुरुंग यांना पुन्हा गृहमंत्रीपदी नियुक्त करण्याचे कारण म्हणजे माजी उच्च न्यायालयाचे न्यायाधीश अच्युत प्रसाद भंडारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तयार केलेला चौकशी अहवाल. अहवालात म्हटले आहे की, मालमत्तेचा स्रोत संशयास्पद होता,असा निष्कर्ष काढायला कोणताही आधार नाही. गुरुंग यांची नियुक्ती करण्यापूर्वी, नेपाळ सरकारच्या मंत्रिमंडळाने मंगळवारी भंडारी समितीचा अहवाल स्वीकारण्याचा निर्णय घेतला होता. तथापि, सरकारने हा अहवाल सार्वजनिक केलेला नाही.

# इस्रायलच्या तुरुंगात पॅलेस्टिनींवर अत्याचार

## संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार संघटनेचा अहवाल, श्वानांनी तोडले लचके

◆ **न्यू यॉर्क, १० जून**

हमासच्या हल्ल्यानंतर इस्रायलने गाझा पट्टूत घुसून पॅलेस्टिनी नागरिकांना अटक केली होती. या कैद्यांना इस्रायलच्या तुरुंगात डांबून अनन्वित अत्याचार केल्याची माहिती संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार संघटनेच्या अहवालातून समोर आली आहे. अटक करण्यात आलेल्या नागरिकांचे श्नानांनी लचके तोडल्याची धक्कादायक माहिती अहवालात आहे.

हमासच्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इस्रायलने दोन वर्षे इस्रायलकडून गाझापट्टीवर बॉम्बवर्षाव सुरू होता. या संघर्षात इस्रायली सैनिकांनी अनेक पॅलेस्टिनी नागरिकांना अटक केली. अटकेत असलेल्या लोकांवर अघोरी अत्याचार करण्यात आले. तुरुंगात नरकयातना भोगणाऱ्या कैद्यांनी मानवाधिकार संघटनेच्या सदस्यांना ही माहिती दिली. पॅलेस्टिनी कैद्यांवर तुरुंगात बलात्कार, लैंगिक अत्याचारासारखे गुन्हे घडले. या कैद्यांना त्यांच्या नावाऐवजी नंबर देण्यात आले होते. या नंबरवरूनच त्यांना संबोधले जायचे. २०२३ साली ताब्यात घेतलेल्या कैद्यांवर चौकशीच्या नावाखाली अनेक काळ अत्याचार केले गेले. इस्रायली सैनिकांनी अत्यासारासाठी श्वानांचाही वापर केला. हे श्वान सैनिकांचे हुकूम ऐकून त्यानुसार वागायचे.



### हात, पायांना ठोकल्या बेड्या

कैद्यांना पोटावर जमिनीवर झोपण्यास सांगितले जायचे. त्यांचे हात आणि पायांना बेड्या ठोकल्या जायच्या आणि त्यानंतर त्यांच्या शरीरावरून श्वानाला फिरवले जायचे, अशी धक्कादायक बाबही अहवालात नमूद आहे. सैनिकांच्या श्वानाची मदत घेऊन त्याच्यावर वारंवार बलात्कार झाल्याचे कैद्यांनी सांगितले. तसेच, महिला अधिकाऱ्यांनीही विविध वस्तूंचा वापर करत लैंगिक अत्याचार केला.

### समाज माध्यमावर चित्रफीत प्रसारित

२०२४ साली दक्षिण इस्रायलच्या एका तुरुंगात कैद्यावर बलात्कार होत असल्याची चित्रफीत समाज माध्यमावर प्रसारित झाली होती.

यानंतर संतापाची लाट पसरली. सदर कैद्याला नंतर उपचारासाठी बाहेर आणले गेले. मात्र उपचार केल्यानंतरही त्याला नीट चालता येत नव्हते. अत्याचारात सहभागी इस्रायली सुरक्षा दलाच्या काही सैनिकांना अटक करण्यात आली. मात्र उजव्या विचारसरणीचे काही नेते आणि नेतान्याहूंच्या मंत्र्यांनी बलात्काराच्या घटनेचे समर्थन केले. (वृत्तसंस्था)

# 'बीएलए'ला काळ्या यादीत टाकण्याचा डाव उधळला

**पाकिस्तान-चीनच्या प्रस्तावाला अमेरिकेचा विरोध**

◆ **न्यू यॉर्क, १० जून**

बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए) आणि माजिद ब्रिगेडला दहशतवादी संघटना घोषित करण्याचा पाकिस्तान आणि चीनचा डाव संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेत उधळण्यात आला. या दोन्ही देशांचा प्रस्ताव अमेरिकेने रोखला.

पाकिस्तान आणि चीनने मागील वर्षी सप्टेंबरमध्ये सुरक्षा परिषदेच्या '१२६७ अल-कायदा निर्बंध समिती'अंतर्गत बीएलए आणि माजिद ब्रिगेडला काळ्या यादीत टाकण्यासाठी संयुक्त प्रस्ताव सादर केला होता. अमेरिका, फ्रान्स आणि ब्रिटन या सुरक्षा परिषदेत नकाराधिकाराची शक्ती असलेल्या देशांनी तो या महिन्यात रोखल्याची माहिती समोर आली.

आयएसआयएल-के, अल-कायदा, तेहरिक-ए-तालिबान पाकिस्तान, ईस्ट तुर्कस्तान इस्लामिक मुव्हमेंट, बीएलए आणि माजिद ब्रिगेड यासारख्या दहशतवादी संघटना अफगाणिस्तानातील सुरक्षित तळांवरून कार्यरत आहेत तसेच अशा ६० पेक्षा जास्त दहशतवादी छावण्या सीमापार घुसखोरी आणि हल्ल्यांसाठी केंद्रबिंदू म्हणून काम करीत आहेत,



असे संयुक्त राष्ट्रांमधील पाकिस्तानचे स्थायी प्रतिनिधी राजदूत आसिम इफ्तिखार अहमद यांनी म्हटले होते.

पाकिस्तान आणि चीनने संयुक्तपणे '१२६७ निर्बंध समिती'कडे बीएलए आणि माजिद ब्रिगेडला यादीत समाविष्ट करण्याची विनंती केली आहे. त्यांच्या दहशतवादी कारवायांना आळा घालण्यासाठी सुरक्षा परिषद या प्रस्तावावर त्वरित कार्यवाही करेल, अशी आम्हाला आशा आहे, असे अहमद यांनी सुरक्षा परिषदेच्या बैठकीत म्हटले होते.

पाकिस्तान सध्या २०२५-२६ या कालावधीसाठी १५ सदस्य असलेल्या सुरक्षा परिषदेत अस्थायी सदस्य म्हणून कार्यरत आहे, तर चीन हा शक्तिशाली संयुक्त राष्ट्र संस्थेचा नकाराधिकार असलेला स्थायी सदस्य आहे. पाकिस्तानकडे २०२५ या वर्षासाठी सुरक्षा परिषदेच्या १९८८ तालिबान निर्बंध समितीचे अध्यक्षपद तसेच दहशतवाद-विरोधी समितीचे उपाध्यक्षपद होते. अमेरिकेने बलुचिस्तान लिबरेशन आणि तिची सहकारी संघटना माजिद ब्रिगेडला विदेशी दहशतवादी संघटना म्हणून घोषित केले होते. अमेरिकी गृह विभागाने माजिद ब्रिगेडला बीएलएच्या पूर्वीच्या 'स्पेशली डेसिग्नेटेड ग्लोबल टेररिस्ट' घोषित केले होते. (वृत्तसंस्था)

### चीनने रोखले होते भारत-अमेरिकी प्रस्ताव

यापूर्वी नकाराधिकार असलेला स्थायी सदस्य चीनने पाकिस्तानातील दहशतवादी आणि दहशतवादी संघटनांना परिषदेच्या १२६७ अल-कायदा निर्बंध समितीच्या अंतर्गत सूचीबद्ध करण्यासाठी भारत आणि अमेरिका यासारख्या भागीदारांनी मांडलेले अनेक प्रस्ताव रोखून धरले होते.

## सायबर फसवणूक रोखणार मानसशास्त्रज्ञ

◆ **न्यू यॉर्क, १० जून**

अमेरिकेत सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांमुळे बँकांची चिंता वाढली आहे. फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ झाल्यामुळे काही बँका आता तंत्रज्ञानासोबतच मानसशास्त्रीय पद्धतींचाही अवलंब करत आहेत. अमेरिकेतील सर्वात मोठी बँक जेपी मॉर्गनने मानसशास्त्रज्ञांची नियुक्ती केली असून, सायबर फसवणूक रोखण्यासाठी ग्राहकांचे समुपदेशन केले जाणार आहे. अमेरिकेची तपास संस्था एफबीआयच्या इंटरनेट क्राईम कंप्लेंट सेंटरनुसार, २०२५ मध्ये सायबर गुन्ह्यांमुळे लोकांना २ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान झाले. हा आकडा २०२४ च्या तुलनेत हा आक़डा २५ टक्क्यांनी अधिक आहे, तर २०२० च्या तुलनेत चार पटीने फसवणुकीत वाढ झाली आहे. जेपी मॉर्गनने दोन वर्षांपूर्वी व्यवहार शास्त्रज्ञ एलिझाबेथ हपर्ट यांची नियुक्ती केली होती. त्यांचे काम कॉल सेंटर आणि बँक शाखांमधील कर्मचाऱ्यांना फसवणूक करणारे लोक लोकांचा विश्वास कसा जिंकतात आणि त्यांना बँकेच्या सल्ल्यावर संशय घेण्यासाठी कसे तयार करतात हे होते. बँका आता संशयास्पद प्रकरणांमध्ये ग्राहकांशी थेट संपर्क साधत आहेत. (वृत्तसंस्था)

# आईसलँड जगातील सर्वांत सुरक्षित देश

## अमेरिका, रशिया, पाकिस्तानमध्ये अशांतता

◆ **वेलिंग्टन, १० जून**

जागतिक शांतता निर्देशांकाने (ग्लोबल पीस इंडेक्स) चालू वर्ष २०२६ साठी सर्वात सुरक्षित देशांची यादी जाहीर केली आहे. जागतिक शांतता निर्देशांकाच्या म्हणण्यानुसार, त्यांनी १६३ देशांमधील शांततेच्या पातळीचे विश्लेषण करून जगातील सर्वात व्यापक वार्षिक क्रमवारी तयार केली आहे. आईसलँड या यादीत अव्वल स्थानी असून तो सर्वात सुरक्षित देश ठरला आहे. विशेष म्हणजे, रशिया तळाशी आहे तर भारताला पहिल्या १०० देशांमध्ये स्थान मिळवता आलेले नाही.

२०२६ च्या जागतिक शांतता निर्देशांकातून असे दिसून येते की, जगातील शांततेची पातळी सातत्याने घसरत आहे. या घसरणीचे मुख्य कारण सशस्त्र संघर्ष आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर आता सक्रिय सरकारी संघर्ष जगात सर्वाधिक आहेत. तर २००८ पासून बाह्य संघर्षांमध्ये सामील असलेल्या देशांची संख्या दुप्पट झाली आहे.



### सर्वांत सुरक्षित १० देश

| | | |
|---|---|---|
| १. | - | आइसलँड |
| २. | - | न्यूझीलंड |
| ३. | - | स्वित्झर्लंड |
| ४. | - | स्लोव्हेनिया |
| ५. | - | आयर्लंड |
| ६. | - | ऑस्ट्रिया |
| ७. | - | पोर्तुगाल |
| ८. | - | सिंगापूर |
| ९. | - | फिनलँड |
| १०. | - | जपान |

आईसलँड सलग १९ व्या वर्षी जगातील सर्वात शांततापूर्ण देश राहिला आहे. तिथे स्थायी सैन्य नाही. गुन्हेगारीचे प्रमाण खूप कमी आहे आणि सामाजिक विश्वास उच्च आहे. डेन्मार्क ११ व्या क्रमांकावर आहे. भारताच्या शेजारील देशांमध्ये, भूतान (१६) सर्वोत्तम क्रमांकावर आहे. या यादीत भारताचा क्रमांक १२७ वा आहे. तर पाकिस्तानचा क्रमांक १५२ वा आहे. या यादीनुसार, रशिया हा सर्वात अशांत देश आहे. रशियाचा क्रमांक सीरिया आणि अफगाणिस्तानपेक्षाही खाली आहे. युद्धग्रस्त इराणचा क्रमांक १४४ वा तर अमेरिकेचा क्रमांक १३४ वा आहे.

या यादीनुसार, पश्चिम आणि मध्य युरोप हे सर्वात शांत प्रदेश आहेत. पश्चिम आशिया आणि उत्तर आफ्रिका हे सर्वात अशांत प्रदेश आहेत. आठ जीपीआय प्रदेशांपैकी, केवळ पूर्व युरोप आणि मध्य आशियामध्ये गतवर्षी सरासरी सुधारणा दिसून आली. शांतता मोजण्यासाठी २३ निर्देशकांचा वापर

या वर्षी जागतिक शांतता निर्देशांकाची २० वी आवृत्ती आहे, जो जगाच्या ९९.७ टक्के लोकसंख्येला व्यापणाऱ्या १६३ स्वतंत्र देश आणि प्रदेशांना त्यांच्या शांततेच्या पातळीनुसार क्रमवारी देतो. (वृत्तसंस्था)

### २३ निर्देशकांचा वापर

शांतता मोजण्यासाठी २३ निर्देशकांचा वापर केला जातो. ज्यात सामाजिक सुरक्षेची पातळी, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय संघर्षाची व्याप्ती आणि लष्करीकरणाची पातळी या तीन क्षेत्रांचा अभ्यास केला जातो.या वर्षीच्या निकालांनुसार, जागतिक शांततेची सरासरी पातळी गेल्या वर्षीच्या तुलनेत ०.७ टक्क्यांनी घसरली आहे. निर्देशांकात समाविष्ट असलेल्या १६३ देशांपैकी ९९ देशांमध्ये शांततेची पातळी घसरली आहे, तर ६२ देशांमध्ये ती सुधारली आहे. २००८ च्या तुलनेत या वर्षी ११९ देशांमधील शांतता कमी झाली आहे.

## दिल्ली उच्च न्यायालय सुनावणी घेऊ शकते

◆ **नवी दिल्ली, १० जून**

केंद्रीय सशस्त्र पोलिस दलांसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी एक महत्त्वपूर्ण निकाल दिला. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, केंद्रीय सशस्त्र पोलिस दलाच्या (सीएपीएफ) जवानांसह सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) सदस्यांच्या सेवासमाप्तीशी संबंधित प्रकरणांची सुनावणी दिल्ली उच्च न्यायालय घेऊ शकते. न्यायमूर्ती दिपांकर दत्ता आणि सतीश चंद्र शर्मा यांच्या न्यायासनाने हा आदेश एका कॉन्स्टेबलने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी घेताना दिला. या कॉन्स्टेबलने कोणत्याही पेन्शन लाभांशिवाय सेवेतून बडतर्फ करण्याला आव्हान दिले होते. विवाहित असताना आणि पहिल्या पत्नीच्या परवानगीशिवाय दुसरे लग्न केल्याच्या कारणावरून त्याला बडतर्फ करण्यात आले होते. २०२२ मध्ये बडतर्फ केलेला जवान पश्चिम बंगालच्या मालदा जिल्ह्यातील नारायणपूर येथे, जिथे तो तैनात होता. (वृत्तसंस्था)

# जोहान्सबर्गमध्ये गोळीबार; १२ जणांचा मृत्यू

## मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता

◆ **जोहान्सबर्ग, १० जून**

दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्गच्या पूर्वेकडील क्लीव्हलँड येथील एका अनौपचारिक वस्तीत गोळीबार झाला. या हिंसक घटनेत किमान १२ जणांचा मृत्यू झाला तर नऊ जण जखमी झाले.

दक्षिण आफ्रिकन पोलिस सेवेने दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री सुमारे ११:१० वाजता जंपर्स वस्तीत गोळीबार झाल्याची माहिती मिळताच पोलिस अधिकारी तात्काळ घटनास्थळी पोहोचले. घटनास्थळी पोलिसांना परिसरातील विविध ठिकाणी अनेक लोक जखमी आढळले. यापैकी आठ पुरुष आणि तीन महिलांचा जागीच मृत्यू झाला होता. तर एकाचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. जखमींना तात्काळ वैद्यकीय उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. (वृत्तसंस्था)

### रहिवाशांवर अंदाधुंद गोळीबार

पोलिसांच्या माहितीनुसार, १० हून अधिक संशयित एका टोयोटा क्वांटम गाडीतून वस्तीजवळ आले होते. हल्लेखोरांनी वस्तीत प्रवेश करण्यासाठी दोन वेगवेगळ्या मार्गांचा वापर केला. ते वस्तीत फिरत असताना रहिवाशांवर अंदाधुंद गोळीबार करत होते. गोळीबारानंतर सर्व संशयित एकाच गाडीतून पळून गेले. त्यानंतर हल्लेखोर क्लीव्हलँडमधील एका पेट्रोल पंपाजवळ उतरले. या भीषण हल्ल्यामागील हेतू अद्याप अस्पष्ट आहे.



सरकार सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लावत गॅस आणि पेट्रोलचे दर वाढवत आहे. भारताने नेमक्या कोणत्या क्षेत्रात चांगली कामगिरी केली, हाच मोठा प्रश्न आहे. आज देशाची अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडली असून, परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत पाकिस्तानही पुढे आहे.
**- पृथ्वीराज चव्हाण**, काँग्रेस नेते

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
गुरुवार, ११ जून २०२६





काँग्रेस पक्षातून जे जे घटक बाहेर पडले आहेत त्यांनी आपले पक्ष निर्माण केले आहेत त्यांनी एकत्र काँग्रेसच्या झेंड्याखाली येत काँग्रेसची ताकद वाढवण्याची गरज आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने अजित पवारांच्या गटात विलीन होण्यापेक्षा त्यांनी काँग्रेसमध्ये विलीन व्हावे
**- संजय राऊत**, खासदार

# आयात शुल्क परत करावेच लागेल

**● सर्वोच्च न्यायालयाने ट्रम्प प्रशासनाला फटकारले ● शक्य तितक्या लवकर व्यावसायिकांना परतावा द्या**



### शुल्क धोरणावरील वाद काय?

- डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत, चीनसह अनेक देशांमधून येणाऱ्या वस्तूंवर शुल्क लादले
- अमेरिकन उद्योग आणि रोजगारनिर्मितीचे कारण त्यांनी शुल्क आकारताना सांगितले
- प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले, जिथे न्यायालयाने शुल्काचा निर्णय बेकायदेशीर घोषित केला
- वसूल केलेले शुल्क परत मिळावे यासाठी कंपन्या आणि व्यावसायिकांनी खटला दाखल केला

**◆ वॉशिंग्टन, १० जून**

आयात शुल्क (टॅरिफ) आकारून वसूल केलेले अब्जावधी डॉलर्स परत करावेच लागेल. यातून कुठलीही सवलत मिळणार नाही. कारणे सांगू नका शक्य तितक्या लवकर वसूल केलेले शुल्क व्यावसायिकांच्या खात्यात टाका अशा शब्दात अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने ट्रम्प प्रशासनाला फटकारले.

सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आकारलेले आयात शुल्क बेकायदेशीर ठरवल्यानंतर व्यावसायिकांनी शुल्काची रक्कम परत करण्याच्या मागणीसाठी न्यायालयात याचिका दाखल केली होती. यावर झालेल्या सुनावणीत सरकारी पक्षाने अब्जावधी डॉलर्सचा निधी परत करण्यास नकार देत तांत्रिक कारणे दिली. यावर न्यायालयाने कारणे सांगू नका आकारलेले शुल्क व्यावसायिकांना परत करावेच लागेल असे आदेश दिले. परतावा केवळ दावा करणाऱ्या कंपन्यांना द्यावा की सर्व आयातदारांना, यावरही सुनावणीत चर्चा झाली. न्यायालयाने सरकारला परतावा प्रक्रियेला गती देण्यास आणि पारदर्शकता वाढवण्यास सांगितले. न्यायालयाच्या आदेशाने आयात शुल्क धोरणाने ट्रम्प यांच्यासमोर कायदेशीर आणि आर्थिक आव्हान उभे केले आहे.

**१६६ अब्ज डॉलर्सचा फटका**

ट्रम्प प्रशासनाने दोन वर्षात १६६ अब्ज डॉलर्सचे शुल्क आकारले आहे. आतापर्यंत, अंदाजे ९० अब्ज डॉलर्सच्या परताव्यासाठी दावे करण्यात आले आणि २३ अब्ज डॉलर्स परत करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. सध्या, ज्या कंपन्यांची कर बिले नुकतीच निकाली निघाली आहेत, त्यांच्या अर्जांवर प्रक्रिया केली जात आहे. जुन्या प्रकरणांवरील निर्णय अद्याप प्रलंबित आहेत. ट्रम्प यांच्यासमोर शुल्काचे १६६ अब्ज डॉलर्स परत करण्याचे आव्हान आहे. ◀(वृत्तसंस्था)

### आठवडाभरात अहवाल सादर करा

**न्यायाधीश रिचर्ड ईटन यांनी ट्रम्प प्रशासनाला आदेश देताना म्हटले की, शुल्काचा परतावा कसा देणार, त्याचा कालावधी किती असेल आणि कंपनी आणि व्यावसायिकांना परतावा देण्याची पद्धत काय असेल, यासंदर्भात अमेरिकी सरकार आणि सीमाशुल्क विभागाला अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.**



हेलिकॉप्टर कोसळल्यानंतरचे विदारक दृश्य

## पाकिस्तान लष्कराचे हेलिकॉप्टर कोसळले; २० सैनिकांचा मृत्यू

**◆ मुझफ्फराबाद, १० जून**

पाकिस्तानमधील मुझफ्फराबादमध्ये लष्कराचे तांत्रिक बिघाडामुळे एमआय-१७ हेलिकॉप्टर कोसळले. या अपघातात हेलिकॉप्टरमधील सर्वच प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली आहेत. उड्डाण करताना हेलिकॉप्टर कोसळल्याची माहिती मिळाली आहे. हेलिकॉप्टरमध्ये वैमानिकासह २० सैनिक होते, असे सांगण्यात येत आहे.

पाकिस्तानच्या वृत्तपत्रानुसार, पाकिस्तानी आर्मी एव्हिएशनचे एमआय-१७ हेलिकॉप्टर मुझफ्फराबादजवळ टेक ऑफ करताना तांत्रिक अडचणींमुळे कोसळले. या दुर्घटनेत हेलिकॉप्टरमधील सर्वच लोकांचा मृत्यू झाला आहे. काही तांत्रिक बिघाडामुळे हेलिकॉप्टर पडल्याचे लष्कराने एक निवेदन जारी केले आहे. ◀(वृत्तसंस्था)

# स्वकीयांनीच हुकवली नटराजन् यांची संधी

## मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांचा दावा

**◆ भोपाळ, १० जून**

राज्यसभेवर डोळा असलेल्या काँग्रेसी नेत्यांनीच मीनाक्षी नटराजन् यांची संधी हुकवली, असा दावा मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी बुधवारी केला. भाजपाने राज्यसभेची जागा चोरली, या काँग्रेसकडून केल्या जाणाऱ्या आरोपाला ते उत्तर देत होते.

शपथपत्रात माहिती लपवल्याच्या आरोपावरून नटराजन् यांचा उमेदवारी अर्ज फेटाळल्यामुळे मध्यप्रदेशातील राज्यसभेच्या तीन जागांसाठी १८ जून रोजी होणाऱ्या निवडणुकांमध्ये मंगळवारी एक नाट्यमय वळण आले. उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर असे आढळून आले की, नटराजन् यांनी सादर केलेले प्रतिज्ञापत्र अपूर्ण होते. कारण, त्यांनी उमेदवारी



अर्जासोबत सादर केलेल्या 'फॉर्म-२६'मध्ये एका न्यायालयीन तक्रारीचा उल्लेख वगळला होता, असे राज्यसभा निवडणुकीचे निर्णय अधिकारी अरविंद शर्मा यांनी जारी केलेल्या आदेशात नमूद केले आहे.

नटराजन् यांनी दाखल केलेल्या शपथपत्रात तेलंगणातील त्यांच्या विरोधात दाखल असलेल्या प्रकरणाचा उल्लेख केला नाही, असा आरोप करीत भाजपाचे उमेदवार महेश केवट यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली होती, असे मध्यप्रदेश विधानसभेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. हे प्रकरण राज्यसभा जागेच्या चोरीचे, लोकशाहीच्या हत्येचे असून, याला न्यायालयात आव्हान देणार असल्याचे काँग्रेसने सांगितले.

या प्रकरणात काँग्रेसने भाजपाच्या आक्षेपावरच नव्हे, तर ज्या पद्धतीने कार्यवाही झाली, यावरही आक्षेप घेतला. उमेदवारी अर्जांच्या छाननी प्रक्रियेदरम्यान उच्च न्यायालयाचे निवृत्त न्या. रोहित आर्य यांच्या उपस्थितीवर काँग्रेस नेते आणि वकील जे. पी. धनोपिया यांनी आक्षेप नोंदवला. ते कोणत्या भूमिकेत उपस्थित होते, ते उमेदवारही नव्हते किंवा प्रतिनिधीही नव्हते. अवलंबलेल्या प्रक्रियेबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत, असे धनोपिया म्हणाले. नटराजन यांच्याविरोधात कोणताही एफआयआर नसल्याचा दावा काँग्रेसने केला. ◀(वृत्तसंस्था)

### अर्जात जाणीवपूर्वक ठेवल्या चुका

**काँग्रेसने कट रचत नटराजन् यांच्या अर्जात जाणीवपूर्वक चुका केल्या, असा दावा मोहन यादव यांनी पत्रकारांसोबत चर्चा करताना केला. काँग्रेसच्या अनेक नेत्यांची या जागेवर नजर होती. ती न मिळाल्याने काँग्रेसच्याच सदस्यांनी नटराजन् यांचा डाव उधळून लावला, असे ते म्हणाले. अगदी पंच आणि सरपंच निवडणुकांमध्येही गुन्हेगारी पृष्ठभूमीची माहिती सादर करावी लागते. अशावेळी १० पेक्षा जास्त निवडणुका लढवलेल्या व्यक्तींकडून राज्यसभेसारख्या प्रतिष्ठेच्या निवडणुकीत अशा चुका होणे आश्चर्यकारक आहे. हा एक कट असल्याचे ते म्हणाले.**

# ब्रेक निकामी होऊन कार दरीत कोसळली

**◆ मसुरी, १० जून**

मसुरीतील झाडीपाणी रोडवरील बारलोगंज परिसरात बुधवारी सकाळी एक भीषण अपघात झाला. ब्रेक निकामी झाल्यामुळे चालकाचे नियंत्रण सुटले आणि भरधाव कार अनियंत्रित होऊन ५०० मीटर खोल दरीत कोसळली. यात चार जणांचा मृत्यू झाला.

मसुरी पोलिस ठाण्याच्या नियंत्रण कक्षामार्फत बुधवारी सकाळी माहिती मिळाली की, झाडीपाणी रस्त्यावर एक कार अनियंत्रित होऊन खोल दरीत कोसळली आहे. माहिती मिळताच, पोलिसांचे एक पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. एसडीआरएफ, अग्निशमन दल आणि १०८ रुग्णवाहिकेलाही घटनास्थळी बोलावण्यात आले.

स्थानिक रहिवाशांच्या चौकशीतून असे समोर आले आहे की, अपघातापूर्वी कारमधील प्रवाशांनी जवळच्या दुकानातून काही सामान खरेदी केले होते. ते उत्तरकाशीचे रहिवासी असल्याचे त्यांनी सांगितले. सामान घेऊन गाडीत बसताच गाडी वेगाने उताराच्या दिशेने जाऊ लागली. चालकाचे नियंत्रण सुटले आणि एका मोकळ्या भूखंडातून ती खोल खड्ड्यात कोसळली. कारचे ब्रेक निकामी झाल्यामुळे हा अपघात झाला, असे प्राथमिक तपासात समोर आले आहे. ◀(वृत्तसंस्था)

# मोबाईल व्यावसायिकाच्या निवासस्थानी ईडीचा छापा

## मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात दुसऱ्या दिवशीही तपास सुरू

**◆ बरेली, १० जून**

बरेलीतील मोबाईल व्यावसायिक आशुतोष अग्रवाल यांच्या निवासस्थानी अंमलबजावणी संचालनालयाचा (ईडी) तपास दुसऱ्या दिवशीही सुरू आहे. १०० कोटी रुपयांच्या कथित जीएसटी घोटाळा आणि मनी लाण्ड्रिंग प्रकरणी ईडीच्या पथकाने मंगळवारी सकाळी अग्रवाल यांच्या मारवारीगंज येथील निवासस्थानी छापा टाकला. पथकाने मध्यरात्री १२ वाजेपर्यंत व्यवसायाशी संबंधित कागदपत्रांची तपासणी केली, त्यानंतर ते निघून गेले. बुधवारी सकाळी ६ वाजता पथक पुन्हा परतले आणि तपास सुरू केला.


ईडीने महिनाभरापूर्वी पंजाबचे मंत्री संजीव अरोरा यांना अटक केली होती. आता हा तपास बरेलीपर्यंत पोहोचला आहे. ईडीने बरेलीतील सिव्हिल लाईन्स येथील आईसक्रेस्ट स्टोअरचे मालक आशुतोष अग्रवाल यांच्या निवासस्थानी मंगळवारी सकाळी छापा टाकला. या मोबाईल व्यावसायिकाचे कार्यालय आणि गोदाम त्यांच्या निवासस्थानाच्या आवारातच आहे. पथकाने रात्री उशिरापर्यंत डिजिटल व्यावसायिक नोंदी आणि आर्थिक व्यवहारांची तपासणी सुरू होती.

**जीएसटी इनपुट टॅक्स क्रेडिटचा गैरवापर**

आशुतोष अग्रवाल हे आईसक्रेस्ट स्टोअरचे मालक असण्यासोबतच हिंदुस्थान लिव्हर, आयटीसी आणि कॅडबरी यांसारख्या अनेक नामांकित कंपन्यांसाठी वितरक, स्टॉकिस्ट आणि कॅरिंग अँड फॉरवर्डिंग म्हणूनही काम करतात. शेल कंपन्या आणि कागदी व्यवहारांमार्फत जीएसटी इनपुट टॅक्स क्रेडिटचा गैरवापर झाल्याचा तपास यंत्रणेला संशय आहे. निधीचा प्रवाह आणि कथित मनी लाण्ड्रिंगचीही चौकशी केली जात आहे. ◀(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### नवीन घरात दिसले दीपिका रणवीर



**मुंबई** : दीपिका पादुकोण आणि रणवीर सिंग मुंबईतील वांद्रे पश्चिम येथील त्यांच्या समुद्रकिनारी असलेल्या नवीन क्वाड्रुप्लेक्स घराच्या बाल्कनीमध्ये दिसले. दोघेही घराच्या अंतर्गत सजावटीच्या कामाची प्रगती पाहण्यासाठी पोहोचले होते. समोर आलेल्या फोटो आणि व्हिडीओमध्ये दीपिका पांढऱ्या को-ऑर्ड आउटफिटमध्ये दिसली, तर रणवीरने लाल टी-शर्ट, काळी पॅन्ट आणि काळी कॅप घातली होती. याशिवाय, नुकतीच दुसऱ्यांदा गर्भवती असलेल्या दीपिकाचा बेबी बंपही दिसला. दुसऱ्या बाळाच्या जन्मानंतर हे जोडपे नवीन आलिशान घरात स्थलांतरित होऊ शकते.

### १२ जूनला प्रदर्शित होणार 'गव्हर्नर : द सायलेंट सेव्हियर'




**मुंबई** : मनोज वाजपेयी यांचा 'गव्हर्नर: द सायलेंट सेव्हियर'१२ जून रोजी प्रदर्शित होत आहे. ही डॉक्युमेंट्री नाही, पूर्ण संशोधनावर आधारित एक 'इकोनॉमिक थ्रिलर' आहे. ही एका व्यक्तीची बायोपिक नाही, तर एका संपूर्ण काळाची कथा आहे. विशिष्ट परिस्थितीमुळे काही पात्र कथेच्या केंद्रस्थानी नक्कीच येतात, पण चित्रपट केवळ त्यांच्यापुरता मर्यादित नाही. यात अनेक अशी पात्रे आहेत, ज्यांनी त्या काळातील निर्णय आणि घटनांवर प्रभाव टाकला होता, असे दिग्दर्शक चिन्मय मंडलेकरने सांगितले. मनोजने या भूमिकेसाठी एस. वेंकटरमणन यांच्या कुटुंबाला भेटण्याऐवजी उपलब्ध कागदपत्रे, स्क्रिप्ट आणि स्वतःच्या अभ्यासावर विश्वास ठेवला, असे त्याने सांगितले.

### कंगनाच्या चित्रपटाची होणार तिघांशी टक्कर




**मुंबई** : अभिनेत्री कंगना रणौतचा आगामी चित्रपट 'भारत भाग्य विधाता' १२ जून रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. यासोबतच या दिवशी इतर तीन बॉलिवूड चित्रपटही प्रदर्शित होणार आहेत. यामुळे बॉक्स ऑफिसवर टक्कर होण्याची शक्यता आहे. इम्तियाज अली यांचा 'मैं वापस आऊंगा', मनोज बाजपेयी अभिनीत 'गव्हर्नर: द सायलेंट सेव्हियर' आणि विक्रम भट्ट यांचा 'हॉन्टेड ३: इकोज ऑफ द पास्ट' हे चित्रपट देखील प्रदर्शित होत आहेत. याव्यतिरिक्त, जूनच्या उर्वरित दिवसांमध्ये शाहिद कपूर, क्रिती सेनन आणि रश्मिका मंदाना यांचा 'कॉकटेल २' तसेच अक्षय कुमारचा 'वेलकम टू द जंगल' यांसारखे मोठे चित्रपटही प्रदर्शित होणार आहेत.



**काँग्रेस नेत्या जयंती मीनाक्षी नटराजन् यांनी मध्यप्रदेशातून राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज सादर केला. मात्र, काही त्रुटींमुळे हा अर्ज फेटाळला. अर्ज चुकीच्या पद्धतीने बाद केल्याचा आरोप करीत बुधवारी काँग्रेस नेते के.सी. वेणुगोपाल, अभिषेक सिंघवी, रणदीप सुरजेवाला यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने दिल्लीत निवडणूक आयुक्तांची भेट घेतली**


# सायबर फसवणुकीत चार पटीने वाढ

**◆ वॉशिंग्टन, १० जून**

अमेरिकेत सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांमुळे बँकांची चिंता वाढली आहे. फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ झाल्यामुळे काही बँका आता तंत्रज्ञानासोबतच मानसशास्त्रीय पद्धतींचाही अवलंब करत आहेत.

अमेरिकेतील सर्वात मोठी बँक जेपी मॉर्गनने, याच उद्देशाने व्यवहार शास्त्रज्ञांची नियुक्ती केली आहे. अमेरिकेची तपास संस्था एफबीआयच्या इंटरनेट क्राईम कंप्लेंट सेंटरनुसार, २०२५ मध्ये सायबर गुन्ह्यांमुळे लोकांना दोन लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान झाले. हे २०२४ च्या तुलनेत २५ टक्के जास्त आणि २०२० च्या ४२ हजार कोटी रुपयांपेक्षा सुमारे चार पट आहे. जेपी मॉर्गनने दोन वर्षांपूर्वी व्यवहार शास्त्रज्ञ एलिझाबेथ हपर्ट यांची नियुक्ती केली. त्यांचे काम कॉल सेंटर आणि बँक शाखांमधील कर्मचाऱ्यांना हे समजावून सांगणे आहे. फसवणूक करणारे लोक ग्राहकांचा विश्वास कसा जिंकतात आणि त्यांना बँकेच्या सल्ल्यावर संशय घेण्यासाठी कसे तयार करतात. अनेक प्रकरणांमध्ये, फसवणूक करणारे अनेक महिने त्यांच्या बळींशी संपर्क साधतात आणि नंतर त्यांच्याकडून स्वतःच पैसे हस्तांतरित करून घेतात. बँका आता संशयास्पद प्रकरणांमध्ये ग्राहकांशी थेट संपर्क साधत आहेत.

घोटाळा विशेषज्ञ प्रश्न विचारून आणि संशयाच्या आधारावर ग्राहकांना फसवणुकीच्या जाळ्यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करत आहेत. बँक पासवर्ड टाकत असताना असामान्य अडथळा, संकोच किंवा इतर कोणत्याही व्यक्तीसोबत स्क्रीन शेअर करणे हे संभाव्य फसवणुकीचे संकेत मानले जात आहेत. ◀(वृत्तसंस्था)



## अनिल अंबानींना न्यायालयाचा दिलासा

**◆ मुंबई, १० जून**

मुंबई उच्च न्यायालयाने उद्योगपती अनिल अंबानींना मोठा दिलासा दिला आहे. न्यायालयाने त्यांना काळा पैसा कायद्यांतर्गत खटला आणि दंडासारख्या शिक्षात्मक कारवाईपासून अंतरिम संरक्षण दिले आहे. अंबानींनी आपल्या याचिकेत या कायद्यातील काही तरतुदींच्या घटनात्मक वैधतेला आव्हान दिले होते. उच्च न्यायालयाने त्यांची याचिका स्वीकारली.

न्यायमूर्ती बी. पी. कोलाबावाला आणि फिरदौस पुनीवाला यांच्या न्यायासनाने मंगळवारी हा आदेश दिला. न्यायासनाने नमूद केले की, या कायद्याविरोधात इतर याचिकाही दाखल करण्यात आल्या आहेत. उच्च न्यायालयाने केंद्र सरकारला याचिकेला उत्तर म्हणून आपले प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश दिले. न्यायालयाने हेही नमूद केले की, अंबानींविरुद्ध मूल्यांकन आदेश आधीच पारित करण्यात आला आहे. त्यांनी आयकर आयुक्त (अपील) यांच्याकडे अपील दाखल केले आहे. या अपीलची पुढील कार्यवाही होऊ शकते. तथापि, याचिकेचा अंतिम निकाल लागेपर्यंत अंबानींविरुद्ध कोणतीही शिक्षात्मक कारवाई केली जाणार नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

विभागाने त्यांच्यावर दोन स्विस बँक खात्यांमध्ये ठेवलेल्या ८१४ कोटी रुपयांपेक्षा जास्त अघोषित संपत्तीवरील ४२० कोटी रुपयांचा कर चुकवल्याचा आरोप केला आहे. ◀(वृत्तसंस्था)

# येमेनजवळ समुद्रात हुथींचा हल्ला

**◆ सना, १० जून**

पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पृष्ठभूमीवर, येमेनच्या आसपासचा सागरी परिसर पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये इराण आणि अमेरिका यांच्यातील लष्करी संघर्ष तीव्र होत असतानाच, एडनच्या आखातात एका मालवाहू जहाजावर हल्ला करण्याचा प्रयत्न झाला.

या घटनेदरम्यान जहाजावरील सुरक्षा पथक आणि सशस्त्र व्यक्ती यांच्यात चकमकही झाली. ही घटना बुधवारी पहाटे येमेनच्या बलहाफ किनारपट्टीपासून नैऋत्येला सुमारे ८८ नॉटिकल मैल अंतरावर घडली असल्याची माहिती ब्रिटनची सागरी सुरक्षा देखरेख संस्था असलेल्या युनायटेड किंगडम मॅरिटाइम ट्रेड ऑपरेशन्सने दिली. या संस्थेनुसार, एका लहान बोटीतून आलेल्या सहा सशस्त्र व्यक्तींनी मालवाहू जहाजाच्या दिशेने जाऊन संशयास्पद हालचाली केल्या. मिळालेल्या माहितीनुसार, काही सशस्त्र व्यक्ती जहाजाच्या दिशेने आल्यानंतर जहाजावरील सशस्त्र सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. यानंतर दोन्ही बाजूंमध्ये थोडा वेळ गोळीबार झाला. या प्रत्युत्तरादाखल केलेल्या कारवाईनंतर हल्लेखोर माघारी फिरले आणि त्या भागातून निघून गेले. या घटनेत कोणतेही मोठे नुकसान किंवा जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. ◀(वृत्तसंस्था)

# नासाच्या अंतराळ स्थानकाचा संपणार प्रवास


### प्रशांत महासागरात टाकणार अवशेष

### ९५०० कोटी रुपयांचा आराखडा तयार

**◆ न्यूयॉर्क, १० जून**

पृथ्वीपासून सुमारे ४०० किलोमीटर वर, मागील २५ वर्षांपासून मानवतेची सर्वात मोठी अंतराळ प्रयोगशाळा म्हणून कार्यरत असलेले आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक आता त्याच्या अंतिम टप्प्यात पोहोचले आहे.

नासाने हे स्थानक सुरक्षित पृथ्वीवर पाडण्याची योजना जाहीर केली आहे. २०२८ पासून योजनेला सुरूवात होणार आहे. यासाठी नासाने एक अब्ज डॉलर्स (सुमारे ९५०० कोटी रुपये) चा आराखडा



तयार केला आहे. आयएसएसने त्याचे निर्धारित आयुष्य पूर्ण केले आहे. त्याचा कार्यकाळ अनेक वेळा वाढवण्यात आला आहे. मागील काही वर्षांपासून त्यात सातत्याने तांत्रिक बिघाड होत आहेत. स्थानक सुरक्षित ठेवण्यासाठी अब्जावधी डॉलर्स खर्च होतात. नासा आता आपले संसाधने चंद्र आणि मंगळ मोहिमांवर केंद्रित करू इच्छित आहे.

**म्हणून दुर्गम क्षेत्राची निवड**

सुमारे ४.५ लाख किलोग्राम वजनाच्या आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला असेच पृथ्वीवर पडू दिले जाणार नाही. २०२८ च्या आसपास, स्थानकाला कक्षेत ठेवण्याची प्रक्रिया हळूहळू बंद केली जाईल. विशेष अंतराळयानाने त्याला नियंत्रित पद्धतीने पृथ्वीच्या वातावरणात ढकलले जाईल. वातावरणात प्रवेश करताच, स्थानकाचा बहुतेक भाग घर्षणामुळे जळून नष्ट होईल. तथापि, यानंतरही अंतराळातील मोठे तुकडे पृथ्वीवरील लोकवस्तीच्या भागात पडू शकतात. म्हणून, नासाने पॅसिफिक महासागरातील एक दुर्गम क्षेत्र निवडले आहे, जेणेकरून वातावरणात जळाल्यानंतर उरलेला कचरा याच निर्जन सागरी क्षेत्रात पडेल. नासाच्या मते, आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला दक्षिण प्रशांत महासागराच्या क्षेत्रात 'क्रॅश' केले जाईल. या जागेचे नाव 'पॉइंट नीमो' आहे. ही जागा जुने स्पेस स्टेशन, उपग्रह आणि इतर कचरा विल्हेवाट लावण्यासाठी जागतिक स्तरावर खास निवडली गेली आहे. ◀(वृत्तसंस्था)

### आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाची वैशिष्ट्ये

- अवकाशातील आतापर्यंतची सर्वात मोठी मानवनिर्मित रचना आहे.
- एका दिवसात पृथ्वीला १६ वेळा प्रदक्षिणा घालतो.
- पृथ्वीपासून सुमारे ४०० किमी उंचीवर परिक्रमा करतो.
- बांधकाम-संचालनावर ९.५ लाख कोटी रुपये खर्च झाले आहेत.
- नोव्हेंबर २००० पासून यावर सतत मानवी उपस्थिती आहे.
- अमेरिका, रशिया, युरोप, जपान, कॅनडाचा संयुक्त प्रकल्प आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# खिळखिळ्या पायावर शिक्षणाची इमारत!

सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा करण्यास महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे नवीन महाविद्यालयांना आणि तुकड्यांना गती देण्याचा शासनाचा हेतू आहे. उच्च शिक्षण क्षेत्राला बळकटी देण्याचा विचार होत आहे, हे चांगलेच. पण महाराष्ट्रातील विद्यापीठांची, त्यांच्याशी संलग्न महाविद्यालयांची मूळ व्याधी समजून घेऊनच पुढे गेले पाहिजे. शैक्षणिक गुणवत्तेची झपाट्याने होत असलेली घसरण, जुनाट अभ्यासक्रम सोडायची प्राध्यापकांची तयारी नसणे आणि त्यामुळे वर्ग ओस पडत जाणे, ही खरी समस्या आहे. शाळांसाठी जसे विद्यार्थी शोधले जातात, तसाच शोध आता महाविद्यालयांसाठी आणि विशेषतः विदर्भातील विद्यापीठांच्या 'कॅम्पस'साठीही सुरू झाला आहे. अशा बिकट स्थितीत, विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयांमध्ये 'तुकड्या'चे कागदी घोडे नाचवून कोणता शैक्षणिक चमत्कार घडणार आहे?

नव्या महाविद्यालयांना अंतिम मान्यता देणे, नवीन शाखा, अभ्यासक्रम आणि तुकड्या सुरू करण्याचा निर्णय कागदावर प्रगतिशील वाटू शकेल. पण उच्च शिक्षणाचे वास्तव किती विदारक आहे, हे बघायला कुणीच तयार नाही. याने विद्यार्थ्यांचे नाही, तर संस्थाचालकांचे तेवढे भले होईल, हे समजून घेतले पाहिजे. आज राज्यातील मोजकी चार-दोन विद्यापीठे सोडली, तर बहुतांश विद्यापीठांची शैक्षणिक गुणवत्ता बिकट आहे. एकेकाळी गजबजणारी कला, वाणिज्य आणि विज्ञानाची महाविद्यालये विद्यार्थ्यांची वाट पाहत आहेत. पारंपरिक अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांनी पाठ फिरवली आहे. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे विद्यापीठांचा कालबाह्य ठरलेला अभ्यासक्रम. आजचे जग तंत्रज्ञानाच्या वेगाने पुढे जात असताना, ही विद्यापीठे अद्याप जुन्याच अभ्यासक्रमांच्या चौकटीत अडकून पडली आहेत. 'एआय'चा वापर काळाची गरज असताना, अभ्यासक्रम ठरवणारे अभ्यास मंडळ कोषातून बाहेरच पडायला तयार नाही. काही ठिकाणच्या अभ्यास मंडळांत थोडेबहुत तज्ज्ञ मंडळी असतीलही, पण तेथेही प्रशासकीय उदासीनतेमुळे विद्यार्थ्यांच्या पदरात फारसे काही पडत नाही. परिणामी, पदव्या घेऊन बाहेर पडणारा तरुण रोजगाराच्या बाजारात बाद ठरतो आहे. उदारहणादाखल विदर्भातील गोंडवाना विद्यापीठातील घटत्या विद्यार्थिसंख्येची आकडेवारी बघितली तर धक्का बसेल. २०२०-२२ मध्ये या विद्यापीठांतर्गत ७४ हजार ५६४ विद्यार्थी शिक्षण घेत होते. ते पुढे कमी-कमी होत गेले आणि २०२४-२५ पर्यंत अवघे ५४ हजार ९०९ एवढे उरले. वीस हजार विद्यार्थी कमी झाले. खरे तर विद्यार्थी वाढायला हवेत. महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठांची स्थिती थोड्याफार फरकाने अशीच आहे. एकेकाळी विद्यापीठांच्या कॅम्पसमध्ये शिकायला जाणे हा प्रतिष्ठेचा विषय होता. त्यासाठी स्पर्धा असायची. आता तर आम्ही तुमच्याकडून एकही रुपया घेणार नाही, तुम्ही केवळ आमच्या 'कॅम्पस'मध्ये प्रवेश घ्या, असे म्हणण्याची पाळी या विद्यापीठांवर आली आहे. एवढे करूनही त्यांना विद्यार्थी मिळत नाहीत. या साऱ्या पडझडीत प्राध्यापक वर्गाला सर्वाधिक आत्मपरीक्षणाची गरज आहे. सहाव्या आणि सातव्या वेतन आयोगाचा गलेलठ्ठ पगार खात्यात जमा होणारच याची शंभर टक्के खात्री असल्याने जणू त्यांची अध्यापनाची आणि संशोधनाची ऊर्मी संपली आहे. वर्ग रिकामे राहिले तरी आपल्या पगाराला आणि नोकरीला धक्का लागणार नाही, या मानसिकतेने हा वर्ग बिनधास्त झाला आहे. अपवाद वगळता विद्यापीठातील बहुतांश प्राध्यापक तेच ते शिकवितात. नवे वाचत नाहीत, नवे समजून घेत नाहीत. नेमलेल्या पुस्तकांच्या बाहेर जाणे तर सोडा, पुस्तकातले सुद्धा ज्यांना धड शिकविता येत नाही, असेही प्राध्यापक आहेत.

या मुद्याचा दुसरा आणि अधिक भयंकर पैलू म्हणजे, प्राध्यापक भरतीतील भ्रष्टाचार! नवीन तुकड्या आणि नवीन शाखांना मंजुरी मिळताच, संलग्न महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक भरतीची जाहिरातबाजी सुरू होईल. एव्हाना प्राध्यापक भरती शुद्ध 'व्यापार' झाला आहे. संस्थाचालक एका जागेसाठी एकेक कोटीची उघड बोली लावत आहेत. उमेदवाराची शिकवण्याची पात्रता हा कालबाह्य विषय झाला आहे. जो उमेदवार काहीही करून पैसा देईल, त्याला हमखास नोकरी मिळेल, हे उघड गुपित आहे. पण अशा व्यवहारांचे पुरावे नसतात. कारण घेणाऱ्याची तसेच देणाऱ्याचीही या व्यवहाराला पूर्ण सहमती असते. असे चिरीमिरीबहाद्दर प्राध्यापक उद्या वर्गात जाऊन विद्यार्थ्यांना काय आणि कसे शिकवतील? विद्यार्थी वर्गापासून दुरावण्याचे हेही एक कारण आहे. या सगळ्या दुष्टचक्राला आळा घालायचा असेल, तर प्राध्यापक भरतीची यंत्रणाच पूर्णपणे पारदर्शक होणे अनिवार्य आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत ही भरती व्हावी, हा एक पर्याय नक्कीच आहे. पण ही यंत्रणा सध्या अतिशय संथ आणि वेळखाऊ पद्धतीने कार्य करीत आहे. २०२२ साली जाहिरात केलेल्या पदांच्या मुलाखती एमपीएससी यंदा घेतेय यावरून तिचा वेग काय असेल याचा अंदाज घेता येईल. त्यामुळे एमपीएससी हा पर्याय कितपत योग्य हेही शासनाला ठरवावे लागेल.

शासनाला उच्च शिक्षणाचा दर्जा खरोखर सुधारायचा असेल, तर सर्वांत आधी राज्यासाठी पारदर्शक प्राध्यापक नियुक्ती यंत्रणा उभारली पाहिजे. गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य असेल आणि राजकीय किंवा आर्थिक हस्तक्षेपाला वाव नसेल, असे काम त्या यंत्रणेकडून व्हावे. शिक्षणाचा पायाच खिळखिळा होत असताना, त्यावर नव्या तुकड्यांचे आणि इमारतींचे इमले चढवणे चुकीचेच ठरणार आहे. रिकामे होत चाललेले वर्ग, प्राध्यापक भरतीतील भ्रष्टाचार आणि कोलमडलेली शैक्षणिक गुणवत्ता या मूळ रोगावर उपचार होणे सध्याची गरज आहे. अन्यथा पदव्यांचे कागद दरवर्षी पदवीदान कार्यक्रमांत वाटले जातील, पण महाराष्ट्राचा तरुण जागतिक स्पर्धेत टिकेल का, हा प्रश्न शिल्लक राहील. आजच्या विद्यार्थ्यांना जे हवे ते त्यांना देण्याचा प्रयत्न विद्यापीठांनी नव्या अभ्यासक्रमांतून केला पाहिजे. त्यासाठी गरज भासल्यास संशोधन करावे. मुक्त विद्यापीठाचे कुठेही संलग्नीकरण नाही. त्यांचे वर्गही होत नाहीत. तरीही त्यांच्या पुस्तकांना मोठी मागणी आहे. कारण त्यांचा अभ्यासक्रम आणि त्याची मांडणी सोपी आणि विद्यार्थ्यांना भावणारी आहे. केवळ मुक्त विद्यापीठाची पुस्तके वाचून विद्यार्थी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे उदाहरण आहे. तसा अभ्यासक्रम आणि त्यानुसार पुस्तक निर्मिती व्हावी, असे विद्यापीठांच्या अभ्यास मंडळांना का वाटत नाही, हा आश्चर्याचा विषय आहे. आपल्या विद्यापीठाबाहेर काय चालले आहे, अन्य प्रगत विद्यापीठांचा अभ्यासक्रम कसा आहे आणि विशेषतः त्या त्या परिसरातील उद्योग, आस्थापना आणि रोजगार देणाऱ्या संस्थांना कोणते कौशल्य अपेक्षित आहे, हे जाणून अभ्यासक्रमाची आखणी करण्याची गरज आहे. पण ती महाराष्ट्रातील बहुतांश विद्यापीठांतून होत नाही, हे वास्तव आहे. गरज असेल तर प्रगत विद्यापीठांच्या तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापकांना अभ्यासक्रम तयार करण्यासाठी आमंत्रित केले पाहिजे. स्वायत्त विद्यापीठांमधील विद्यार्थिसंख्या का कमी झाली नाही, कारण ते परिस्थितीनुसार बदलले आहेत. याचा विचार पारंपरिक सरकारी विद्यापीठांनी गांभीर्याने केला पाहिजे. विद्यार्थ्यांना दैनंदिन अभ्यासक्रमाऐवजी 'एक्स्ट्रा करिक्युलर'चेही आकर्षण असते. त्यानुसार त्यांना उत्तम पॅकेज दिले पाहिजे. वर्गखोलीच्या पलीकडे जाऊन त्यांना घडविले पाहिजे. वर्गात विद्यार्थी आला तरच आम्ही शिकवू, हा प्राध्यापकांचा आग्रह त्यांना सोडावा लागेल. विद्यार्थी कसा वर्गात येईल, यासाठी त्यांना प्रयत्न करावेच लागतील. प्राध्यापकांचे वारंवार प्रशिक्षण होत राहिले पाहिजे. जशी विद्यार्थ्यांची 'इंटर्नशिप' होते, तशी ती प्राध्यापकांचीही व्हायला हरकत काय? अगदी वर्षागणिक जग आणि तंत्रज्ञान बदलत आहे. त्यामुळे अद्ययावत ज्ञानप्राप्तीसाठी हे आवश्यक आहे. लहान लहान 'स्किल डेव्हलपमेंट कोर्सेस' जोडले पाहिजेत आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, आता प्रत्येक अभ्यासक्रमात 'एआय'चा वापर कसा करता येईल, हे बघितले पाहिजे. एकूण काय तर, अद्ययावत अभ्यासक्रम, उत्तम सुविधा, शिस्त, उपक्रम आणि संशोधन या गोष्टींवर भर दिल्याशिवाय विद्यापीठांची परिस्थिती सुधारणार नाही. शासनाचे निर्णय कागदावरच ठेवण्यात आपले शैक्षणिक क्षेत्र तरबेज आहे, हे सांगणे न लगे!

## प्रासंगिक

# जनतेच्या विश्वासातून घडले ऐतिहासिक पर्व

**नितीश कुमार**

भारतासारख्या विशाल व अटीतटीच्या स्पर्धात्मक लोकशाहीत जनतेचा विश्वास कमावणे व तो टिकवणे खूप कठीण आहे. तरीही, सर्व प्रकारच्या राजकीय स्पर्धेला पुरून उरत व जनतेचा विश्वास संपादन करत नरेंद्र मोदी यांनी जनमनातील आपले स्थान अढळ ठेवले आहे. लोकशाही राजकारणाला एका निराळ्या उंचीवर नेऊन ठेवत त्यांनी सातत्याने सर्वांत जास्त काळ कार्यरत असलेले लोकनियुक्त पंतप्रधान म्हणून आपली कारकीर्द गाजवली आहे. आम्ही दोघेही देशातल्या दोन निराळ्या भागांचे रहिवासी असलो, तरीही आणिबाणीच्या अवघड काळातून राजकारणाचे धडे गिरवत पुढे आलेल्या पिढीचे प्रतिनिधी आहोत. लोकशाही स्वातंत्र्यावर झालेले आक्रमण आम्ही प्रत्यक्ष पाहिले असून त्या स्वातंत्र्याची पुनर्स्थापना करण्याच्या चळवळीत आम्ही सहभागी होतो. आमच्यासारख्या अनेकांनी आणिबाणीच्या प्रतिकारातून लोकशाही मूल्यांची शिकवण घेत सार्वजनिक आयुष्याची सुरुवात केली.

देशाच्या लोकशाहीतील सर्वोच्च पदांवर जणू काही मोजक्या राजकीय कुटुंबांचाच हक्क असतो की काय असा समज गेली काही दशके पोसला गेला होता. पंतप्रधान मोदींच्या कारकीर्दीने त्या गैरसमजाला मोठा हादरा दिला आहे. एका अतिसामान्य परिस्थितीत वाढलेल्या माणसाने देशाच्या सर्वोच्च लोकनियुक्त पदापर्यंत मजल मारून देशातील तळागाळातील लाखो युवकांना प्रेरणा दिली आहे. त्यांनी हे सिद्ध करून दाखवले आहे की अथक परिश्रम, दृढनिश्चय आणि कार्यक्षमता याला चैतन्यमयी लोकशाही मूल्यांची जोड मिळाली तर जन्माधिष्ठित परिस्थितीवर मात करून उच्च ध्येय गाठता येते. त्या दृष्टीने हा ऐतिहासिक टप्पा म्हणजे केवळ वैयक्तिक यश नसून भारतीय लोकशाहीच्या शक्तीचे व खुलेपणाचे एक ठोस प्रकटीकरण आहे.

डॉ. राम मनोहर लोहिया, लोकनायक जयप्रकाश नारायण आणि इतरही अनेक महान समाजवादी नेते माझे आदर्श होते. त्यामुळे माझ्यासाठी राजकारण हे साध्य नसून जनतेची सेवा करण्याचे एक साधन होते. देशातील जनतेला गरिबीच्या विळख्यातून बाहेर काढून सन्मानाचे जीवन देण्यास साहाय्यभूत ठरणे हेच कोणत्याही राजकीय नेत्याचे उद्दिष्ट असायला हवे. त्याबाबतीत पंतप्रधान मोदी यांची कामगिरी खूपच चमकदार आहे. दारिद्र्य निर्मूलन हेच प्रमुख उद्दिष्ट ठेवल्याने राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने सुमारे २५ कोटी लोकांना गरिबीतून बाहेत काढण्यास मदत केली आहे. कोट्यवधी जनतेसाठी शौचालये, बँक खाती, घरे, गॅस जोडण्या, नळावाटे पाणी, आरोग्य विमा छत्र आणि इतरही अनेक मूलभूत गरजा उपलब्ध झाल्या आहेत.

अनुसूचित जाती- जमाती, मागासवर्गीय, अतिमागासवर्गीय, महिला, गरीब कुटुंबे, तसेच विकास कार्यक्रमांचे पहिल्या पिढीतील लाभार्थी या सर्वांनाच देशाच्या प्रगतीच्या यशोगाथेतील त्यांचे योगदान किती महत्त्वाचे आहे याची जाणीव झाली आहे. अनेक विशेष योजनांमधून देशातील युवकांना उद्योजकतेचे जग खुले झाले आहे. या सर्व गटांना देशाच्या प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणल्यामुळे सामाजिक न्याय प्रदान करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.



महिलांचे कल्याण व त्यांना सन्मान मिळवून देण्याला पंतप्रधान मोदी यांनी खूप महत्त्व दिले आहे. महिलांच्या रोजच्या जीवनात त्यांचे कष्ट कमी करणे व त्यांना थेट दिलासा मिळवून देण्यासाठी त्यांनी अनेक योजना सुरू केल्या. बिहारमध्ये मी हे प्रत्यक्ष पहिले आहे की विकास प्रयत्नांमध्ये महिला केंद्रस्थानी असतील तर समाजाची प्रगती वेगाने होऊ शकते. आमच्या जीविका प्रयोगाला मिळालेल्या यशाचा आता जगभरात बोलबाला आहे. विकास योजनांचा लाभ अपेक्षित लाभार्थींपर्यंत पोहोचण्यात किती अडथळे येऊ शकतात हे अनेक वर्षे मुख्यमंत्रिपदावर कार्यरत असल्यामुळे मला चांगलेच ज्ञात आहे. केवळ सद्हेतू असणे पुरेसे नसते, कार्यक्षम अंमलबजावणी खूप महत्त्वाची आहे. धोरणात्मक निर्णयांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना सातत्यपूर्ण देखरेख, सुधारणा, प्रशासकीय कृती व बारकाव्यांकडे पूर्ण लक्ष देणे किती महत्त्वाचे असते, याची मला जाणीव आहे. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाचे खास वैशिष्ट्य म्हणजे सुशासनाचा नागरिकांना थेट फायदा देण्यावर त्यांचा असलेला भर. कल्याणकारी योजना अथवा पायाभूत सुविधा असोत की दैनंदिन शासकीय काम असो, त्यांचा भर सतत कार्यक्षमता, पारदर्शकता व उत्तरदायित्व यांच्यावर राहिला आहे. तंत्रज्ञानाचा वापर वाढवून थेट लाभ हस्तांतरण व सशक्त देखरेख व्यवस्था अंगीकारून त्यांनी प्रत्यक्ष धोरण व त्याच्या अंमलबजावणीतील तफावत कमी करत आणली आहे. आता सरकारी योजनांचे लाभ, त्यांची गळती न होता, थेट लाभार्थींपर्यंत पोहोचत असल्याने शासकीय यंत्रणेवरचा जनतेचा विश्वास वाढतो आहे. पंतप्रधानांचा जनतेशी सातत्यपूर्ण संवाद सुरू असल्यामुळे सरकार आणि नागरिकांमधील नाते अधिक बळकट होते आहे.

गुजरातच्या मुख्यमंत्रिपदाची प्रदीर्घ आणि यशस्वी कारकीर्द हा पंतप्रधान मोदींच्या राजकीय प्रवासातील मोठा भाग आहे. किंबहुना, सलगपणे निवडून आलेल्या सरकारचे प्रमुख म्हणून त्यांच्या कार्यकाळाला लवकरच २५ वर्षे पूर्ण होतील. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील या अनुभवामुळे त्यांना विविध राज्यांच्या गरजा आणि त्यासाठी त्यांना पाठबळ पुरवणे महत्त्वाचे आहे ही गोष्ट ठावूक झालेली आहे. त्यांच्या पंतप्रधानपदावरील कार्यकाळात सहकारी संघराज्यवादाबद्दलची त्यांची दृढ कटिबद्धताही ठळकपणे दिसून आली आहे. राजकीय परिस्थिती कशीही असली तरीही, बिहारच्या विकासासाठी त्यांनी दिलेला पाठिंबा मी स्वतः माझ्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात अनुभवला आहे. विशेषतः २०२४-२५ आणि २०२५-२६च्या अर्थसंकल्पांमध्ये बिहारसाठी भरघोस प्रमाणात दिल्या गेलेल्या आर्थिक मदतीचा मी आवर्जून उल्लेख करेन. मखाना बोर्डाची स्थापना, भागलपूर येथील वीज प्रकल्प, तसेच पूर व्यवस्थापन आणि विविध पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांसाठी निधी यांसारख्या तरतुदींचा त्यामध्ये समावेश आहे. पंतप्रधान मोदींना बिहारची अद्वितीय संस्कृती आणि परंपरांबद्दलही नितांत आदर आहे. त्यांनी आंतरराष्ट्रीय मान्यवरांना मखाना, मधुबनी चित्रे आणि राज्यातील इतर उत्पादने भेट देऊन बिहारचा वारसा जागतिक मंचावर प्रदर्शित केला आहे. जननायक कर्पूरी ठाकूर यांचा भारतरत्न सन्मानाने गौरवण्याची अनेक दशकांपासून प्रलंबित असलेली मागणी पूर्ण होण्यात पंतप्रधान मोदींचीच महत्त्वाची भूमिका होती. गेल्या दशकात बिहारला अनेक मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचा लाभ झाला आहे. २०१४ पूर्वीच्या दशकाच्या तुलनेत, केंद्र सरकारकडून राज्याला मिळणारे आर्थिक पाठबळ आणि गुंतवणूक यात लक्षणीय वाढ झाली आहे. गंगा नदीवरील महत्त्वाचे पूल, राष्ट्रीय महामार्गांचा विस्तार, विमानतळांचा विकास आणि रेल्वेच्या पायाभूत सुविधांमधील जलद सुधारणा बिहारच्या विकासाला चालना मिळण्यासाठी सहायक ठरत आहेत. रेल्वेच्या पायाभूत सुविधांमध्ये होत असलेले परिवर्तन विशेष कौतुकास्पद म्हणावे लागेल. वंदे भारतसारख्या नवीन गाड्या सुरू केल्यामुळे प्रवास करणे अधिक सुलभ झाले आहे. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली रेल्वेचे विद्युतीकरण आणि इतर आधुनिकीकरण प्रकल्पांनी उल्लेखनीय गती घेतली असून, यामुळे रेल्वेचे स्वच्छ आणि कार्यक्षम जाळे निर्माण होण्यास मदत झाली आहे. मी नेहमीच भ्रष्टाचाराबाबत शून्य सहिष्णुतेचे धोरण अवलंबले असून त्याला माझा कायमच पाठिंबा राहिला आहे. पंतप्रधान मोदींची निष्कलंक प्रतिमा आणि भ्रष्टाचाराच्या विरोधातील त्यांची ठाम भूमिका हा महत्त्वाचा गुण हे त्यांच्या लोकप्रियतेचे मुख्य कारण आहे. अनेक दशके सत्तास्थानी राहूनही ज्यांच्या निष्ठेवर एकही डाग लागलेला नाही, असे नेते अभावानेच आढळतात. संस्थात्मक सुधारणांद्वारे भ्रष्टाचाराचे मार्ग रोखण्यासोबतच भ्रष्ट राजकारणी आणि अधिकाऱ्यांविरुद्ध कायदेशीर प्रक्रियेद्वारे कारवाई करण्याची राजकीय इच्छाशक्ती त्यांनी दाखवून दिली आहे. जागतिक पटलावर भारताचा वाढलेला प्रभाव हा पंतप्रधान मोदींच्या कार्यकाळाचा एक उल्लेखनीय पैलू होय. अर्थव्यवस्था, हवामान बदल, तंत्रज्ञान, आरोग्य किंवा परस्पर सहकार्य यासारख्या विषयांवर जेव्हा देशाचे मत आदराने स्वीकारले जाते, तेव्हा एक भारतीय म्हणून मला अभिमान वाटतो. विविध देशांशी आणि गटांशी दृढ संबंध जपण्यासोबतच, पंतप्रधान मोदींनी सातत्याने शांतता आणि प्रगतीचा पुरस्कार केला आहे.

परिणामी, २१ व्या शतकातील जागतिक विकासाचा एक प्रमुख चालक म्हणून जग आपल्या देशाकडे आशेने पाहत आहे. सार्वजनिक जीवनातील अनेक दशकांच्या अनुभवावरून, नेतृत्वासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न,परिश्रम आणि शिस्त असणे आवश्यक असते हे मला उमगलेले आहे. सतत प्रवास, नियमितपणे लोकांचा संपर्क व सरकारी कामांचा तपशीलवार आढावा घेत राहणे गरजेचे असते; त्याच्याच जोडीला व्यापक ध्येयाशी किंवा महत्त्वाकांक्षी ध्येयाशीही जोडलेले राहण्याची क्षमताही महत्त्वाची ठरते. पंतप्रधान मोदींची अफाट ऊर्जा आणि समर्पण यामुळेच त्यांना इतक्या प्रदीर्घ काळापर्यंत लोकांचा विश्वास टिकवून ठेवणे शक्य झाले आहे. सलग निवडून येऊन सर्वाधिक काळ भारताचे पंतप्रधान भूषवणारे नेते हा लौकिक प्राप्त करण्याचा महत्त्वाचा टप्पा गाठत असताना, पंतप्रधान मोदींच्या सार्वजनिक जीवनातील योगदानाचा गौरव करण्यासाठी आणि भविष्यात असे आणखी अनेक टप्पे गाठण्याकरिता त्यांना शुभेच्छा देण्यासाठी ही चांगली संधी आहे. या ऐतिहासिक कामगिरीबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो आणि त्यांना उत्तम आरोग्यासाठी तसेच राष्ट्रसेवेत निरंतर यश मिळत राहावे यासाठी शुभेच्छा देतो.

(लेखक राज्यसभेचे सदस्य आणि बिहारचे माजी मुख्यमंत्री आहेत.)

## वेध

**नीलेश जोशी**

# दूषित अन्न आरोग्याला धोकादायक

दूषित अन्न ही समस्या आज केवळ एखादे गाव, शहर, राज्य किंवा देशापुरती मर्यादित नसून जागतिक समस्या असल्याचे दिसून येते. सार्वजनिक आरोग्य, अर्थव्यवस्था आणि अन्न सुरक्षेला आव्हान देणारे हे संकट दिवसेंदिवस अधिक गडद होत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार दरवर्षी ८६ कोटी लोक दूषित अन्नामुळे आजारी पडतात तर १५ लाख नागरिकांचा बळी जातो. दूषित अन्न म्हणजे असे अन्न ज्यामध्ये जिवाणू, विषाणू, परजीवी, बुरशी, रासायनिक घटक, जड धातू किंवा इतर घातक पदार्थ मिसळलेले असतात. हे दूषितीकरण उत्पादन, साठवणूक, वाहतूक, प्रक्रिया किंवा विक्रीच्या कोणत्याही टप्प्यावर होऊ शकते. अनेकदा ग्राहकांना अन्न सुरक्षित असल्याचे दिसत असले, तरी त्यामध्ये असलेले अदृश्य रोगकारक घटक गंभीर आजारांना कारणीभूत ठरतात. बदलती जीवनशैली, औद्योगिक शेती, रासायनिक वापर आणि हवामान बदल यामुळे ही समस्या गुंतागुंतीची ठरत आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार दूषित अन्नाचा फटका बसणाऱ्यांमध्ये पाच वर्षांखालील शिशूंची संख्या अधिक आहे, हे आणखी धोकादायक म्हणावे लागेल. जगात दूषित अन्नामुळे आजारी पडलेल्या व्यक्तींची आकडेवारी पाहता हा प्रश्न केवळ अन्न सुरक्षेचाच नव्हे, तर सार्वजनिक आरोग्य यंत्रणेसमोरील हे मोठे आव्हान आहे. दूषित अन्नामुळे होणाऱ्या आजारांमध्ये अतिसार, उलट्या, ताप, पोटदुखी, टायफाईड, कॉलरा, हिपॅटायटिस-ए आदी आजार उद्भवू शकतात. अनेकदा मूत्रपिंड निकामी होणे, यकृताचे विकार, कर्करोग आणि मज्जासंस्थेचे आजार होण्याची शक्यता असते. अनेक रासायनिक प्रदूषकांचा दीर्घकालीन परिणाम वर्षानुवर्षे शरीरावर होत राहतो आणि त्याचे परिणाम नंतर गंभीर स्वरूपात दिसून येतात. दूषित अन्नामागील प्रमुख कारणांमध्ये जिवाणूजन्य संसर्ग हा सर्वात मोठा घटक आहे. साल्मोनेला, कॅम्पिलोबॅक्टर, ई-कोलाई आणि लिस्टेरिया हे जिवाणू जगभरातील अन्नजन्य आजारांसाठी कारणीभूत ठरतात. पूर्ण न शिजलेले मांस, दूषित दूध, कच्ची फळे आणि भाज्या, अयोग्य तापमानात साठवलेले पदार्थ यामुळे हे जिवाणू मोठ्या प्रमाणात पसरतात. विषाणूजन्य संसर्गदेखील तितकाच धोकादायक आहे. नोरोव्हायरस आणि हिपॅटायटिस-ए हे विषाणू दूषित पाणी किंवा अन्नाद्वारे पसरतात. स्वच्छतेचा अभाव, हात न धुता अन्न तयार करणे आणि दूषित जलस्रोतांचा वापर ही त्यामागील प्रमुख कारणे आहेत. अन्न घटकांमध्ये आढळणारे जीव घेणे रासायनिक घटक ही देखील मोठी समस्या आहे. कीटकनाशक, रासायनिक खते, पशुखाद्यामधील औषधांचे अवशेष यासह प्रक्रिया केलेल्या अन्नातून मानवी आरोग्याला धोकादायक रसायनांचे सेवन मेंदू, यकृत, मूत्रपिंड आणि मज्जासंस्थेवर परिणाम करतात.



आपल्या देशात अन्न सुरक्षेसाठी कायदेशीर व्यवस्था, प्राधिकरण कार्यरत असले, तरी अनेक ठिकाणी भेसळ, अस्वच्छ प्रक्रिया, कालबाह्य आणि निकृष्ट दर्जाचे अन्नपदार्थ विकले जात असल्याची प्रकरणे सातत्याने समोर येतात. दूध, तेल, मसाले, मिठाई, फळे, भाज्या आणि पाकीट बंद खाद्यपदार्थांमध्ये भेसळीची समस्या चिंताजनक आहे. शहरी भागात फास्ट फूड आणि रस्त्यावरील खाद्यपदार्थांची लोकप्रियता वाढत असली, तरी त्या ठिकाणी स्वच्छतेचे नियम पाळले जातात का? हा प्रश्न नेहमीच अनुत्तरित राहतो. तेथील दूषित पाणी, अस्वच्छ भांडी, अयोग्य साठवणूक आणि अन्न हाताळणीमुळे ग्राहकांच्या आरोग्याला धोका निर्माण होतो. महानगरांपासून छोट्या शहरांपर्यंत अन्न भेसळीविरोधी कारवाया सातत्याने केल्या जातात. दूध, मावा, मिठाई, खाद्यतेल आणि मसाल्यांमधील भेसळ उघड करणाऱ्या बातम्या समोर येतात. पण ही समस्या समूळ नष्ट होणे तर सोडाच; दिवसेंदिवस नवनवीन युक्तींद्वारे भेसळीचे विविध प्रकार समोर येतात. वास्तविक सुरक्षित अन्न हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे. या हक्काचे संरक्षण करण्यासाठी शासन, उद्योजक, शेतकरी आणि ग्राहक यांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. जागतिक आरोग्य संघटनेने अहवालातून मांडलेली आकडेवारी धक्कादायक आहे. या आकडेवारीचा विचार करता दूषित अन्नाचे संकट हे दिवसेंदिवस अधिक बिकट होत आहे. खरं म्हणजे सुरक्षित अन्नाशिवाय निरोगी समाज आणि शाश्वत विकासाची कल्पना शक्य नाही. पुढील काळात दूषित अन्नाविरुद्धच्या लढाईसाठी समाजातील संस्था, संघटनांनी एकवटणे आवश्यक आहे.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

# राजकारणातील विक्रमादित्य

**श्यामकांत जहागीरदार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १० जून २०२६ ला आपल्या सरकारची १२ वर्षे तर पूर्ण केली, त्याचवेळी निर्वाचित पंतप्रधान म्हणून सत्तेवर राहण्याचा देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा विक्रमही मोडला. त्यामुळे १० जून हा भारतीय राजकारणाच्या इतिहासातील ऐतिहासिक दिवस म्हणावा लागेल. विकसित भारताचे स्वप्न पाहणाऱ्या आणि त्या दृष्टीने कामाला लागणाऱ्या मोदी यांची ही उपलब्धी सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखी म्हणावी लागेल.

जवाहरलाल नेहरू ४३९८ दिवस पंतप्रधान होते, पण मोदी यांनी ४३९९ दिवस पंतप्रधान पदावर काम करीत त्यांचा हा विक्रम मोडला. नेहरू यांनी जवळपास १७ वर्षे देशाचे पंतप्रधानपद भूषविले. १५ ऑगस्ट १९४७ पासून १९५२ पर्यंत देशातील अंतरिम सरकारचे नेतृत्व त्यांनी केले. म्हणजे या पाच वर्षांत त्यांचा कार्यकाळ अंतरिम पंतप्रधान असा होता. १९५२ मध्ये झालेल्या लोकसभेच्या पहिल्या निवडणुकीत नेहरूंनी निर्वाचित पंतप्रधान म्हणून पहिल्यांदा शपथ घेतली. तेव्हापासून नेहरू आपला मृत्यू होईपर्यंत म्हणजे २७ मे १९६४ पर्यंत पंतप्रधान होते. पंतप्रधानपदाचा त्यांचा हा कार्यकाळ ४३९८ दिवसांचा होता. मोदी यांनी नेहरूंचा हा विक्रम मोडला आहे. जवळपास १७ वर्षे पंतप्रधान राहण्याचा नेहरू यांचा दुसरा विक्रमही मोदी मोडतील, यात शंका नाही.

मोदी यांच्या सरकारला १२ वर्षे पूर्ण झाली, पण या काळात त्यांच्यावर एकाही विरोधी पक्षाला भ्रष्टाचाराचा एकही आरोप करता आलेला नाही. २०१४ च्या आधीच्या संपुआच्या सरकारवर भ्रष्टाचाराचा आरोप नाही तर आरोपांची मालिका लागली होती. त्यावेळी पाताळापासून आकाशापर्यंतचे एकही असे क्षेत्र नव्हते, ज्यात काँग्रेसच्या मंत्र्यांनी भ्रष्टाचार केला नसेल. बरं, हा भ्रष्टाचारही साधासुधा नाही तर काही लाख कोटी रुपयांचा होता. त्यामुळेच २०१४ मध्ये सत्तेवर आल्यानंतर मोदी यांनी 'न खाऊंगा न खाने दुंगा' अशी शपथ घेतली.

देशात आजपर्यंत कोणत्याच पंतप्रधानाला जो विक्रम करता आला नाही, तो मोदी यांनी करून दाखवला. देशात आतापर्यंत अनेक पंतप्रधान होऊन गेले आणि पुढेही होतील, पण मोदी यांनी पंतप्रधान म्हणून देशासाठी जे केले, ते त्यांच्या आधीच्या पंतप्रधानांनाही करता आले नाही आणि पुढे होणाऱ्या पंतप्रधानांना करता येईल, असे वाटत नाही. भारतीय क्रिकेटमध्ये भारतरत्न सचिन तेंडुलकर यांनी जो विक्रम केला तसेच अनेक विक्रम मोदी यांनी हातात बॅट न घेताही केले आहेत. त्यामुळे सचिन हा क्रिकेटमधील विक्रमादित्य असेल तर मोदी यांना राजकारणातील विक्रमादित्य म्हणावे लागेल. सचिनला भारतरत्न मिळाला आहे, तर मोदींना औपचारिकपणे भारतरत्न मिळाले नसले, तरी भारतीय जनतेने ही सर्वोच्च पदवी त्यांना मनोमन कधीच देऊन टाकली आहे. देशात खऱ्या अर्थाने भारतरत्न पदवी न मिळताही कोणी भारतरत्न असेल तर ते पंतप्रधान मोदी आहेत. २६ मे २०१४ ला मोदी यांनी पहिल्यांदा देशाचे पंतप्रधान म्हणून सूत्रे स्वीकारली. त्यानंतर २०१९ मध्ये दुसऱ्यांदा आणि २०२४ मध्ये तिसऱ्यांदा त्यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली. सलग तीन वेळा पंतप्रधानपदाची शपथ घेणारे मोदी देशातील पहिले गैरकाँग्रेसी पंतप्रधान आहेत. अटलबिहारी वाजपेयी सोडले तर आतापर्यंत देशातील कोणत्याच गैरकाँग्रेसी पंतप्रधानाला पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करता आला नाही. आतापर्यंत जो विक्रम काँग्रेसच्या विशेषत: गांधी घराण्यातील नेत्यांच्या नावावर होता, त्याची मोदी यांनी फक्त बरोबरीच केली नाही तर तो मोडलाही. कोण किती जगला यापेक्षा कसा जगला याला महत्त्व असते, त्याचप्रमाणे मोदी यांचा पंतप्रधानपदाचा एक तपाचा कार्यकाळ अनेक ऐतिहासिक निर्णयांनी आणि घटनांनी गाजला. आतापर्यंत जे निर्णय घ्यायची देशातील कोणत्याच पंतप्रधानांची हिंमत होत नव्हती, असे अनेक निर्णय चुटकीसरशी घेत मोदी यांनी देशातील जनतेचे मन जिंकले. महत्त्वाचे म्हणजे मोदी यांनी लोकप्रिय होत निवडणुका जिंकण्यासाठी हे निर्णय घेतले नाहीत तर देशाच्या व्यापक हितांसाठी हे निर्णय घेतले आहेत.

मोदी यांनी १२ वर्षांत घेतलेले निर्णय शेकडोत असले, तरी त्यांच्या ऐतिहासिक महत्त्वाच्या अशा निर्णयाची संख्या डझनभर तरी नक्कीच आहे. जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७० कलम रद्द करण्याचा ऐतिहासिक निर्णय मोदी सरकारने घेतला. तीन तलाकचा निर्णय अवैध ठरवित त्यांनी मुस्लिम महिलांना न्याय मिळवून दिला. देशातील समस्त महिला वर्गासाठी त्यांनी नारी शक्ती वंदन विधेयक संसदेत पारित करून घेतले. विधानसभा आणि लोकसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारे हे विधेयक आहे.

जीएसटी कर सुधारणेच्या मोदी यांच्या निर्णयाने देशाच्या अर्थव्यवस्थेत क्रांती झाली. देशातील ८० कोटी जनतेला मोफत धान्य पुरविणारी मोदी यांची खाद्य सुरक्षा योजना अशीच अभिनव म्हणावी लागेल. आयुष्मान भारत योजनेतून मोदी यांनी देशातील गोरगरीब जनतेला पाच लाखांपर्यंतच्या मोफत वैद्यकीय उपचाराची व्यवस्था उपलब्ध करून दिली. अयोध्येतील राम जन्मभूमीवर रामललाचे मंदिर बांधून मोदी यांनी देशातील कोट्यवधी लोकांच्या कित्येक वर्षांपासून पाहिलेल्या स्वप्नांची पूर्तता केली. ११ एप्रिल २०१६ ला मोदी यांनी देशात युपीआयची सुरुवात केले. यामुळे देशाच्या आर्थिक क्षेत्रात एकप्रकारची क्रांती झाली. देशात कॅशलेस (रोखविरहित) व्यवहारांना प्रोत्साहन मिळाले. १४ ऑगस्ट २०१४ ला मोदी यांनी देशात जनधन योजनेची सुरुवात केली. गोरगरीब जनतेची खाती बँकेत उघडून दिली. ८ एप्रिल २०१५ ला मोदी सरकारने मुद्रा योजना लागू केली. यामुळे २० लाख रुपयापर्यंतचे कर्ज बँकेतून घेणे सुलभ झाले. २०१४ मध्ये देशाचे सकल राष्ट्रीय उत्पन्न १९४९ खरब रुपये होते, ते २०२५ मध्ये ३९६५ खरब रुपयांवर पोहोचले.

उज्ज्वला योजना मोदी सरकारची अशीच अतिशय महत्त्वाकांक्षी योजना आहे. स्वच्छ भारत ही योजना मोदी सरकारची अशीच लक्षवेधी योजना होती. मेक इन इंडिया म्हणजे आत्मनिर्भर भारताच्या योजनेला मोदी यांनी गती दिली, त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली. शेतकऱ्यांसाठी मोदी सरकारने १२ वर्षांत जेवढे निर्णय निर्णय घेतले तेवढे काँग्रेस शासनाच्या ६० वर्षांतही घेण्यात आले नाही. समाजातील शोषित, पीडित, दलित, वंचित जनतेला मोदी सरकारने न्याय दिला, त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवले. देशात रस्ते आणि महामार्गांचे जाळे विणण्यात आले. पायाभूत सुविधांच्या विकासाला गती मिळाली. नक्षलवादाच्या समस्येच्या मुळावर घाव घातला, देशातून नक्षलवाद संपुष्टात येईल, अशी कल्पनाही कोणी नसेल, पण मोदी सरकारने नक्षलवादाची समस्या संपवली. दहशतवादाच्या मुद्यावरही मोदी सरकारच्या 'घर मे घुस के मारेंगे'च्या धोरणाचा अनुभव देशवासीयांसोबत जगानेही घेतला आहे. संकल्प आणि सेवेचे अनेक नवे कीर्तिमान मोदी सरकारने स्थापित केले. मोदी सरकारची १२ वर्षे विश्वास, विकास आणि जनकल्याणासाठी समर्पित होती. मोदी यांनी आपल्या कार्यपद्धतीने देशाचा चेहरामोहरा बदलवून टाकला. मोदी सरकारच्या १२ वर्षांतील उपलब्धी १२०० पेक्षा जास्त म्हणाव्या लागतील. पंडित नेहरू तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आले, तर मोदी यांचा जन्म एका अतिशय गरीब घरात झाला. त्यामुळे मोदी यांना गरिबांच्या कष्टाची, समस्यांची आणि वेदनांची जाणीव होती. त्यांच्या सर्व निर्णयातून याचा प्रत्यय येतो. मोदी जबाबदार राजकीय नेते असले तरी संवेदनशील व्यक्तीही आहेत. मोदींसारखा पंतप्रधान देशाला मिळाला, हे देशाचे आणि आपलेही भाग्य म्हणावे लागेल. मोदी यांच्या नेतृत्वात विकसित भारताच्या दिशेने आपला प्रवास असाच अव्याहत सुरू राहील, एक दिवस भारत विश्वगुरू झाल्याशिवाय राहणार नाही, यात शंका नाही.

९८८१७१७८१७

## वाचक पत्र

### ब्रिक्स : देशाचे आर्थिक व्यवस्थापन व सुरक्षिततेचे संघटन

बी. आर. आय. सी. एस. या इंग्रजी आद्याक्षरांचा वापर करून ब्रिक्स हे नाव तयार करण्यात आले. ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या पाच प्रमुख विकसनशील देशांनी एकत्रित येऊन स्थापन केलेली वित्तीय संस्था जी व्यापारी, राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक सुरक्षितता मजबूत करण्याबाबतच्या राबविण्यात येणाऱ्या कार्याच्या उद्देशानेच स्थापन झालेली आहे. पाश्चात्त्य देशाचे वर्चस्व कमी करून ब्रिक्स अंतर्गत समाविष्ट संघटनेतील देशांची अर्थव्यवस्था वृद्धिंगत होण्यासाठी देशांमध्ये सहकार्य वाढविणे शिवाय डॉलरला पर्याय म्हणून एक स्थिर चलन निर्माण करणे हे या संघटनेचे उद्दिष्ट आहे. तसेच ब्रिक्स हे ४० टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करत आहे. या संघटनेतील सदस्य देशांचा जागतिक शांतता, रक्षणात महत्त्वाचा वाटा असून अमेरिकेच्या प्रभावाखाली असलेल्या जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी संस्थांशी स्पर्धा करण्याकरिता जोरदार प्रयत्न ब्रिक्स संघटनेमार्फत चालू आहे.

अफगाणिस्तान, अर्जेंटिना, इंडोनेशिया, टर्की, इजिप्त, इराण, नायजेरिया, सुदान, सीरिया, बांगलादेश आणि ग्रीससारख्या अनेक देशांनी ब्रिक्सचे कायमस्वरूपी सदस्य बनण्याची इच्छा व्यक्त केलेली आहे. यामुळे ब्रिक्स केवळ पाच देशांचे संघटन न राहता प्रस्तावित देशांचा समावेश केल्यानंतर ब्रिक्स + म्हणून ओळखले जाईल.

१ जानेवारी २०२६ रोजी भारताने ब्रिक्सचे अध्यक्षपद स्वीकारले असून यात भारताची भूमिका व्यापक जागतिक कल्याणासाठी ब्रिक्स देशांची क्षमता एकत्र आणणे ही आहे. भारताच्या नेतृत्वाखाली ब्रिक्स देश जागतिक व्यवस्थेत आशिया आणि आफ्रिकेच्या प्रभावाला चालना देत आहे तर भारतीय रिझर्व्ह बँकेच्या प्रस्तावानुसार भारत ब्रिक्स देशांसोबत अमेरिकी डॉलरच्या अस्थिरतेचा आणि पाश्चात्त्य निर्बंधाचा प्रभाव कमी करण्यासाठी एक डिजिटल पेमेंट प्रणाली विकसित करण्याची योजना साकारत आहे. ज्यामुळे स्थानिक चलनामध्ये आंतरराष्ट्रीय व्यवहार करणे सहज शक्य होईल. तसेच अमेरिकन डॉलरऐवजी स्थानिक चलनाचा वापर करण्यावर भर देण्याबाबत आणि डॉलरचे वर्चस्व कमी करण्यासाठी संघटन कार्यरत आहे.

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# नोडल अधिकाऱ्यांनी दिलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी

## जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांच्या सूचना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० जून-**

महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या सर्व नोडल अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी. व ही निवडणूक अत्यंत शांततामय वातावरणात व यशस्वीपणे पार पाडावी असे आवाहन जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित विधान परिषद निवडणूक स्थानिक प्राधिकरण मतदार संघ बाबत नियुक्त सर्व नोडल अधिकारी यांच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कार्तिकेयन मार्गदर्शन करत होते. पोलीस विभागाने ज्यांच्याकडे शस्त्रे आहेत त्या जमा करण्याची कारवाई तात्काळ पूर्ण करावी. निवडणुकीच्या अनुषंगाने चेक पोस्टवर तपासणी मोहीम अत्यंत बारकाईने राबवावी. मतमोजणी झाल्यानंतर मत पेट्या ठेवण्यासाठीची स्ट्राँग रूम तयार करावी. मतदान केंद्रावर आरोग्य पथके नियुक्त करावीत. तसेच सर्व संबंधित नोडल अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर सोपवण्यात आलेले जबाबदारी परस्परात योग्य समन्वय ठेवून पार पाडावी अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिल्या.


यावेळी निवडणूक निरीक्षक श्रवण हार्डीकर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय कबाडे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उप जिल्हा निवडणूक अधिकारी सुशांत बनसोडे, उप जिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, समाज कल्याण सहायक आयुक्त सुलोचना सोनवणे, अन्य धान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांच्या सह अन्य नोडल अधिकारी उपस्थित होते.



### मतदारांना मतदान केंद्राची माहिती द्या

महाराष्ट्र विधान परिषद सोलापूर स्थानिक मतदार संघ निवडणुकीसाठी एकूण ६१६ मतदार आहेत. तसेच १८ जून रोजी जिल्ह्यातील सहा मतदान केंद्रावर यासाठी मतदान प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. तरी निवडणूक विभागाने सर्व मतदारांना त्यांचे मतदान कोणत्या मतदान केंद्रावर होणार आहे याची माहिती द्यावी. तसेच राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींनाही मतदाराचे मतदान कोणत्या मतदार केंद्रावर आहे याविषयी कळवावे, एकूण मतदारांपैकी कोणी मयत आहेत का याचीही खात्री करावी, अशा सूचना निवडणूक निरीक्षक श्रवण हार्डीकर यांनी दिल्या.

# शहर-जिल्ह्यातील १५ अनधिकृत शाळांची यादी जाहीर



## कारवाईचे आदेश, पालकांना सावधनतेचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० जून-**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याशी थेट संबंध असलेल्या अनधिकृत शाळांविरोधात जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने कठोर भूमिका घेतली आहे. जिल्ह्यात विनापरवानगी सुरू असलेल्या १५ शाळांची यादी जाहीर करून त्या शाळांवर तातडीने कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संबंधित शाळांना नोटिसा बजावून दंडात्मक कारवाई करावी, तसेच त्या बंद करण्यासाठी आवश्यक कार्यवाही पूर्ण करून अहवाल सादर करावा, असे निर्देश शिक्षण विभागाने दिले आहेत.

प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख म्हणाले, प्राथमिक शिक्षण विभागाकडून गेल्या वर्षभरात विविध पत्रांद्वारे, ऑनलाईन बैठका आणि व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून गटशिक्षणाधिकारी व स्थानिक प्रशासनाला अनधिकृत शाळांची माहिती सादर करण्यासह त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, अनेक ठिकाणी या शाळा अद्याप सुरू असल्याचे निदर्शनास आल्याने अशा शाळांना शासनाची अधिकृत मान्यता नसल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होऊ शकतो. अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पात्रतेसंदर्भात भविष्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्याचा प्रवेश घेण्यापूर्वी संबंधित शाळेची शासनमान्यता, मान्यता आदेश आणि यू-डायस क्रमांक यांची खात्री करूनच प्रवेश निश्चित करावा.

### या आहेत अनाधितकृत शाळा

**सोलापूर महापालिका क्षेत्र :** नोबल विस्डम प्री-प्रायमरी स्कूल, ट्विंकल इंग्लिश मिडीयम स्कूल, नारायण ई-टेक्नो स्कूल, विष्णूपंत कोठे मेमोरियल इंग्लिश मिडीयम स्कूल, इकरा इस्लामिक स्कूल अँड मक्तब स्कूल, श्री चैतन्य टेक्नो स्कूल, आर्यन वर्ल्ड इंग्लिश मिडीयम स्कूल आणि सनराईज इंग्लिश मिडीयम स्कूल.

**दक्षिण सोलापूर तालुका :** एशियन इनोव्हेटिव्ह मॉडर्न स्कूल (वळसंग) आणि नागेश करजगी ऑर्किड स्कूल (कंदलगाव). **पंढरपूर :** फिनिक्स इंग्लिश मिडीयम स्कूल. **सांगोला तालुका :** सांगोला गुरुकुल, हनुमान इंग्लिश मिडीयम स्कूल (कटफळ), बाळुमामा गुरुकुल आणि विश्वशोभा पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालय (मेडशिंगी).

# शिवस्मारकतर्फे बार्शीत विविध सांस्कृतिक कार्यक्रम

**बार्शी, दि. १० जून-**

छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या श्री शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त अर्थात हिंदू साम्राज्यदिनानिमित्त श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ शिवस्मारकतर्फे रविवार (दि.१४) आणि सोमवार (दि. १५) रोजी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केल्याची माहिती श्री शिवराज्याभिषेक सोहळ्याचे बार्शीचे समन्वयक रावसाहेब मनगिरे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली. रविवारी (दि.१४) सायंकाळी सहा वाजता लिंगायत बोर्डिंग येथे गायक अवधूत गांधी यांचा भक्ती शक्ती संगम हा शिवगीतांचा संगीतमय कार्यक्रम तर सोमवारी (दि. १५) सायंकाळी सहा वाजता लिंगायत बोर्डिंगमध्ये ज्येष्ठ इतिहास अभ्यासक डॉ. सतीश कदम यांचे श्री शिवचरित्रावर व्याख्यान होणार आहे. दोन्ही कार्यक्रम सर्वांसाठी खुले आहेत. बार्शी शहरासह तालुक्यातील शिवभक्तांनी कार्यक्रमांना उपस्थित रहावे, असे आवाहन शिवस्मारकचे सचिव गंगाधर गवसने यांनी केले आहे. पत्रकार परिषदेस सोलापूर जनता सहकारी बँकेचे संचालक अमित आपटे, शिवस्मारकचे सचिव गंगाधर गवसने, संचालक पुरुषोत्तम कारकल, अरुण ग्रामोपाध्ये, ओम माढेकर, अस्मित कुलकर्णी आदी उपस्थित होते.

Classifieds

**विकणे आहे**

**विजापूर रोड, माशाळे नगर माता लक्ष्मी अपार्टमेंटमध्ये 2BHK फ्लॅट विकणे आहे. पार्किंग व पाण्याची मुबलक सुविधा आहे.**
**--- संपर्क ---**
**7498948451**
**9579030937**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

# लोकअदालतीच्या नावाखाली केल्या जाणाऱ्या फसवणुकीपासून सावध राहा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जून-**

लोकअदालतीच्या नावाचा वापर करून नागरिकांची आर्थिक फसवणूक करण्याचे प्रकार वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर ने नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. लोकअदालतीमध्ये दंड भरण्यासाठी किंवा प्रकरण निकाली काढण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला एसएमएस, व्हॉट्सअॅप संदेश अथवा ऑनलाइन पेमेंट लिंक पाठविली जात नसल्याचे विधी सेवा प्राधिकरणाने स्पष्ट केले आहे. लोकअदालती ही परस्पर सामंजस्य, संवाद आणि कायदेशीर प्रक्रियेच्या आधारे वाद मिटविण्याची व्यवस्था आहे. या प्रक्रियेदरम्यान नागरिकांकडून मोबाईलवरून पैसे जमा करण्याची मागणी केली जात नाही. त्यामुळे अशा प्रकारचा संदेश प्राप्त झाल्यास त्यावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण चे सचिव तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सुनील शिंदे यांनी केले आहे.

**ऑनलाइन दंड भरण्याच्या संदेशांवर विश्वास ठेवू नका**

बँक खाते क्रमांक, एटीएम कार्ड तपशील, क्रेडिट कार्ड माहिती, ओटीपी किंवा इतर गोपनीय आर्थिक माहिती कोणालाही देऊ नये. अशा माहितीच्या आधारे सायबर गुन्हेगार नागरिकांची फसवणूक करु शकतात, असा इशाराही देण्यात आला आहे.

लोकअदालतीच्या नावाने पैसे भरण्याची मागणी करणारा संदेश, फोन कॉल किंवा लिंक प्राप्त झाल्यास संबंधित जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाशी संपर्क साधून खातरजमा करावी. पडताळणी न करता कोणताही आर्थिक व्यवहार करू नये, असेही जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूरच्या वतीने सांगण्यात आले. नागरिकांनी जागरूक राहून अशा फसव्या संदेशाबाबत संबंधित यंत्रणांना माहिती द्यावी. सायबर फसवणुकीला आळा घालण्यासाठी नागरिकांची सतर्कता हेच सर्वात प्रभावी संरक्षण असल्याचे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर सचिव सुनील शिंदे यांनी नमूद केले.



# शोएब मुलानी यांचा सैन्यदलात निवडीबद्दल काजी परिवाराकडून सन्मान

## मित्र परिवाराकडूनही भावी कारकीर्दीसाठी शुभेच्छा

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १० जून-**

माढा तालुक्यातील अकोले येथील तरुण शोएब मुलानी यांची भारतीय सैन्य दलात निवड झाल्याबद्दल चव्हाणवाडीतील काजी परिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

शोएब यांनी कठोर परिश्रम व शिस्तीच्या जोरावर तसेच आई वडिलांच्या पाठबळामुळे सैन्य भरतीची सर्व प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केली. त्यांच्या या देशसेवेच्या वाटचालीचा गौरव म्हणून काजी परिवाराने त्यांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. यावेळी काजी परिवारातील मान्यवरांनी शोएब यांच्या जिद्दीचे कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. ''आपल्या तालुक्यातील अकोले गावचा मुलगा देशसेवेसाठी पुढे आला आहे, ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. शोएबसारख्या तरुणांकडून इतरांनाही प्रेरणा मिळेल,'' असे कुटुंबीयांनी सांगितले.

शोएब यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की 'मला सुरुवातीपासून सैन्य भरतीचे आवड असल्यामुळे मी दररोज नित्यनेमाने व्यायामाची कसरत तसेच अभ्यास नित्यनेमाने करत असल्यामुळे मी आज यशस्वी झालो. हे यश प्राप्त करत असताना मला माझ्या वडिलांनी समर्थपणे पूर्ण विश्वासासह पाठबळ दिले तसेच माझे मित्रपरिवार व शिक्षक यांची देखील महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आज काजी परिवार व गावकऱ्यांनी दिलेल्या मानसन्मानासह सत्कार केल्याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानतो.'

दरम्यान कठोर परिश्रमानं आपल्या आयुष्यातील ध्येय पुर्ण केल्याने शोएब मुलानी यांच्यावर टेंभुर्णी परिसरातील त्यांचे मित्र परिवार, हितचिंतक व अन्य समाजबांधवांकडून हार्दिक अभिनंदन केले जात आहे. तसेच भावी कारकीर्दीबाबत शुभेच्छाही दिल्या जात आहेत. मुलानी यांच्या कडूनही नागरिकांच्या प्रेमाच्या वर्षावाबाबत आभार मानण्यात आले.

### भोगवटादार वर्ग १ करणेबाबतची जाहीर घोषणा

तमाम लोकांना विशेषतः मौजे म्हैसगाव, ता. माढा, जि. सोलापूर येथील लोकांना या जाहीर घोषणेद्वारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि|| सोलापूर सब डि|| व ता. माढा पैकी मौजे म्हैसगाव, ता. माढा येथील जमीन गट नं. ६००/२/ब यांसी बिनशेती क्षेत्र ०० हे. ५० आर, आकार ५०० रु. ०० पैसे ही मिळकत चेअरमन विठ्ठल कॉर्पोरेशन लि., म्हैसगाव, ता. माढा, गंगामाई नगर, पिंपळनेर, ता. माढा तर्फे अधिकारपत्र धारक भास्कर अभिमन्यु गव्हाणे यांचे खरेदी मालकीची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची अशी मिळकत असून सदरची मिळकत ही भोगवटादार वर्ग २ ची अशी आहे. तथापि, उपरोक्त नमुद भास्कर अभिमन्यु गव्हाणे यांनी सदरची मिळकत ही त्यांनी भोगवटादार वर्ग १ करणेबाबत मा. उपविभागीय अधिकारी साहेब, माढा विभाग कुर्डूवाडी व तहसिल कार्यालय, माढा यांचेकडे रितसर अर्ज / प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर प्रस्ताव चौकशीकामी मंडळ अधिकारी म्हैसगाव, तहसिल कार्यालय, माढा या कार्यालयांकडे प्रलंबित आहे. तथापि, वर नमुद मिळकतीबाबत सहधारक, लगतचे धारक किंवा अन्य कोणाचीही, कसलीही हरकत असल्यास ही जाहीर घोषणा प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांचे आत आपली तक्रार ही लेखी व पुराव्याचे कागदपत्राद्वारे मे. उपविभागीय अधिकारी साहेब, माढा विभाग कुर्डूवाडी, मे. तहसिलदार साहेब माढा अथवा मे. जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्याकडे नोंदवाव्यात. जर वरील मुदतीत कोणाचीही कसलीही लेखी हरकत अगर लेखी तक्रार आली नाही अथवा दाखल झाली नाही तर वर नमुद मिळकत ही भोगवटादार वर्ग १ करणेबाबतचे प्रस्तावाबाबत पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी. मुदती नंतर येणाऱ्या हरकतीचा वा तक्रारीचा कोणताही विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर घोषणा दिली. असे तारीख १०/०६/२०२६

सही/-
**ॲड. अनुप बंडोपंत वस्त्रे**
**बी.ए., एल.एल.बी., डव्होकेट**
**श्रीराम नगर, माढा, ता. माढा, जि. सोलापूर**

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर बाशी म्यु.पल हद्दीतील व परीसरातील लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकत वर्णन :-** डि. सोलापूर सब डी. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी नगरपरिषद हद्दीतील जमीन गट नं. ६३०/२ यापैकी प्लॉट नं. २३ याचे एकूण क्षेत्रफळ खरेदीखतानुसार २७८.८७ चौ.मी. यासी चतुःसीमा :- पूर्वेस - प्लॉट नं. २४, दक्षिणेस - ४.५७ मिटर रूंदीचा रस्ता, पश्चिमेस - प्लॉट नं. २२ व उत्तरेस प्लॉट नं. २६ आहे. यापैकी पश्चिमेकडील बाजूचा प्लॉट याचे क्षेत्रफळ १५०० चौ. फुट आहे. याचे मोजमाप पूर्वपश्चिम फुट ५० व दक्षिणोत्तर - फुट ३० आहे. यासी चतुःसीमा :- पूर्वेस - सदर प्लॉट नं. २३ पैकी उर्वरित क्षेत्र, दक्षिणेस - ४.५७ मिटर रूंदीचा रस्ता, पश्चिमेस प्लॉट नं. २२ व उत्तरेस - प्लॉट नं. २६ आहे. याची पाणी व वागणूक दक्षिण बाजूचे रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे चतुःसीमापूर्वक प्लॉट आतील दगडमाती, झाडेझुडपे इ. सर्व तदंगभूत वस्तुहक्कांसह वहिवाटीचे हक्कांसह.

वर वर्णन केलेला प्लॉट हा आशा विठ्ठलराव देशमुख लग्नानंतर सौ. आशा आबासाहेब जगदाळे, रा. ४३४, कासार गल्ली, बार्शी यांचे मालकी वहिवाटीचा असून सदर मिळकत त्यांनी त्यांचे कौटुंबिक गरजेकरीता विक्रीस काढली असता त्यांनी आमचे अशीलास सदर मिळकत निर्वेध निजोखमी आहे असा भरवसा देऊन आमचे अशिलासोबत तोंडी बोलणी करून त्यांनी आमचे अशिलाकडून विसारादाखल रक्कम स्विकारलेली आहे. तरी तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वर वर्णन केलेल्या प्लॉटबाबत कोणाचा काही हक्क हितसंबंध, मालकी, भावकी वाद, वारसा हक्क, कोर्ट दावा, अतिक्रमण, पोटगी, लीज, लीन, ताबा, वहिवाट, बक्षीस कर्ज बोजे अथवा बँक बोजा अथवा करार मदार, साठेखत, करारपत्र वगैरे असल्यास त्यांनी त्यांचे हकरती खालील पत्यावर लेखी कागदपत्रांसह ८ (आठ) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीत कोणाची कांही हरकत न आलेस आमचे अशील सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे समजून सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील मागाहून कोणाची कसलीही तक्रार चालणार नाही.

ही जाहीर नोटीस दिली. दि. १०/०६/२०२६

सही/-
**अशिल**

सही/-
**ॲड. तिकटे एस.बी.**
**बी.एससी., एल.एल.एम.**
**डिस्ट्रीक्ट ॲन्ड सेशन्स कोर्ट,**
**बार्शी, ता. बार्शी,.जि. सोलापूर**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## IDFC FIRST Bank Limited

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)
CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

### सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ च्या कलम १३ (२) अन्वये नोटीस

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेड** सोबती विलीनीकरण झाले असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेली तारण कर्जे घेतली आहेत. खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्ता गहाण ठेवून सुरक्षित करण्यात आली आहेत. संबंधित कर्ज करारांच्या अटी व शर्तींचे पालन करण्यात ते अपयशी ठरल्यामुळे आणि त्यांच्या खात्यांमधील व्यवहार अनियंत्रित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांची कर्ज खाती 'एनपीए' (अनुत्पादक मालमत्ता) म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहेत. त्यांच्याकडून **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** देय असलेल्या रकमा खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद केलेल्या संबंधित जारी केलेल्या नोटिसींनुसार आहेत आणि सदर रकमांवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिसीनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 166700504 | मालमत्तेवर कर्ज | १. अमोल अर्जुन कोकरे<br>२. संजिवनी अर्जुन कोकरे | 17/04/2026 | INR 10,95,793.68/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत रेकॉर्डमधील ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ३५५ अन्वये नोंदणीकृत, गाव माणकी, तालुका माळशिरस, जिल्हा सोलापूर येथे स्थित ८४० चौ. फूट (३५ X २४) क्षेत्रफळ असलेले निवासी घर आणि ३००० चौ. फूट (५० X ६०) क्षेत्रफळ असलेली खुली जागा या संपूर्ण मिळकतीचे तुकडे आणि भाग, ज्याच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेत :
उत्तर : भारत राजाराम कोकरे, दक्षिण : अण्णा लहू कोकरे, पूर्व : ग्रामपंचायत रस्ता, पश्चिम : स्वतःची मालमत्ता

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिसीनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 104090845 | मालमत्तेवर कर्ज | १. संतोष जगन्नाथ आवताडे<br>२. जगन्नाथ सिताराम आवताडे<br>३. सुमन जगन्नाथ आवताडे | 07/02//2026 | INR 4,63,967.17/- |

**मालमत्तेचा पत्ताः बाब क्र. १ :** गावः एकतपूर, ग्रामपंचायत एकतपूरच्या हद्दीत, उपविभागः सांगोला, विभाग : सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०७ येथे स्थित, सिटी सर्व्हे क्र. २९२, मिळकत क्र. ३१८, क्षेत्रफळ ३६.०० चौ. मीटर असलेल्या मालमत्तेचा संपूर्ण तुकडा आणि भाग, ज्याच्या चतुःसीमाः पूर्वः सिटी सर्व्हे क्र. २९८, २९३ पश्चिमः सिटी सर्व्हे क्र. २९० उत्तरः सिटी सर्व्हे क्र. २९१, पूर्व-पश्चिम रस्ता दक्षिणः रस्ता
**बाब क्र. २ :** गावः एकतपूर, ग्रामपंचायत एकतपूरच्या हद्दीत, उपविभागः सांगोला, विभागः सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०७ येथे स्थित, सिटी सर्व्हे क्र. २९९, मिळकत क्र. ३१७, क्षेत्रफळ २०.३ चौ. मीटर असलेल्या मालमत्तेचा संपूर्ण तुकडा आणि भाग, ज्याच्या चतुःसीमाः पूर्वः सिटी सर्व्हे क्र. ३०० पश्चिमः सिटी सर्व्हे क्र. २९१ उत्तरः सिटी सर्व्हे क्र. २९१, पूर्व-पश्चिम रस्ता दक्षिणः सिटी सर्व्हे क्र. २९७, २९८

याद्वारे तुम्हाला आवाहन करण्यात येते की, तुम्ही वर नमूद केलेल्या तक्त्यातील तपशिलानुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या व्याजदरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींसह संपूर्ण रक्कम या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत अदा करावी. यामध्ये कसूर केल्यास, थकीत रक्कम वसूल करण्यासाठी गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत योग्य ती कायदेशीर कारवाई सुरू करण्यास बँक बांधील राहील. तसेच, सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अन्वये तुम्हाला गहाण ठेवलेली सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास सक्त मनाई आहे.

**स्वाक्षरी/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, ज्याचे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण झाले असून सध्या ते आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 11/06/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

### मूळ खरेदीखत हरवलेबाबत जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी व ता बार्शी, जि. सोलापूर येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, मिळकतीचे वर्णन १) डी. सोलापूर सब डी व ता. बार्शी पैकी बार्शी म्यू.पल. हद्दीतील प्लॉट याचा जुना गट नं. ७२४/अ/२ याचा नवीन गट नं. ७३०/अ/ब यापैकी प्लॉट नं. ०१ याचे क्षेत्र १५०.०० चौ.मी. यासी चतुःसीमा :- पूर्वेस प्लॉट वनं. २, दक्षिणेस - रस्ता, पश्चिमेस - गट नं. ७२४ आ३, उत्तरेस - गट नं. ७२३. सदर मिळकतीची पाणी व वागणूक दक्षिण बाजूच्या रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे चतुःसीमा पूर्वक मिळकत तदंगभूत वस्तू हक्कासह,

२) डी. सोलापूर सब डी व ता. बार्शी पैकी बार्शी म्यु.पल हद्दीतील प्लॉट याचा सर्वे नं. ३३५. आर पैकी यापैकी प्लॉट याचा जुना गट नं. ७९३ याचा नवीन गट नं. ७९९ यापैकी क्षेत्र हे ००-६१ नं. २९ व ३२ याचे एकूण क्षेत्र ४८०.०० चौ.मी. यासी चतुःसीमा :- पूर्वेस - गट नं. ७९९ पैकी जमीन दक्षिणेस - प्लॉट नं. ३४ पश्चिमेस - प्लॉट नं. ३१. उत्तरेस - ०६.०० मी. रुंदीचा रोड. सदर मिळकतीची पाणी व वागणूक उत्तर बाजूच्या रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे चतुःसीमापूर्वक मिळकत तदंगभूत वस्तू हक्कासह.

सदरची मिळकत नं. १ हि श्रीमती छबुबाई भगवान कुंभार यांच्या स्वसंपादित खरेदी मालकीचा असून त्याचा खरेदीदस्त क्र. २०५८/१९८७ या दस्ताने खरेदी केला होता. त्या प्लॉटच्या हक्कपत्रकी त्यांचे वारस कै. बाळासाहेब भगवान कुंभार यांच्या नावाची नोंद आहे. ती मिळकत प्रत्यक्ष कब्जे वाहिवाटीस आहे. मिळकत नं. ०२ हि कै. बाळासाहेब भगवान कुंभार यांच्या खरेदी मालकीची असून व सदर मिळकतीचे मूळ खरेदीदस्त क्र. ६९१/१९९० आहे. त्या प्लॉट च्या हक्कपत्रकी यांच्या नावाची नोंद आहे. ती मिळकत प्रत्यक्ष कब्जेवाहिवाटीस आहे. परंतु दोन्ही मिळकतीच्या मूळ खरेदी दस्त नं. १) खरेदीदस्त क्र. २०५८/१९८७ आणि २) मूळ खरेदीदस्त क्र. ६९१/१९९० हे खरेदीखत संच श्रीमती पुष्पलता बाळासाहेब कुंभार याच्या कडून तहसील परिसर बार्शी येथे दि. ०१/०६/२०२६ रोजी दुपारी ०२.१५ वा. सुमारास गहाळ झाले आहेत आहे. त्याबाबत त्यांनी बार्शी शहर पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली असून त्याचा गहाळ रजि. नं. ०३४४/२०२६ असा पडला आहे.

परंतु मूळ १) खरेदीदस्त क्र. २०५८/१९८७ आणि २) मूळ खरेदीदस्त क्र. ६९१/१९९० असे खरेदीखत संच हरवल्याने यदाकदाचित कोणास मिळाल्यास खालील दिलेल्या पत्त्यावरती संपर्क साधून परत द्यावी. अथवा आमचे अशील याच्या दुय्यम प्रत आधारे कर्ज प्रकरण करतील, यदाकदाचित याबाबत कोणाची काही हरकत अथवा त्या प्लॉटबाबत हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासुन ०७ दिवसांचे आत आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरुन सदर मिळकत बँकेकडे तारण ठेवतील. नंतर कोणाची कसलीही हरकत आलेस आमचे अशीलाच्या व बँकेच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये याकरिता हि जाहिर नोटीस दिली. दि. १०/०६/२०२६

**अशिल**
**श्रीमती पुष्पलता बाळासाहेब कुंभार**
**रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**

सही/-
**ॲड. कुलदिप संजय क्षीरसागर**
**ऑफिस पत्ता :- ३९४५/१, भवानी पेठ, सोलापूर रोड बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**(अशिलातर्फे ॲडव्होकेट)**

## उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर

सिटी सर्वे नं. ८४१३, दुसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवारा, सोलापूर.- ४१३००३
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ व त्याखालील नियम १९६१ चे नियम ८६ (६) अन्वये

### जाहीर समन्स

**पंचवटी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर** - **अर्जदार**
विरुद्ध
(खालील तपशीलातील नमूद केलेले थकबाकीदार सभासद) - जाब देणार

| अं. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | प्रतिवादी नंबर | प्रतिवादीचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ९०९/२०२६-२७ | १,५५,३८२/- | २<br>३ | **परशुराम यलप्पा कुंचिकोरवे**<br>रा. ३४/५ बी/१४, न्यू पाच्छा पेठ, सोलापूर<br>**अब्दुल रजाक जैनोद्दिन शेख**<br>रा. २२६, कुर्बान हुसेन नगर, झोपडपट्टी, सोलापूर |
| २ | ९१०/२०२६-२७ | २,५९,७७८/- | २<br>३ | **सुभाष पुंडलिक रोडगे**<br>रा. ३७५/७६, समाधान नगर, जुना विडी घरकुल, सोलापूर<br>**अजित भागवत पाटील**<br>रा. २९७, ब्रह्मपुरी मंगळवेढा ता. मागळवेढा, जि. सोलापूर |
| ३ | ९११/२०२६-२७ | २७,०८७/- | २ | **सुवर्णा प्रशांत गंगावकर**<br>कुमठा नाका, लक्ष्मी-विष्णु कॉलनी, सोलापूर |
| ४ | ९१२/२०२६-२७ | ७९,०६७/- | १<br>३ | **मारुती दगडू मुगळे**<br>रा. मु.पो. तोगराळी ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर<br>**पंडित दगडू मुगळे**<br>रा. मु.पो. तोगराळी ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर |
| ५ | ९१३/२०२६-२७ | १,४४,३४५/- | १ | **श्रीशैल सोमलिंग केरे**<br>रा. संगमेश्वर नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर |
| ६ | ९१४/२०२६-२७ | ४७,९५३/- | २ | **अंबादास नरसप्पा कटकम**<br>रा. गोदूताई विडी घरकुल, सोलापूर |
| ७ | ९१५/२०२६-२७ | १,०३,७१२/- | ४ | **आशालता दत्तात्रय मस्के**<br>रा. ६५, ब प्रल्हाद नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| ८ | ९१६/०२६-२७ | ३,०१,८३८/- | ३ | **नागनाथ सायप्पा जाधव**<br>रा. कॉलनी नं.१, लिमयेवाडी, सेटलमेंट सोलापूर |
| ९ | ९१७/२०२६-२७ | १,४५,९२९/- | १<br>२ | **उमेश दत्तात्रय बहिर्जे**<br>रा. मु.पो. कारंबा, ता. दक्षिण सोलापूर<br>**प्राजक्ता उमेश बहिर्जे**<br>रा. मु.पो. कारंबा ता. दक्षिण सोलापूर |

यात अर्जदार पतसंस्था यांनी कलम १०१ अन्वये दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या जाबदार त्यांचे राहते पत्त्यावर सुनावणी नोटिस पाठविली असतांना त्या व्यक्ती सदर पत्त्यावर राहत नसल्याचे अथवा घर बंद असल्याचे नमूद करून नोटिस परत आली आहे. तरी सदर जाहीर नोटीसद्वारे आपणास कळविण्यात येते की, उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः अथवा वकिलामार्फत **दिनांक २३/०६/२०२६** रोजी **दुपारी ठीक १२.३०** वाजता कागदपत्रासह **उपनिबंधक सहकारी संस्था सोलापूर शहर सोलापूर सिटीसर्वे नं. ८४१३, दुसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवारा, सोलापूर ४१३००३** येथे हजर राहावे. या नोटीसद्वारे असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस हजर न राहिल्यास आपल्या गैरहजरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०५/०६/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह जाहीर नोटीस दिले आहे.

शिक्का

सही/-
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### माझ्या क्रिकेट किट बॅगवरून लोकांमध्ये संभ्रम

**नवी दिल्ली** : माजी भारतीय कर्णधार मिताली राजने टी-२० विश्वचषकापूर्वीच्या तिच्या सुरुवातीच्या दिवसांची आठवण सांगितली. ती



म्हणाली की, लोक तिच्या क्रिकेट किटबॅगला हॉकी बॅग कसे समजत असत. जे त्या काळातील महिला क्रिकेटच्या अज्ञात स्थितीचे प्रतिबिंब आहे. तिने १९९० च्या दशकातील संधींच्या अभावापासून ते सध्या बीसीसीआयच्या अंतर्गत असलेल्या मजबूत संरचनेपर्यंतचा तिचा प्रवास सांगितला. गेल्या वर्षीच्या एकदिवसीय विश्वचषक विजयानंतर, आत्मविश्वासू भारतीय संघ आता टी-२० विश्वचषक विजेतेपदाचे लक्ष्य ठेवत आहे. माजी कर्णधार मिताली राजने बुधवारी सांगितले की, तिचा प्रवास देशातील महिला क्रिकेटच्या उल्लेखनीय प्रगतीचे प्रतीक आहे, ज्यात मर्यादित संधींपासून ते आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारी खेळाडू बनण्यापर्यंतचा प्रवास आहे. मिताली म्हणाली की, तिचा वैयक्तिक प्रवास देखील देशातील या खेळाच्या वाढीचे प्रतीक आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघ इंग्लंड आणि वेल्समध्ये होणाऱ्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत रविवारी बर्मिंगहॅम येथे पाकिस्तानविरुद्ध आपल्या मोहिमेला सुरुवात करेल. १९९० च्या दशकापासून या खेळाने खूप मोठी प्रगती केली आहे, जेव्हा महिला क्रिकेटला मान्यता आणि एक मजबूत संरचना मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागत होता. या बदलाचा सर्वांत मोठा परिणाम म्हणजे गेल्या वर्षी भारत आणि श्रीलंकेत झालेल्या महिला एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत भारताने मिळवलेले पहिले विजेतेपद, ज्यामुळे अनेक काळापासून चालत आलेल्या समजुती बदलण्यास मदत झाली. ■

### इंग्लिश कौंटी चॅम्पियनशिपमध्ये खेळणार मानव सुथार

**लंडन** : अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्यात भारतासाठी उत्कृष्ट कामगिरी करणारा डावखुरा फिरकी गोलंदाज मानव सुथार, इंग्लिश क्लब वॉर्विकशायरकडून कौंटी चॅम्पियनशिपचे पुढील दोन सामने खेळणार आहे. वॉर्विकशायरने बुधवारी सुथारसोबत एका अल्प-मुदतीच्या कराराची घोषणा केली. या करारानुसार, तो रोथेसे कौंटी चॅम्पियनशिपच्या पुढील दोन सामन्यांसाठी निवडीकरिता उपलब्ध असेल. पहिला सामना १२ ते १५ जून दरम्यान स्कारबरो येथे यॉर्कशायरविरुद्ध खेळला जाईल आणि दुसरा सामना पुढील आठवड्यात टॉन्टन येथे सॉमरसेटविरुद्ध खेळला जाईल. तेवीस वर्षीय सुथारने नुकतेच मुल्लानपूर (पंजाब) येथे अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्यात आंतरराष्ट्रीय पदार्पण केले. त्याने पहिल्या डावात ३३ धावांत सहा बळी आणि दुसऱ्या डावात २९ धावांत एक बळी घेतला. कसोटी पदार्पणापूर्वी, त्याने २९ प्रथम-श्रेणी सामन्यांमध्ये १२९ बळी घेतले होते.

### रोहित शर्माचा नेटमध्ये सराव

**मोहाली** : माजी कर्णधार रोहित शर्मा बुधवारी येथे भारताच्या व्हाईट-बॉल नेट सत्रात सामील झाला आणि तरुण व उदयोन्मुख खेळाडूंची उपस्थिती असूनही तो आकर्षणाचे केंद्र बनला होता. भारतीय संघाची बस आयएस बिंद्रा स्टेडियम संकुलात पोहोचण्यापूर्वीच उत्साहाचे वातावरण होते. खेळापासूनच्या त्याच्या अलीकडील अनुपस्थितीमुळे त्याच्या तंदुरुस्तीबद्दल अटकळ बांधली जात होती. वृत्तसंस्थेने वृत्त दिले होते की, या अनुभवी सलामीवीराला खेळण्याची परवानगी मिळाली आहे, परंतु जेव्हा भारतीय संघ सरावासाठी एकत्र जमला, तेव्हा सर्वांच्या नजरा कोणावर असतील हे स्पष्ट झाले. भारतीय टी-२० कर्णधार श्रेयस अय्यरही उपस्थित होता. यशस्वी जैस्वाल व्यतिरिक्त, तरुण खेळाडू गुरनूर ब्रार, प्रिन्स यादव आणि हर्ष दुबे हे देखील सराव करत होते. पण जेव्हा रोहित सरावाच्या मैदानावर पोहोचला, तेव्हा सर्वांचे लक्ष त्याच्यावर केंद्रित झाले. रोहितच्या सरावाला फलंदाजीच्या नेटपासून दूर सुरुवात झाली. त्याने स्ट्रेंथ अँड कंडिशनिंग प्रशिक्षक एड्रियन ले रू यांच्याशी काही मिनिटे गप्पा मारल्या आणि मग हलक्या गतीने धावायला सुरुवात केली. या सरावादरम्यान इशान किशन त्याच्यासोबत होता आणि रोहितने सुमारे पाच सेट पूर्ण केले. त्याच्या तंदुरुस्तीबद्दल अलीकडे चिंता व्यक्त केली जात असूनही, तो अविचलित दिसत होता. मात्र, जेव्हा त्याने पॅड्स घातले, तेव्हा खरी उत्सुकता निर्माण झाली.

### रवी दहिया, शरद कुमार यांना 'कॅट'कडून दिलासा

**नवी दिल्ली** : ऑलिम्पिक रौप्यपदक विजेता कुस्तीपटू रवी कुमार दहिया आणि पॅरालिम्पिक कांस्यपदक विजेता उंच उडीपटू शरद कुमार यांना त्यांच्या सेवा नियमितीकरणासाठी दाखल केलेल्या स्वतंत्र याचिकांवर केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाकडून (कॅट) अंतरिम दिलासा मिळाला आहे. कॅटच्या प्रधान खंडपीठाने दिल्ली सरकार आणि इतर पक्षांना नोटीस बजावली असून, दोन्ही अर्जदारांनी प्रथमदर्शनी प्रकरण सादर केले. ■

# सिंधूचा विजय; तन्वी शर्माच्या आश्चर्यजनक विजयाने उलटफेर

### भारतीय पुरुष खेळाडूंकडून निराशा

### ऑस्ट्रेलियन ओपन सुपर ५०० बॅडमिंटन

◆ **सिडनी, १० जून**

दोन वेळच्या ऑलिम्पिक पदक विजेत्या पी. व्ही. सिंधूच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला खेळाडूंनी बुधवारी येथे ऑस्ट्रेलियन ओपन सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेत प्रभावी कामगिरी केली, तर तन्वी शर्माच्या विजयाने मोठी उलथापालथ केली.

तिसऱ्या मानांकित सिंधू, तन्वी, मालविका बन्सोड, इशारानी बरुआ आणि तान्या हेमंत या सर्वांनी १६ च्या फेरीत प्रवेश केला. मात्र, भारतीय पुरुष एकेरी खेळाडूंसाठी बुधवारचा दिवस खराब ठरला, कारण किरण जॉर्ज, तरुण मन्नेपल्ली आणि पात्रता फेरीतून आलेला सनीत दयानंद पहिल्याच फेरीत पराभूत होऊन स्पर्धेतून बाहेर पडले.

महिला एकेरीच्या पहिल्या



फेरीच्या एकतर्फी सामन्यात सिंधूने पेरूच्या इनेस लुसिया कॅस्टिलो सालाझारचा अवघ्या ३२ मिनिटांत २१-१३, २१-११ असा पराभव केला.

सिंधूचा पुढील सामना हमवंत इशाराणीशी होईल. हमवंत इशाराणीने एक तास तीन मिनिटे चाललेल्या चुरशीच्या सामन्यात चीनच्या हान कियानला २२-२०, १०-२१, २१-१४ असे पराभूत केले. दिवसातील सर्वांत मोठा धक्कादायक निकाल १७ वर्षीय तन्वीने दिला. तिने चायनीज तैपेईच्या पाचव्या मानांकित आणि जागतिक क्रमवारीत ११ व्या क्रमांकावर असलेल्या चू पिन चिएनला ४५ मिनिटांत २१-१२, २२-२० असे पराभूत केले.

जागतिक क्रमवारीत ३६ व्या



क्रमांकावर असलेल्या तन्वीचा पुढील सामना सहकारी भारतीय खेळाडू मालविकाशी होईल. मालविकाने पहिला गेम गमावल्यानंतर पुनरागमन करत थायलंडच्या टोनरुंग त्सेहेंगला १५-२१, २१-७, २१-१३ असे हरवले.

तान्याने अमेरिकेच्या इशिका जैस्वालला ३९ मिनिटांत २१-१७, २१-१८ असे पराभूत केले. पुढील फेरीत तिचा सामना थायलंडच्या दुसऱ्या मानांकित आणि जागतिक क्रमवारीत आठव्या क्रमांकावर असलेल्या पोर्नपावी चोचुवोंगशी होईल.

पुरुष एकेरीमध्ये, किरण मलेशियाच्या जस्टिन हो विरुद्ध एक तास आणि दोन मिनिटांत १९-२१, २१-१४, १५-२१ अशा चुरशीच्या सामन्यात पराभूत झाला. पात्रता फेरीतून आलेला दयानंद देखील चीनच्या हू शियान विरुद्ध अवघ्या ३५ मिनिटांत ८-२१, १०-२१ असा पराभूत होऊन स्पर्धेतून बाहेर पडला.

थारुणने अनपेक्षित विजय मिळवण्याच्या जवळ पोहोचला होता, परंतु अखेरीस तो चायनीज तैपेईच्या द्वितीय मानांकित आणि जागतिक क्रमवारीत १० व्या क्रमांकावर असलेल्या लिन चुन यी विरुद्ध एक तास आणि २० मिनिटांत २१-१८, १३-२१, २३-२५ असा पराभूत झाला.

मिश्र दुहेरीमध्ये, ध्रुव रावत आणि मनीषा के यांनी ऑस्ट्रेलियाच्या लिन झेंडन आणि व्हिक्टोरिया जोनाडी या जोडीला २७ मिनिटांत २१-१३, २१-१४ असे पराभूत करून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. मात्र, मोहित जगलान आणि लक्षिता जगलान हे दुसरे मानांकित चिनी जोडी गुओ शिन वा आणि चेन फेंग हुई यांच्याकडून अवघ्या २० मिनिटांत ६-२१, ५-२१ असे पराभूत झाले.

(वृत्तसंस्था)

# सचिन तेंडुलकरच्या सल्ल्यामुळे खेळात उत्साह

### जेमिमा रॉड्रिग्जचे भावोद्गार

◆ **मुंबई, १० जून**

गेल्या वर्षी महिला एकदिवसीय विश्वचषक उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाविरुद्ध केलेल्या अविस्मरणीय खेळीनंतर मी भावनिक आणि उत्साहित झाली होती, पण महान फलंदाज सचिन तेंडुलकरच्या एका फोन कॉलमुळे मला पुन्हा लक्ष केंद्रित करण्यास मदत झाली, असे भारतीय महिला फलंदाज जेमिमा रॉड्रिग्जने सांगितले.

गेल्या वर्षी नवी मुंबईत भारताला पहिले विश्वविजेतेपद मिळवून देताना, जेमिमाने १२७ धावांची शानदार नाबाद खेळी करून जगातील सर्वांत बलाढ्य संघ ऑस्ट्रेलियाला पराभूत करण्यास मदत केली. तिने सांगितले की तेंडुलकरच्या सल्ल्यामुळे मला लक्ष केंद्रित करण्यास मदत झाली.

सचिन सरांनी माझे प्रशिक्षक प्रशांत शेट्टी यांना फोन केला. त्यांनी मला सांगितले की, ऑस्ट्रेलियाविरुद्ध उपांत्य फेरीत मोठी खेळी खेळण्याचा आनंद आणि त्यांना हरवण्याचा आनंद, हे सर्व माझ्यासाठी खूप कठीण होते हे ते समजू शकतात, असे



जेमिमाने सांगितले.

पण त्यांनी मला आठवण करून दिली की काम अजून संपलेलं नाही, ती म्हणाली. आम्हाला अजून अंतिम सामना जिंकायचा होता. ते म्हणाले, ते बाजूला ठेवून नव्याने सुरुवात करण्याचा प्रयत्न कर. त्या सल्ल्यामुळे माझे मन खूप शांत झाले. जेमिमा म्हणाली, माझ्या लक्षात आले की तुम्ही आधी केलेल्या कामगिरीच्या आधारावर पुढचा सामना जिंकू शकत नाही. तुम्ही प्रत्येक सामन्याला एक नवी सुरुवात मानले पाहिजे. एका महान व्यक्तीच्या त्या सल्ल्यामुळे मला अंतिम सामन्यापूर्वी खूप स्पष्टता मिळाली. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या अंतिम सामन्यातील शेफाली वर्माच्या शानदार अष्टपैलू कामगिरीने (८७ धावा आणि ३६ धावांत दोन बळी) भारताच्या विजेतेपदात महत्त्वाची भूमिका बजावली. सलामीवीर शेफाली म्हणाली की, त्यावेळी तिच्या वडिलांच्या शब्दांनी तिला खूप धैर्य दिले. अंतिम सामन्यापूर्वी आम्हाला दोन दिवसांची विश्रांती मिळाली होती. माझ्या वडिलांनी मला एक व्हॉईस नोट पाठवली. ते म्हणाले, फक्त मेहनत कर. मैदानावर तुमची सर्वोत्तम कामगिरी करा आणि इतिहासात नोंद होईल असे काहीतरी करून दाखवा. त्या व्हॉईस नोटने माझ्यात नवी ऊर्जा भरली.

(वृत्तसंस्था)

# हार्दिक पांड्या अफगाणिस्तान मालिकेबाहेर

### चाहत्यांना आश्चर्याचा धक्का

◆ **मुल्लानपूर, १० जून**

अफगाणिस्तानविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेपूर्वी भारतीय क्रिकेट संघाला मोठा धक्का बसला आहे.



स्टार अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या एका नवीन दुखापतीमुळे संपूर्ण तीन सामन्यांच्या मालिकेतून बाहेर पडला आहे. बंगळुरु येथील बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये फिटनेस तपासणीदरम्यान पांड्याला क्वाड्रिसेप्स स्नायूला दुखापत झाली. हार्दिक अलीकडेच आयपीएल दरम्यान झालेल्या पाठीच्या स्नायूंच्या दुखापतीतून सावरत होता. वृत्तसंस्थेने मंगळवारी वृत्त दिले होते की, हार्दिक आणि रोहित शर्मा यांना खेळण्यासाठी परवानगी मिळाली होती, परंतु आता असे समोर येत आहे की फिटनेस चाचणीदरम्यान आढळलेल्या नवीन दुखापतीमुळे त्याच्या पुनरागमनास विलंब झाला आहे.

मिळालेल्या वृत्तानुसार, हार्दिकने फिटनेस तपासणीदरम्यान पूर्ण १० षटके गोलंदाजी केली. मात्र, त्याच काळात त्याला क्वाड्रिसेप्स स्नायूला दुखापत झाली. ही दुखापत इतकी गंभीर आहे की त्याला किमान तीन आठवडे पुनर्वसन करावे लागेल. बीसीसीआयच्या एका सूत्राने सांगितले, बरे होण्यासाठी अंदाजे तीन आठवडे लागतील. त्यामुळे, अफगाणिस्तानविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत त्याच्या खेळण्याची शक्यता नाही, कारण तोपर्यंत त्याचे पुनर्वसन पूर्ण होणार नाही.

(वृत्तसंस्था)

#### एकदिवसीयमध्ये हार्दिक महत्त्वाचा

पांड्याला अलिकडेच भारतीय टी-२० संघातून विश्रांती देण्यात आली होती, जेणेकरून तो एकदिवसीय क्रिकेटवर अधिक लक्ष केंद्रित करू शकेल. निवड समिती आणि संघ व्यवस्थापनाचे लक्ष २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकावर केंद्रित आहे आणि हार्दिक त्या योजनेचा एक महत्त्वाचा भाग मानला जातो. ■

# रोमांचक सराव सामन्यात इंग्लंडचा विजय

### ऋचा घोषचे अर्धशतक व्यर्थ

◆ **कार्डिफ, १० जून**

कार्डिफ येथे झालेल्या एका रोमांचक सराव सामन्यात इंग्लंडने भारताला ५ धावांनी हरवले. २०२६ च्या महिला टी-२० विश्वचषकापूर्वी हा सामना दोन्ही संघांसाठी उत्कंठावर्धक ठरला. भारताकडून जोरदार फलंदाजी करत अर्धशतक झळकवणाऱ्या ऋचा घोषचे प्रयत्न निष्फळ ठरले.

प्रथम फलंदाजी केलेल्या इंग्लंडने सहा गडी गमावून १७१ धावा केल्या. कर्णधार नॅट सायव्हर-ब्रंटने ४५ चेंडूंमध्ये ५७ धावा करून डावाला आधार दिला. एमी जोन्सच्या ४५



फटका मारताना इंग्लंडची कर्णधार नॅट सायव्हर ब्रंट

चेंडूंतील ६४ धावांनी सायव्हर-ब्रंटला सावध सुरुवात करण्यास आणि नंतर आपल्या खेळीला गती देण्यास मदत केली. मधल्या षटकांमध्ये फिरकी गोलंदाज परतल्यानंतर, डॅनी गिब्सनने चार चौकार आणि एका षटकारासह १२ चेंडूंमध्ये नाबाद ३० धावा करून इंग्लंडला डाव चांगल्या प्रकारे संपवण्यास मदत केली.

मागील सराव सामन्यात न खेळलेली कर्णधार हरमनप्रीत कौर या सामन्यात पुनरागमन करत होती. रेणुका ठाकूरने ४४ धावा दिल्या. क्रांती गौडने आपल्या गोलंदाजीच्या लांबीत बदल केला आणि तिच्या फुल-फ्लोट चेंडूंनी इंग्लंडच्या फलंदाजांना अडचणीत आणले. लक्ष्याचा पाठलाग करताना, स्मृती मंधाना एका धावेवर बाद झाली आणि त्यानंतरच्या चार फलंदाजांनी अनुक्रमे १३, १५, १७ आणि १८ धावा केल्या. फलंदाज स्थिरावत होते आणि बाद होत होते, पण सहाव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या ऋचा घोषने भारतीय डाव सावरला आणि आपल्या फलंदाजीने एकतर्फी वाटणाऱ्या सामन्यात रंगत आणली. तिने ३६ चेंडूंमध्ये नऊ चौकार आणि दोन षटकारांसह ६८ धावा केल्या, पण शेवटच्या षटकात ती यष्टिचित झाली. २० वे षटक टाकणाऱ्या लिन्सी स्मिथने तीन बळी टिपले. भारताच्या पाठलागादरम्यान, इंग्लंडसाठी जोन्सऐवजी ॲलिस कॅप्सीने यष्टिरक्षण केले. जेमिमा रॉड्रिग्ज, अरुंधती रेड्डी, सोफिया डंकले आणि हेदर नाईट यांना या सामन्यासाठी विश्रांती देण्यात आली होती. आता दोन्ही संघ स्पर्धेतील त्यांच्या पहिल्या सामन्यासाठी बर्मिंगहॅमला रवाना होतील. इंग्लंडचा सामना १२ जून रोजी श्रीलंकेविरुद्ध, तर भारताचा सामना १४ जून रोजी एडजबॅस्टन येथे पाकिस्तानविरुद्ध होईल.

(वृत्तसंस्था)

### पाकिस्तान संघ श्रीलंकेत मालिका खेळणार

**लाहोर** : इंग्लंडमध्ये आयसीसी टी-२० विश्वचषक संपल्यानंतर काही दिवसांतच, पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आपल्या राष्ट्रीय महिला संघासाठी श्रीलंकेत मर्यादित षटकांच्या मालिकेचे आयोजन केले आहे.

पाकिस्तान आणि श्रीलंका हे दोन्ही देश सध्या महिला टी-२० विश्वचषकासाठी यूकेमध्ये आहेत, जो १२ जून रोजी सुरू होऊन ५ जुलै रोजी संपेल. ■

# दक्षिण आफ्रिकेकडून कामगिरीत सुधारणा आवश्यक

### कर्णधार लॉरा वॉल्व्हार्डचे मत

◆ **मँचेस्टर, १० जून**

न्यूझीलंडविरुद्धच्या सराव सामन्यातील पराभवानंतर दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वॉल्व्हार्डने आपल्या संघाला रणनीती सुधारण्याचे आवाहन केले आहे. शनिवारी येथे होणाऱ्या महिला टी-२० विश्वचषक सामन्यात ऑस्ट्रेलियासारख्या बलाढ्य संघाविरुद्ध त्यांना गाफील राहता येणार नाही, यावर तिने जोर दिला.



आयर्लंडविरुद्धच्या अटीतटीच्या विजयानंतर, दक्षिण आफ्रिकेला गतविजेत्या न्यूझीलंडकडून पाच गडी राखून पराभव पत्करावा लागला. आता, सहा वेळच्या विजेत्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध त्यांना आपल्या खेळाचा स्तर सुधारावा लागेल.

वॉल्व्हार्डने या पराभवाला दक्षिण आफ्रिकेच्या संघासाठी डोळे उघडणारा अनुभव म्हटले आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मोठ्या सामन्यापूर्वी त्यांना आपली रणनीती सुधारावी लागेल, असे ती म्हणाली.

वॉल्व्हार्ड म्हणाली, आम्हा दोघींनाही (सराव सामना) जिंकायचा होता, पण कदाचित स्पर्धा सुरू होण्यापूर्वी आम्हाला याचीच गरज होती. हा एक डोळे उघडणारा अनुभव होता की विजय सहजासहजी मिळत नाहीत आणि आपण केवळ आपल्या गोलंदाजीच्या जोरावर त्याची भरपाई करू शकत नाही. मला वाटते की आपण एका उत्कृष्ट संघाविरुद्ध खेळलो आणि न्यूझीलंडने त्यांच्या फलंदाजीने आपल्यावर मात केली.

त्यामुळे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यासाठी आपल्याला चांगल्या रणनीती आखण्याची गरज आहे आणि आशा आहे की आपण परिस्थिती बदलू शकू.

(वृत्तसंस्था)

# चांगल्या सवयींसाठीच गुरनूरला क्रीडात गुंतवले

### पिता सुखबीर सिंग बरार यांचे मत

◆ **चंदीगड, १० जून**

स्वत:ला चांगला पिता सिद्ध करण्यासाठी आणि मुलगा वाईट संगतीपासून दूर राहून, त्याला चांगल्या सवयी लागाव्यात, यासाठी मी गुरनूरला क्रीडा क्षेत्रात गुंतवले. गुरनूरची क्रिकेटची आवड पाहूनच त्याची पुढील दिशा ठरवली, असे सुखबीर सिंग बरार यांनी वृत्तसंस्थेला सांगितले.

आपला वेगवान गोलंदाज मुलाच्या प्रवासाविषयी सुखबीर म्हणाले, जेव्हा तो त्याच्या विशीच्या शेवटच्या टप्प्यात पोहोचत होता, तेव्हा मला वाटत होते की, माझ्या मुलाने अभ्यासासोबतच खेळातही सहभागी व्हावे, जेणेकरून त्याला इतर कशासाठीच वेळ मिळणार नाही. तसेच, पद्धतशीर प्रशिक्षणामुळे तुम्ही वाईट संगतीपासून दूर राहता आणि एकदा गुरनूर प्रशिक्षक रवी सरांच्या मार्गदर्शनाखाली चॅम्प्स अकादमीमध्ये दाखल झाला तेव्हापासून त्याने मागे वळून पाहिलेच नाही.

गुरनूरने ११वी इयत्तेत क्रिकेट खेळायला सुरुवात केली आणि वयाच्या २६ व्या वर्षी तो भारताच्या कसोटी आणि एकदिवसीय संघांचा भाग आहे. मात्र, त्याला अजून राष्ट्रीय संघात पदार्पण करायचे आहे.

गुरनूरपेक्षा फक्त एक इंच कमी उंचीचे आणि सहा फूट चार इंच उंच असलेले सुखबीर, आपल्या मुलाच्या उज्ज्वल भविष्याबद्दल आत्मविश्वास बाळगून आहेत.

१९९५ च्या राष्ट्रीय बास्केटबॉल चॅम्पियनशिपमध्ये पंजाबचे प्रतिनिधित्व केलेल्या सुखबीर यांनी सांगितले, मी एक पोलिस आहे, पण गुरनूरची आई (मनविंदर) पेक्षा मी जास्त भावुक होतो. जेव्हा आम्हाला त्याच्या भारतीय संघात निवडीबद्दल कळले, तेव्हा माझ्या डोळ्यात पाणी आले. बरार कुटुंबाला त्यांच्या मुलाकडून ही बातमी अगदी सहजपणे मिळाली.

सुखबीर म्हणाले, ज्या दिवशी अफगाणिस्तान



कसोटीसाठी संघाची घोषणा झाली, त्या दिवशी आम्ही कुटुंबातील एका व्यक्तीच्या निधनामुळे मुक्तसर साहिब येथील आमच्या वडिलोपार्जित घरी होतो. आयपीएल दरम्यान गुरनूर जर संध्याकाळी सराव करायचा, तर तो दुपारी झोपायचा आणि नेहमी आपल्या आईला संध्याकाळी ४.४५ वाजता उठवायला सांगायचा.

ते म्हणाले, मग माझ्या पत्नीने त्याला उठवण्यासाठी फोन केला आणि विचारलं, संघाची घोषणा आज होणार होती ना? त्यावर तो म्हणाला, हो, आई, माझी निवड झाली आहे. तो एवढं बोलून फोन ठेवून दिला. सुखबीर म्हणाले, पोलिस दलात असल्यामुळे, मुले मोठी होत असताना मला त्यांच्यासाठी (दोन्ही मुलांसाठी) खूप कमी वेळ मिळाला. गुरनूरने दहावीची बोर्ड परीक्षा पूर्ण केल्यावर, मी त्याला बास्केटबॉल खेळण्याचा सल्ला दिला, कारण मी स्वतः हा खेळ खेळायचो आणि आमची उंची जवळपास सारखीच होती.

(तभा वृत्तसेवा)

### आशियाई स्पर्धेसाठी टी-२० संघाचे नेतृत्व फरहान

**लाहोर** : पाकिस्तानने बुधवारी जपानमधील आयची-नागोया येथे होणाऱ्या आशियाई खेळांमधील पुरुषांच्या टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी सलामीवीर साहिबजादा फरहानच्या नेतृत्वाखालील १५ सदस्यीय संघाची घोषणा केली, ज्यात बहुसंख्य खेळाडू अननुभवी आहेत. बाबर आझम, मोहम्मद रिझवान, शाहीन शाह आफ्रिदी, हरिस रौफ आणि शादाब खान यांसारख्या वरिष्ठ स्टार खेळाडूंचा संघात समावेश करण्यात आलेला नाही. साहिबजादा फरहान आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पहिल्यांदाच पाकिस्तानचे कर्णधारपद भूषवणार आहे. ■

# राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांना विलंब का? खेळाडू संभ्रमात

◆ **नवी दिल्ली, १० जून**

सध्या भारताच्या क्रीडाविश्वात काहीशी अस्वस्थता आहे, याचे मुख्य कारण म्हणजे राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांना होणारा विलंब. भारताच्या क्रीडा कामगिरीचा वार्षिक गौरव करणारे राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार, निवड समितीने सहा महिन्यांपूर्वी आपल्या शिफारशी सादर केल्या असूनही, अद्याप जाहीर करण्यात आलेले नाहीत.

क्रीडा मंत्रालयाने या परिस्थितीसाठी 'अर्जुन पुरस्काराच्या नामांकनांची पुनर्तपासणी'' हे कारण दिले आहे. मंत्रालयाची मंजुरी मिळाल्यानंतरच नामांकितांना पुरस्कार दिला जातो.

मंत्रालयातील विश्वसनीय सूत्रांनुसार, ही दीर्घ प्रतीक्षा प्रक्रियेचा एक भाग आहे आणि ''पुरस्कारांची प्रतिष्ठा जपण्यासाठी''आवश्यक आहे. मात्र, हे स्पष्टीकरण खेळाडूंसाठी दिलासादायक नाही.

एका माजी खेलरत्न पुरस्कार विजेत्याने सांगितले की, अद्याप कोणतीही घोषणा झालेली नाही हे दुर्दैवी आहे. हे खेळाडूंसाठी मनोधैर्य खच्ची करणारे आहे, विशेषतः अशा वेळी जेव्हा बहुतेक लोकांना त्यांचे नाव अंतिम यादीत आहे की नाही हे अनौपचारिकपणेच कळते. राष्ट्रपती भवनात होणाऱ्या या सोहळ्याची तारीख बऱ्याच काळापासून अनिश्चित होती.

परंपरेनुसार, हा सोहळा २९ ऑगस्ट रोजी, राष्ट्रीय क्रीडा दिनी आयोजित केला जात असे. याच दिवशी भारताच्या महान खेळाडूंपैकी एक असलेले हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा वाढदिवस देखील असतो.

मात्र, २०२० मधील कोविड-१९ महामारीमुळे ही तारीख अनिश्चित झाली होती. आरोग्यविषयक नियमांमुळे, हा सोहळा आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आला होता.

(वृत्तसंस्था)

# वर्धेच्या कराटेपटूंचे नेपाळमध्ये यश

### १७ पदकांची कमाई

◆ **वर्धा, १० जून**

काठमांडू येथे नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय कराटे चॅम्पियनशिपमध्ये वर्धेच्या खेळाडूंनी १७ पदकांची कमाई केली.

२ ते ४ जून रोजी जावलाखेल व्हॉलिबॉल स्टेडियम काठमांडू येथे १७ वी एन. एस. के. ए. आंतरराषष्ट्रीय कराटे चॅम्पियनशिप स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये भारत, श्रीलंका, कतार, बांगलादेश, नेपाळ व भूतान आदी देशांचा समावेश होता. किमान १ हजार स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. काता, कुमिते, टीम काता, टीम कुमिते अशा विविध वजन गटांत स्पर्धा घेण्यात आल्या. भारताचे प्रतिनिधित्व करीत शिहान




यशस्वी खेळाडूंसह उपस्थित मान्यवर

दिलीप कठाणे वर्धा आय. एस. के. आय. कराटेच्या खेळाडूंनी मुख्य प्रशिक्षक शिहान दिलीप काठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत मोलाची कामगिरी बजावत तब्बल १७ पदके पटकावली. मुलींमध्ये इशिता राहाटे १ रौप्य, २ कांस्य, स्वरा कावळे २ कांस्य, मुलांमध्ये जय ठक्कर याने १ रौप्य, २ कांस्य, शिव राम १ रौप्य, २ कांस्य, रियांश किटे २ रौप्य, रिषभ कोरे १ रौप्य, १ कांस्य, अश्मित नखाते १ रौप्य आणि १ कांस्य पदक पटकावले. या यशस्वी खेळाडूंचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

(तभा वृत्तसेवा)

# ३० हजार नागरिकांची तहान भागतेय १७ टँकरवर

**आणखी १० टँकरसाठी जि.प. प्रशासनाची तयारी**

**१६ गावे, ८२ वाड्यांमध्ये पाणीटंचाई; माळशिरस तालुका जिल्ह्यात सर्वाधिक प्रभावित**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जून-**

पावसाचे आगमन लांबल्याने आणि भूजल पातळीत झालेल्या घटीमुळे जिल्ह्यातील पाणीटंचाईची परिस्थिती कायम आहे. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनूसार जिल्ह्यात ३० हजार नागरिकांची तहान १७ टँकरने भागवली जात असल्याचे दिसून येत आहे.

जिल्ह्यात सध्या १६ गावे व ८२ वाड्यांतील ३० हजार १५५ नागरिकांना १७ टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत आहे. संभाव्य टंचाईची तीव्रता लक्षात घेऊन प्रशासनाने आणखी १० गावांसाठी १० नवीन टँकर मंजूर करण्याचा प्रस्ताव वरिष्ठ स्तरावर पाठविल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी दिली.

माळशिरस तालुका सर्वाधिक टंचाईग्रस्त असून येथे ८ गावे आणि ६३ वाड्यांतील १३ हजार ३१५ नागरिकांसाठी ८ टँकर कार्यरत आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील सर्वाधिक टँकर याच तालुक्यात सुरू आहेत.

अक्कलकोट तालुक्यातील एका गावासाठी १ टँकर, बार्शीतील एका गावासाठी १ टँकर, दक्षिण सोलापूरमधील एका गावासाठी १ टँकर, तर सांगोला तालुक्यातील २ गावे व १९ वाड्यांसाठी २ टँकर कार्यरत आहेत.



जिल्हाभरात या टँकरद्वारे दररोज ३५ पाणीफेऱ्या केल्या जात आहेत. उन्हाळ्याच्या अखेरीस पिण्याच्या पाण्याची समस्या अधिक गंभीर होऊ नये यासाठी प्रशासनाने अतिरिक्त उपाययोजनांना वेग दिला आहे. प्रस्तावित गावांमध्ये करमाळा तालुक्यातील चोटी व केम, माळशिरसमधील कोयळे व उंबरे दहिगाव, माढ्यातील अंजनगाव व तुळशी, सांगोल्यातील कोळे तसेच मंगळवेढा तालुक्यातील लेंडवे चिंचाळे, खुपसंगी आणि रखे या गावांचा समावेश आहे. प्रत्येक गावासाठी प्रत्येकी १ टँकर मंजूर करण्याची मागणी केली आहे.

पावसाळा पूर्णपणे सक्रिय होईपर्यंत ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा त्रास होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून सातत्याने आढावा घेऊन उपाययोजना केल्या जात आहेत.

- **कुशल जैन,** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर.



**टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची आकडेवारी**

| | |
|---|---|
| कार्यरत टँकर : | १७ |
| लाभार्थी गावे : | १६ |
| लाभार्थी वाड्या : | ८२ |
| लाभार्थी नागरिक : | ३०,१५५ |
| दररोज पाणीफेऱ्या : | ३५ |
| प्रस्तावित नवीन टँकर : | १० |
| प्रस्तावित गावे : | १० |

**सर्वाधिक टंचाईग्रस्त तालुका : माळशिरस**

# बायोमेट्रिक हजेरीची कडक अंमलबजावणी आवश्यक

**कागदोपत्री नको; खासगी कोचिंग क्लासेस व कॉलेजमधील साटेलोटे संपवणे आवश्यक**

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि १० जून-**

सोलापूर जिल्ह्यात अनेक कॉलेज व खाजगी कोचिंग क्लासेस यांच्यामध्ये साटेलोटे आहे. हे संपवण्यासाठी शासनाने बायोमेट्रिक हजेरीची कडक अंमलबजावणी करावी, कागदोपत्री नको, अशी भावना व्यक्त होत आहे.

कॉलेज व खाजगी कोचिंग क्लासेस दोन्ही मिळून सध्या शैक्षणिक धोरण चालवित आहेत. कॉलेजमध्ये प्रवेश घ्यायचा, फी भरायची व फक्त परीक्षेसाठी कॉलेजमध्ये जायचे . वर्षभर खाजगी कोचिंग क्लासेसमध्ये तयारी. कॉलेजमध्ये हजर शिकण्यासाठी, प्रॅक्टीकलसाठी मग वर्षभर कॉलेज बोगस हजेरी लावणार अशी विदारक स्थिती सध्या सर्वत्र पाहावयास मिळत आहे. यासाठी शासनाने कठोर पाऊल उचलले आहे. कॉलेजमध्ये दररोज बायोमेट्रिक हजेरीसह ७५ टक्के कॉलेजमध्ये हजेरी अन्यथा परीक्षेस बसताच येणार नाही. याची शासनाने प्रभावीपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे तरच याला कुठे तरी चाप बसेल अन्यथा पहिले पाढे पंचावन्न अशी परिस्थिती आहे.





कॉलेजला फी भरुन प्रवेश घ्यायचा व फक्त परीक्षेसाठीच कॉलेजमध्ये जायचे मग खाजगी कोचिंग क्लासेसमध्ये लाखो रुपये फी भरुन एम.एच सीईटी, नीट, जेईई अशा परीक्षांची तयारी करायची. यामुळे कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांचा अक्षरक्ष: शुकशुकाट पाहावयास मिळत आहे.

**अकरावी व बारावी अभ्यासक्रमाचा परीक्षेसाठी समावेश हवा**

खासगी कोचिंग क्लासेस व कॉलेज यांच्यातील साटेलोटे दुर्दैवी आहे. यासाठी अकरावी व बारावी अभ्यासक्रमाचा परीक्षेसाठी समावेश करावा. जेणेकरून दोन्ही वर्षाला महत्त्व राहील.

- **जयंत गोरे,** पालक.

शिक्षण विभागाने बायोमेट्रिक हजेरीसह, वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे, अचानक महाविद्यालयांना भेटी देऊन पट पडताळणी, जेवढी मान्यता तेवढेच विद्यार्थी याची पाहणी करणे, कॉलेजचा मान्यता व यु डायस क्रमांक दर्शनी भागात लावणे, ज्या कॉलेजचे खाजगी कोचिंग क्लासेस बरोबर साटेलोटे आहे, त्याची मान्यता रद्द करणे अशी कडक व प्रभावी अंमलबजावणी केल्याशिवाय यामध्ये बदल होणार नाही.



# महूद परिसरातील निवृत्त शिक्षकांचा कृतज्ञता सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१० जून-**

महूद परिसरातील निवृत्त प्राथमिक शिक्षकांचा कृतज्ञता सत्कार समारंभ नुकताच झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवदास लोखंडे, जि.प.सदस्य दादासाहेब लवटे, पं.स.सदस्य उमेश पाटील उपस्थित होते. संजय महाजन, प्रकाश नष्टे, सलीम मुलाणी, संपत आसबे, भास्कर महाजन, सुधाकर डांगे या शिक्षकांचा तसेच महूद येथील कावड भक्तांचे प्रतिनिधी बाबुराव नागणे व प्रतीक ताटे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी दादासाहेब लवटे, उमेश पाटील, धनंजय नरळे, डॉ.शरद नागणे, ग्राम विकास अधिकारी जयवंत लवटे, संजय महाजन यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी दिलीप नागणे, महेंद्र बाजारे, विजय खबाले, निलेश नागणे, लक्ष्मण जाधव, रमाकांत तोडकरी, गणेश लवटे, विजय मरगर, यशवंत खबाले, जयवंत लवटे, संतोष नागणे, बाबुराव नागणे, धनंजय खांडेकर, संजय धोकटे, अरुण चव्हाण, अरुण नागणे, संतोष पवार उपस्थित होते. आभार उमेश महाजन यांनी मानले.

# अहिल्याबाई होळकर यांनी लोककल्याणाला प्राधान्य दिलं

**- प्रथमेश इंगळे; पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त पूजा**

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १० जून -**

अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या कारकिर्दीत धर्मशाळा, घाट, विहिरी, तळी आणि मंदिरांच्या जीर्णोद्धारासाठी अमाप काम केलं. काशी विश्वनाथ मंदिरापासून रामेश्वरमपर्यंत त्यांच्या कार्याची छाप आहे. राज्य म्हणजे प्रजा हा मंत्र घेऊन त्यांनी लोककल्याणाला प्राधान्य दिलं असे प्रतिपादन युवा नेते प्रथमेश इंगळे यांनी व्यक्त केले.

आज येथील ऑल इंडिया धनगर समाज महासभा आयोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्याची पुजा झाली. यावेळी ते बोलत होते.

जलसंवर्धन, धर्मसंरक्षण आणि स्त्रीशक्तीची मूर्तिमंत प्रतीक असलेल्या पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती आज येथे





उत्साहात झाली याचा विशेष अभिमान वाटतो. 'जल हेच जीवन' हे तत्त्व प्रत्यक्षात आणणाऱ्या अहिल्यादेवींच्या विचारांवर चालणं हेच त्यांच्या साठी खरे अभिवादन आहे.

यावेळी ऑल इंडिया धनगर समाज महासभा उत्सव समितीतर्फे प्रथमेश इंगळे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी अध्यक्ष गंगाधर म्हेत्रे, वकील भिमशा पुजारी, निंगप्पा पुजारी संचालक मार्केट कमिटी, रमेश शिंदे, अमोल महाडिक आदींसह मंडळाचे कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# 'फॅबटेक'मुळे सांगोल्याची शैक्षणिक पताका राज्यभर- पालकमंत्री

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१० जून-**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण आणि रोजगाराभिमुख शिक्षण देत फॅबटेक टेक्निकल कॅम्पसने सांगोल्याला राज्याच्या शैक्षणिक नकाशावर ठळक स्थान मिळवून दिले आहे. फॅबटेकच्या शैक्षणिक गुणवत्तेमुळे सांगोल्याच्या वैभवात मोठी भर पडली आहे. संस्थेचे कार्य अनुकरणीय असल्याचे मत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी फॅबटेक टेक्निकल कॅम्पस भेटी दरम्यान व्यक्त केले. याप्रसंगी त्यांनी फॅबटेकमधील फार्मसी, इंजिनिअरिंग, पॉलिटेक्निक महाविद्यालयातील विविध विभागाला तसेच ग्रंथालयास भेट देऊन माहिती घेतली. या दरम्यान फॅबटेक संस्थेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, सचिव डॉ.अमित रूपनर, दिनेश रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ. संजय आदाटे, प्राचार्य डॉ.रविंद्र शेंडगे, उपप्राचार्य डॉ.विद्याराणी क्षीरसागर, पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ.तानाजी बुरूंगले आदींसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महत्वाचे...



## विद्यार्थ्यांनी विकसित केली एअर-कूल्ड ईव्ही बॅटरी एनक्लोजर प्रणाली

**सोलापूर, दि. १० जून-**

इलेक्ट्रिक वाहनांच्या वाढत्या वापरामुळे बॅटरीचे तापमान नियंत्रण हे महत्त्वाचे आव्हान बनले आहे. याच पार्श्वभूमीवर ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटच्या यांत्रिकी अभियांत्रिकी विभागातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी एअर-कूल्ड ईव्ही बॅटरी आणि एनक्लोजर डिझाइन हा नाविन्यपूर्ण प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण केला आहे. या प्रकल्पामध्ये इलेक्ट्रिक वाहनांच्या बॅटरीसाठी हवेच्या माध्यमातून कूलिंग करणारी प्रणाली आणि त्यासाठी आवश्यक एन्क्लोजरची रचना विकसित करण्यात आली. बॅटरीच्या कार्यक्षमतेवर व आयुष्यावर तापमानाचा मोठा परिणाम होत असल्याने सुरक्षित व परिणामकारक उष्णता व्यवस्थापनावर या प्रकल्पात विशेष भर देण्यात आला. बॅटरी पॅकमधील उष्णता प्रभावीपणे बाहेर काढण्यासाठी योग्य हवेचा प्रवाह, तापमान वितरण आणि हॉटस्पॉट्स टाळण्याच्या दृष्टीने अभ्यास करण्यात आला. हा प्रकल्प अथर्व देशमुख, यशराज कल्याणी, मेघा म्हेत्रे आणि संजना इंगळे या विद्यार्थ्यांनी पूर्ण केला. प्रकल्पासाठी प्रा. आर. एस. मोटगी यांनी मार्गदर्शन केले. या प्रकल्पाचे संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील, संस्थेचे सचिव एस. एस. पाटील, संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. चोगुले व उपप्राचार्य एस. के. मोहिते यांनी कौतुक केले.





## प्रा. डॉ. रामचंद्र यादव राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**सांगोला, दि.१० जून-**

आलेगाव (ता.सांगोला) येथील प्रा.डॉ.रामचंद्र यादव यांना के.एस.आय पब्लिकेशन संस्था आणि विद्यानिकेतन सामाजिक व शैक्षणिक संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्तपणे लोकमान्य टिळक ग्रंथालय, वाई (जि.सातारा) येथे आयोजित ५ व्या राज्यस्तरीय मृग नक्षत्र कवी संमेलनात संमेलनाचे अध्यक्ष नागनाथ डोलारे, स्वागताध्यक्ष शशिकांत कोचळे, मुख्य कार्यकारी अधिकारी विलास पाटील यांच्या हस्ते राज्यस्तरीय छत्रपती शिवाजी महाराज साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी उद्घाटक विलास खरात, डॉ. श्रीकांत पाटील, सचिन वाघमारे, योगेश यादव, ऐश्वर्या यादव उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या थोरात-काळे, दिपक पवार यांनी केले.



## विनायक सुतार यांच्या कार्य अहवालाचे प्रकाशन

**सोलापूर, दि. १० जून -**

कारंबा व परिसरातील गावासाठी ११ वर्षांमध्ये विनायक सुतार यांनी केलेल्या कार्याचे भाजप प्रदेश कार्यालय मुंबई येथे प्रकाशन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष कृष्णा गौर, महाराष्ट्र भाजप सरचिटणीस आमदार योगेश सागर, महाराष्ट्र भाजप ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष योगेश टिळेकर, माजी केंद्रीय मंत्री हंसराज अहिर, अंदमान निकोबार भाजप ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष हरीश पटेल, महाराष्ट्रातील सर्व जिल्हाध्यक्ष, प्रदेश कार्यकारणी सदस्य, सरचिटणीस, युवा संयोजक, महिला संयोजक यांची उपस्थिती होती. प्रकाशनाप्रसंगी आमदार योगेश टिळेकर यांनी आर्थिक दुर्बल घटकातील लोकांसाठी चांगलं काम केल्याचे सांगितले.

## निधन वृत्त...

### हरीदास घोडके



**सोलापूर, दि. १० जून-**

भागाईवाडी (ता. उत्तर सोलापूर) येथील जेष्ठ नागरीक हरीदास कुंडलीक घोडके यांचे निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे ८३ वय होते त्यांच्या पश्चात तीन भाऊ, पत्नी, मुलगा, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते भजनी मंडळाचे जेष्ठ सदस्य होते.

### दाजी कुचेकर



**सोलापूर, दि. १० जून-**

भवानी पेठ, मुकुंद नगर येथील सोलापूर महानगरपालिका पाणीपुरवठा विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी दाजी मसा कुचेकर (वय ७७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर भवानी पेठ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंड असा परिवार आहे. प्रा. नवनाथ कुचेकर यांचे ते वडील होत.

# पुण्यातून बेपत्ता अल्पवयीन बालकांचा यशस्वी शोध

**पंढरपूर तालुका पोलिसांची कौतुकास्पद कारवाई**

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.१० जून-

येथील तालुका पोलिसांनी रात्रीच्या गस्त दरम्यान पुण्यातून बेपत्ता असलेल्या दोन अल्पवयीन बालकांना शोधून त्यांना सुखरुपपणे पालकांच्या स्वाधीन केल्याची माहिती तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी.वाय.मुजावर यांनी दिली.

पोलिस निरीक्षक मुजावर म्हणाले, १० जून रोजी पहाटे तीन वाजताच्या सुमारास उरुळी कांचन पोलिस स्टेशन पुणे ग्रामीण येथील पोलिसांनी पंढरपूर तालुका पोलिसांना सोळा वर्षांची दोन मुले घरात किरकोळ कारणावरून भांडण करून उरळीकांचन येथून सोलापूरच्या दिशेने बंगळूरला जात आहेत. त्यांना शोध घेऊन ताब्यामध्ये घ्यावे अशी माहिती दिली. त्यानंतर तालुका पोलिसांनी शोध मोहीम राबवली.



अनवली फाटा या ठिकाणी जाणाऱ्या ट्रक चालकांकडे विचारपूस केली असता पुणे बंगळूर जाणाऱ्या ट्रक जवळ दोन अल्पवयीन मुले पंढरपूर तालुका पोलिसांना सापडली. त्यानंतर पोलिसांनी त्यांची नाव, पत्ते खात्री करून उरळीकांचन पोलिसांना संपर्क केला. मुलांकडे विचारपूस केली असता त्यांनी वडिलांनी रागावल्यामुळे ती दोन्ही मुलं पुण्यातून घर सोडून बंगळूरकडे जात असल्याचे सांगितले. ट्रक चालक हे वाहनांमध्ये अनवली फाटा येथे चाकातील हवा चेक करण्यासाठी थांबला असता तिथे ती मुलं ट्रकमधून उतरून दुसऱ्या गाडीची वाट बघत थांबली होती, असे सांगितले.

पंढरपूर तालुका पोलिसांनी त्यानंतर त्या मुलांना समजूत घातली. त्यांना पोलिस स्टेशन येथे नेऊन त्यांची जेवणाची सोय केली. त्यांच्या नातेवाईकांशी संपर्क करुन त्यांना आणि उरुळी कांचन पोलिसांना बोलावून घेऊन पहाटे पोलिसांच्या ताब्यामध्ये दोन्ही मुलांना सुखरूपपणे दिले.

ही कारवाई सहाय्यक पोलिस अधीक्षक प्रशांत डगळे, पंढरपूर तालुका पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी.वाय. मुजावर, पीएसआय विक्रम वडणे, सहाय्यक फौजदार सुधाकर हेंबाडे, हवालदार मंगेश रोकडे व चालक कॉन्स्टेबल रामभाऊ चाटे यांनी पार पाडली.

**पंढरपूर तालुका पोलिसांचे मानले आभार**

घरातील लहान मुले किरकोळ रागावल्याचा कारणावरून एवढे मोठे पाऊल उचलतात ही मनाला हेलकावणारी गोष्ट आहे. परंतु पंढरपूर तालुका पोलिसांनी वेळीच तत्परता दाखवून दोन्ही मुलांचे मन परिवर्तन करून त्यांना नातेवाईकांच्या ताब्यात दिले. नातेवाईकांनी मुलांना पाहून पंढरपूर तालुका पोलिसांचे आभार मानले.

## महत्वाचे...



**सोलापूर : गोकुळ साखर कारखान्याला घातलेल्या उसाच्या थकित बिलासाठी शेतकऱ्यांनी बुधवारी तलावात जलसमाधी आंदोलन केले.**

## नवीन जागा खरेदीसाठी माहेरून ५२ लाख रुपये आण म्हणून विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि. १० जून-**

लग्नात मानपान केला नाही, सोने घातले नाही म्हणून व नवीन जागा खरेदी करण्यासाठी माहेरून ५२ लाख रूपये घेवून ये असे म्हणून विवाहितेस घटस्फोट देण्याची धमकी देऊन शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पतीसह चौघा जणांविरुद्ध एम आयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रीनू-पती, कांचना, पुरुषोत्तम-सासरा, स्वरूप श्रीहीर चिटयाल (रा. सोलापूर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत श्वेता श्रीनु सभांरभ (वय-४० वर्षे, रा. मार्केडय सोसायटी, नवीन वांलचंद कॉलेज समोर, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे.यातील फिर्यादी सन २०१० ते मे २०२६ पर्यत पद्मा नगर सोलापूर या ठिकाणी नांदत असताना वरील आरोपींनी लग्नामध्ये संसारोपयोगी सामान दिले नाही, सोने पैसे दिले नाही, योग्य मानपान केला नाही म्हणून अपमानीत करुन फिर्यादीला शिवीगाळ केली.तसेच नवीन जागा खरेदी करण्यासाठी माहेरून ५२ लाख रूपये घेवून ये, असे म्हणून मारहाण करून घटस्फोट देण्याची धमकी देवून शारीरीक व मानसिक छळ केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार घोडके हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.





**सोलापूर : अक्कलकोट, अन्नछत्र मंडळाचे विश्वस्त जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांना ७५ वर्ष पूर्ण झाली. या सुवर्ण दिनी नाशिकचे प्रशांत गाडगीळ यांनी महाराजांना ताम्रपट भेट देऊन सन्मानित केले.**



## वंचित बहुजन आघाडीतर्फे बैलगाडी जनआक्रोश मोर्चा; बैलगाडी घेऊन शेतकरी सहभागी

**अक्कलकोट, दि. १० जुन-**

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने अक्कलकोट शहरात विविध मागण्यांसाठी सोमवारी बैलगाडी जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. मोर्चाची सुरुवात एवन चौकातून करण्यात आली. शहरातील जुने तहसील कार्यालय , फत्तेसिंह चौक , मेन रोड , कारंजा चौक , विजय कामगार चौक ते बस स्थानकापर्यंत जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. मोर्चात शेतमालाला भाव नाही, खतांचे वाढलेले दर, पेट्रोल डिझेल गॅसचे वाढलेले दर, बेरोजगार तरुणांना रोजगार, नीट पेपर फुट, लाडकी बहिण योजनेसाठी अनुसूचित जातीचा वळवलेला निधी आदी प्रश्नांवर प्रकाश टाकण्यात आला. मोर्चात केंद्र आणि राज्य शासनाचा निषेध करण्यात आला. मोर्चात बैलगाडी घेऊन शेतकरी सहभागी झाले होते. मोर्चात वंचित बहुजन आघाडीतील राज्यनेत्यांनी शासनाच्या धोरणावर टीका केली. मोर्चात राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य डॉ.नितीन ढेपे, राज्य उपाध्यक्ष डॉ. अनिल जाधव, ॲड. सर्वजित बनसोडे, राज्य उपाध्यक्ष सोमनाथ साळुंखे, जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, तालुकाध्यक्ष विशाल ठोंबरे, सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ता रविराज पोटे, यशवंत इंगळे, बबन गायकवाड, भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष साहिल कांबळे, युवक आघाडीचे तालुकाध्यक्ष शीलामणि बनसोडे, कामगार आघाडीचे तालुकाध्यक्ष सिद्धार्थ बनसोडे, अमृत सोनकांबळे, नितीन शिवशरण, शिवाजी चौगुले, युवक शहराध्यक्ष संदीप बाळशंकर, प्रकाश शिंदे, गौतम गायकवाड, विश्वजीत भालेराव, श्याम बनसोडे, संतोष बाळशंकर, नागेश हरवाळकर, चन्नू शिंगे, आनंद मोरे, संतोष घाटगे, खाजाप्पा एवळे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंगळवेढा सबजेलमधून न्यायालयीन कोठडीतील आरोपी पळाला

## आरोपी विरुध्द गुन्हा दाखल; माध्यमांपासून घटना लपवण्याचा प्रयत्न



**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. १० जून-**

मंगळवेढा येथील सबजेलमधून न्यायालयीन कोठडीत असलेला आरोपी महेश बिराप्पा बंडगर (रा.शिराढोण राज्य कर्नाटक) हा भरदुपारी पळून गेला. या प्रकरणी त्याच्या विरुध्द मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान कर्तव्यात कसूर केलेल्या ३ पोलिस कर्मचाऱ्यांवर जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी आता नेमकी काय कारवाई करणार? याकडे नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

आरोपी महेश बंडगर हा मंगळवेढा पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यानूसार न्यायालयीन कोठडीत होता. दि.९ रोजी भर दुपारी १२.३५ वाजता न्यायालयीन कोठडीतील रखवालीतून नजर चुकवून तो फरार झाल्याचे अंमलदार अमर नकाते यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास हवालदार दत्तात्रय व्हरे हे करीत आहेत. दरम्यान सबजेलमधून भरदिवसा आरोपी गार्डवर तीन पोलीस कर्मचारी असताना कसा काय पळून गेला? याबाबत उलटसुलट चर्चा सुरु आहे. आरोपी पळून जाताच पोलिस दलात मोठी खळबळ उडाली . याची माहिती मिडियापर्यंत पोहचू नये याची कटाक्षाने काळजी पोलिस प्रशासनाने घेतली होती. प्रसार माध्यमांनी याबाबत माहिती विचारली असता अधिकाऱ्यासह कर्मचाऱ्यांनी हात झटकले, मात्र गुन्हा दाखल झाल्यानंतर याबाबत सविस्तर माहिती मिळाली आहे. कारागृहात आरोपींना जेवणाचे डब्बे खाजगी व्यक्ती पुरवत असताना आरोपी या संधीचा फायदा घेवून फरार झाल्याची चर्चा परिसरात दिवसभर सुरु होती.

### आगीतून उठून फुफाट्यात पडल्याचा प्रकार....

नवीन तहसिल कार्यालयात लाखो रुपये खर्च करुन सुरक्षित सबजेल बांधले आहे. येथे आरोपी पळून जाण्याचा प्रकार कधीच घडला नाही. सुविधाही सगळ्या असताना कोणाच्या आशिर्वादाने तेथील आरोपी जुन्या तहसिल कार्यालयाच्या आवारातील कौलारु सबजेलमध्ये आणून ठेवले. यापुर्वीही दोन वेळा आरोपी येथून पळून गेले होते. याचा वाईट अनुभव असतानाही पुन्हा येथे आरोपी का आणले? असा सवाल जेलर व पोलीस प्रशासनास विचारला जात आहे. काही आरोपी जेलमध्ये न थांबता व्हरांड्यात बसत असल्याचेही चित्र नागरिकांनी पाहिले आहे. नवीन तहसिल कार्यालयात सी.सी.टी.व्ही.कॅमेरे असल्यामुळे कोणताही गैरप्रकार तेथे भीतीपोटी घडत नव्हता. जुन्या तहसिल कार्यालय परिसरात सी.सी.टी.व्ही.कॅमेरे नसल्यामुळे गैरप्रकार घडत असल्याचाही आरोप नागरिकामधून होत आहे. पोलिसांचे पथक कर्नाटकमध्ये तात्काळ दाखल होवून आरोपीचा शोध घेतला असता तो मिळून आल्याचे सांगण्यात आले.

## बुधवार पेठ, सात रस्ता परिसरातील जीर्ण निवासस्थाने तातडीने रिकामी करा

### सफाई कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी महापौरांचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० जून-**

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर बुधवार पेठ आणि सात रस्ता परिसरातील महानगरपालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांच्या जीर्ण व धोकादायक निवासस्थानांचा प्रश्न ऐरणीवर आला असून, कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने स्थलांतर करण्याचे आदेश महापौर विनायक कोंडयाल यांनी दिले.

बुधवारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात झालेल्या बैठकीस दोन्ही ठिकाणच्या महानगरपालिकेच्या निवासस्थानांची सद्यस्थिती, त्यांची जीर्ण अवस्था आणि पावसाळ्यात संभाव्य धोके यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. कोणतीही दुर्घटना घडू नये आणि कर्मचाऱ्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ नये, यासाठी तातडीच्या उपाययोजनांची गरज व्यक्त करण्यात आली. सफाई कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध पर्यायी निवासव्यवस्थांचा आढावा घेण्यात आला. सुरक्षित आणि सुसज्ज निवास उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ती पावले उचलली जाणार असल्याचे प्रशासनाने सांगितले. महानगरपालिका आपल्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत कटिबद्ध असून, पावसाळ्यापूर्वी सर्व आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना पूर्ण करून कोणतीही दुर्घटना टाळण्यासाठी विशेष खबरदारी घेतली जात असल्याचे बैठकीत महापौरांनी स्पष्ट केले.

### संबंधित कर्मचाऱ्यांनी त्वरित सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे

संबंधित कर्मचाऱ्यांनी त्वरित सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. पर्यायी निवासव्यवस्था स्वतः करावी किंवा महानगरपालिकेकडून उपलब्ध करून दिलेल्या निवासस्थानी जावे. प्रशासनाने ही प्रक्रिया युद्धपातळीवर राबवून पावसाळ्यापूर्वी धोकादायक इमारती पूर्णपणे रिकाम्या करण्याचे आदेशही महापौर कोंडयाल यांनी दिले.

## कर्नाटकच्या धर्तीवर ई-चलनावरील ५० टक्के दंड सवलत लागू करा

### वाहतूक संघटना संयुक्त महासंघाची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० जून-**



कर्नाटक शासनाने प्रलंबित ई-चलनावरील दंडात ५० टक्के सवलत लागू केल्यानंतर महाराष्ट्रातही तत्सम निर्णय तात्काळ लागू करावा, अशी मागणी वाहतूक संघटना संयुक्त महासंघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

महासंघाचे प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कर्नाटक शासनाच्या निर्णयामुळे हजारो वाहन चालक व वाहन मालकांना आर्थिक दिलासा मिळाला असून शासनाच्या महसुलातही वाढ होणार आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनानेही प्रलंबित ई-चलनावरील दंडात ५० टक्के सवलत जाहीर करावी.

१० डिसेंबर २०२५ रोजी हिवाळी अधिवेशनात मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनी ई-चलनावरील दंड सवलती संदर्भात अभय योजना अंतर्गत समिती स्थापन करून तीन महिन्यांत निर्णय घेण्याची घोषणा केली होती. मात्र अद्याप याबाबत कोणताही शासन निर्णय (जी.आर.) जारी करण्यात आलेला नाही. यावेळी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद, महासचिव प्रदीप शिंगे, प्रभारी शहराध्यक्ष शंकर राऊत, इम्रान शेख, यासीन मुल्ला, मनोहर खांडेकर, अन्सार शेख उपस्थित होते.



**सोलापूर : जेष्ठ विधिज्ञ ॲड. बसवराज सलगर यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करताना तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, व्यवस्थापक विनायक पुला, जाहिरात व्यवस्थापक मनोहर बायनी, प्रकाश जाधव आणि राजकुमार सलगर.**

## सोरेगाव शिवारात तरूणाची आत्महत्या

**सोलापूर, दि. १० जून-**

अज्ञात कारणावरून एका २६ वर्षीय तरुणाने लिंबाच्या झाडाला केबलच्या सहायाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना विजापूर महामार्गावरील सोरेगाव शिवारात आज बुधवारी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. धर्मा बलभीम वाघमारे (वय २६ वर्ष, रा. सोरेगाव) असे त्या आत्महत्या केलेल्या तरूणाचे नाव आहे. आज बुधवारी दुपारी धर्मा वाघमारे हा गळफास घेतलेल्या अवस्थेत महार वतनाच्या जागे जवळ लटकताना स्थानिक लोकांना आढळून आला. तेव्हा काही लोकांनी याबाबतची माहिती विजापूर नाका पोलिसांना दिली असता पोलीस हवालदार व्ही. डी. घुगे यांनी घटनास्थळी पोहचून सदरचा मृतदेह इतरांच्या मदतीने खाली उतरवून शवविच्छेदनासाठी येथील शासकीय रूग्णालयात सायंकाळी दाखल केला. याबाबत सिव्हील पोलीस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## पंतप्रधान मोदींच्या १२ वर्षांच्या यशस्वी कार्यकाळानिमित्त सिद्धेश्वर मंदिरात महाआरती

**सोलापूर, दि. १० जून-**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने विकास, राष्ट्रीय सुरक्षा आणि जागतिक स्तरावरील प्रतिष्ठेच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या यशस्वी १२ वर्षांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळानिमित्त सोलापूरच्या ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर मंदिरात महाआरती करण्यात आली. याप्रसंगी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, महापौर विनायक कोंड्याल, श्री सिद्धेश्वर देवस्थान समितीचे अध्यक्ष धर्मराज काडादी, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, भाजप सोलापूर शहर अध्यक्षा रोहिणी तडवळकर, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, मनीष देशमुख, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर तसेच भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हिंदुपूरचे आमदार बाळकृष्ण यांच्या वाढदिवसानिमित्त ३६६ जणांचे रक्तदान




**सोलापूर, दि. १०-**

नंदमूरी नटसिंह पद्मभूषण पुरस्कृत हिंदुपूरचे आमदार बाळकृष्ण यांच्या ६६व्या वाढदिवसानिमित्त बालू युथ फेडरेशनतर्फे रक्तदान शिबिर संपन्न झाले. यात ३६६ रक्तदात्यानी रक्तदान करून आपली सामाजिक बांधीलकी जोपासली.

प्रमुख पाहुणे नगरसेवक मेघनाथ येमूल, व्यंकटेश कोंडी, सत्यनारायण गुर्रम, विजय चिप्पा, श्रीकांत वाडेकर, प्रकाश मंजेली, शेखर इगे, शंकर चौगुले, निलगार समाजाचे ट्रस्टी नारायणराव काळपगार, समाज सेवक अनिल कोंडूर व व्यंकटेश नंदाल आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी दहावीचे विद्यार्थी अर्पणा गुंडेटी, माया यंगाली, योगिता कुरापाटी, अनूश्री अन्नम, कृष्णमनोहर गुडूर, आकांक्षा कोंडा, अर्चिता कनकी व १२ वी विद्यार्थीनी श्रीवाणी नडिमेटला यांचा सत्कार करण्यात आला. दयानंद आल्लोळी यांनी सूत्रसंचालन केले. अध्यक्ष नरसिंह कनकी व सचिव श्रीनिवास कट्टा यांनी सर्व प्रमुख पाहुण्यांचे व रक्तदात्याचे व ब्लड बँकेचे आभार मानले

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गणेश जल्ला, देविदास मंगलपल्ली, रमेश महिंद्रकर, नागभुषण वंगारी, अंबादास चाटला, रमेश तवटी, अंबादास नागुल, प्रभाकर इप्पलपल्ली, अंबादास मिठ्ठा, नागनाथ बंडा, श्रीनिवास बिंगी, अंबुलाल अन्नलदास, बालाजी कोडम, लक्ष्मण महिंद्रकर, रमेश सिद्राल, सत्यनारायण पोल, किसन गुंडेटी, अंबाजी कुणे, गोपी मिठ्ठा व श्रीनिवास नंदाल यांनी परिश्रम घेतले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## तेरखेड्याच्या शुभम शिंदेची केंद्रीय गुप्तचर विभागात निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० जून -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथील शुभम विलास शिंदे याने स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत केंद्रीय गुप्तचर विभागाच्या असिस्टंट सेंट्रल इंटेलिजन्स ऑफिसर पदावर निवड मिळवली आहे. राज्य राखीव पोलीस दलात कार्यरत असलेले वडील विलास शिंदे यांच्याकडून मिळालेली शिस्त, कर्तव्यनिष्ठा आणि सेवाभावाची प्रेरणा तसेच स्वतःची मेहनत व जिद्द यांच्या बळावर शुभमने हे यश संपादन केले. तेरखेडा हे गाव शिक्षण, नोकरी व व्यवसाय क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी ओळखले जाते. गावातील अनेक युवक विविध शासकीय सेवांमध्ये कार्यरत असून स्पर्धा परीक्षांमध्येही सातत्याने यश मिळवत आहेत.



शुभमच्या निवडीमुळे तेरखेडा गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## क्राईम न्युज...

### शेतातील विहीर व सोलारची तांब्याची वायर चोरी

**धाराशिव, १० जून -**

तालुक्यातील काक्रंबा परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतातील विहिरी व सोलार यंत्रणेवरील सुमारे ३९७ मीटर लांबीची २७ हजार ७९० रुपयांची तांब्याची विद्युत वायर अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी शाम निवृत्ती ढेरे (वय ४८, रा. काक्रंबा, ता. तुळजापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### तेर परिसरात तांब्याची केबल चोरी; गुन्हा दाखल

**धाराशिव, १० जून -**

तेर येथील शेतकरी सतिश देविदास थोडसरे यांच्या शेतातील विहीर तसेच तेरणा मध्यम प्रकल्प परिसरातील एकूण ५२० फूट तांब्याची केबल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या चोरीत २३ हजार ९९८ रुपयांच्या केबलचा अपहार झाला असून ही घटना ८ जून रोजी रात्री ८ ते ९ जून रोजी सकाळी ८ वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी सतिश थोडसरे (रा. तेर, ता. जि. धाराशिव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### उमरग्यात ट्रान्सफॉर्मर साहित्याची १.९१ लाखांची चोरी

**धाराशिव, १० जून -**

शहरातील त्रिकोळी रोड परिसरात ठेवण्यात आलेले ट्रान्सफॉर्मर निर्मितीसाठी वापरण्यात येणारे कॉपर वायर स्क्रॅप व ॲल्युमिनियम वायर बॉबीन अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडली आहे. या चोरीमध्ये एकूण १ लाख ९१ हजार ८०० रुपयांचा माल चोरीला गेला असून ही घटना ८ जून रोजी पहाटे ३ ते सकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी प्रकाश नागाप्पा मुलगे (रा. उमरगा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दांडेगाव येथील दुचाकी अपघातप्रकरणी गुन्हा दाखल

**धाराशिव, १० जून -**

तालुक्यातील दांडेगाव येथील राहुल दिलीप भोगील (वय ३२) यांच्या मृत्यू प्रकरणी आंबी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, राहुल भोगील हे १९ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी दुचाकी (एमएच ०१ एयू १०२७) वरून भूमहून दांडेगावकडे जात असताना बिरुबाची वाडी येथील कॅनलजवळ अपघातग्रस्त झाले. दुचाकी भरधाव व निष्काळजीपणे चालवल्याने हा अपघात घडून ते गंभीर जखमी झाले होते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

## फसवी कर्जमाफीचा निषेध; शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्यासाठी काँग्रेसचा एल्गार

### धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन...

### शासन निर्णयाची प्रतीकात्मक होळी...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० जून -**

राज्य सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी ही शेतकऱ्यांची दिशाभूल करणारी असून सर्व पात्र शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी तसेच धाराशिव जिल्ह्यातून प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गाचा आराखडा रद्द करावा, या प्रमुख मागण्यांसाठी धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात आले. आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

जिल्हाध्यक्ष उमेश राजेनिंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात राज्य सरकारच्या धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

वाढते उत्पादन खर्च, अवकाळी पाऊस, दुष्काळी परिस्थिती आणि शेतीमालाला मिळत नसलेला योग्य भाव यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असताना सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी अपुरी व फसवी असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

तसेच प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गामुळे हजारो एकर सुपीक शेती, फळबागा आणि शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर परिणाम होणार असल्याने हा महामार्ग तात्काळ रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली. शेतकरी व स्थानिक नागरिकांचा सातत्याने विरोध असतानाही शासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याबद्दल काँग्रेसने तीव्र नाराजी व्यक्त केली. यावेळी काँग्रेस कार्यकर्त्यांनी राज्य सरकारच्या कर्जमाफीच्या शासन निर्णयाची (जीआर) प्रतीकात्मक होळी करून निषेध नोंदविला. 'फसवी कर्जमाफी रद्द करा', 'शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्या' आणि 'शक्तिपीठ महामार्ग रद्द करा' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. सरकारच्या शेतकरीविरोधी व जनविरोधी धोरणांविरोधात आंदोलनकर्त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला.



जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात संपूर्ण कर्जमाफी, शेतीमालाला हमीभावासह खरेदीची हमी, शक्तिपीठ महामार्गाचा आराखडा रद्द करणे तसेच शेतकरी, कामगार, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.

या आंदोलनात जिल्हाध्यक्ष उमेश राजेनिंबाळकर यांच्यासह विश्वास शिंदे, नानासाहेब पाटील, महादेव कुतवळ, धीरज पाटील, पांडुरंग कुंभार, डॉ. स्मिता शाहपूरकर, ज्योती सपाटे, नानाभाऊ भोसले, मधुकर बिद्री, राजाभाऊ शेरखाने, प्रशांत पाटील, खलील सय्यद, विनोद वीर, विलास शाळू, महेबूब पटेल, अर्जुन बिराजदार, संकेत पडवळ, समी काझी, मधुकर यादव, विजय देवगुडे, शिवाजी गायकवाड यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## साई कॉलेजचा १०० टक्के निकाल; विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१० जून -**

तालुक्यातील रांजणी येथील साई कॉलेज ऑफ कॉम्प्युटर एज्युकेशनचा मार्च-एप्रिल २०२६ परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

बीसीएस तृतीय वर्षात अर्पिता बिडवे हिने ९०.३ टक्के गुणांसह प्रथम, ऋतुजा पुरेकर हिने ८८.९ टक्के गुणांसह द्वितीय, तर अल्फिया पठाण, अश्विनी लोखंडे व तनुजा यादव यांनी ८८.२ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला. बीसीए तृतीय वर्षात सुजाता भिसे प्रथम, गोविंद ढवणे द्वितीय आणि सानिका बावळे तृतीय आली.

महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी दयानंद जटाळ याची जॉर्जिया देशात सॉफ्टवेअर डेव्हलपर पदावर निवड झाली असून अर्पिता बिडवे व स्वप्नील खोत यांची क्यू स्पायडर संस्थेत प्लेसमेंट झाली आहे. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व प्राध्यापकांनी अभिनंदन केले.

## नवीन रस्त्यामुळे जनावरांच्या पाण्याच्या हौदाची समस्या

### हंगरगा ग्रामस्थांची तातडीने उपाययोजनांची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१० जून -**

तालुक्यातील हंगरगा ग्रामपंचायत हद्दीतील दलित वस्तीत जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी बांधण्यात आलेल्या जुन्या हौदाबाबत गंभीर समस्या निर्माण झाली आहे. दोन महिन्यांपूर्वी करण्यात आलेल्या नवीन रस्त्यामुळे हौदाची उंची रस्त्याच्या बरोबरीने आल्याने जनावरांना पाणी पिण्यास अडचणी येत असून नागरिकांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

हंगरगा ग्रामपंचायतीने सन १९९५ मध्ये जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी हा हौद बांधला होता. मात्र अलीकडेच झालेल्या रस्त्याच्या कामानंतर हौदाची उंची कमी झाल्याने जनावरांना पाणी पिणे कठीण झाले आहे. कडाक्याच्या उन्हाळ्यात जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची मोठी गैरसोय होत असल्याचे जनावरधारकांनी सांगितले.



या संदर्भात ग्रामस्थांनी आणि जनावरधारकांनी गेल्या दोन महिन्यांपासून सरपंच, उपसरपंच आणि ग्रामसेवक यांच्याकडे अनेकदा तोंडी तक्रारी केल्या आहेत. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

दरम्यान, हा हौद भरवस्तीत आणि रस्त्याच्या कडेला असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे. अंधाराच्या वेळी हौद सहज दिसून येत नसल्याने अपघात होण्याची शक्यता आहे. तसेच परिसरातील लहान मुले खेळताना हौदात पडण्याचा धोका निर्माण झाला आहे. साधारण सात ते आठ फूट खोल असलेल्या या हौदामुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

त्यामुळे हौदाच्या काठांची उंची वाढवून ती रस्त्याच्या पातळीपेक्षा वर करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. यामुळे जनावरांना पाणी पिणे सुलभ होईल तसेच संभाव्य दुर्घटनांनाही आळा बसेल, असे नागरिकांचे म्हणणे आहे. ग्रामपंचायतीने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

## श्री स्वामी समर्थ गोशाळेत 'धोंडे जेवण' उत्साहात; गाईंना पुरणपोळी-आमरसाचा नैवेद्य

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१० जून -**



श्री स्वामी समर्थ गोशाळेत आयोजित करण्यात आलेला 'धोंडे जेवण' कार्यक्रम भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या विशेष उपक्रमानिमित्त गोशाळेतील गाईंना पुरणपोळी व आमरसाचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. गोमातेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी गोमातांचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर गाईंना पुरणपोळी व आमरस खाऊ घालण्यात आला. भारतीय संस्कृतीत गाईला मातृस्वरूप मानले जाते. गोसेवा ही पुण्यकारक मानली जात असल्याने अशा धार्मिक व सामाजिक उपक्रमांमुळे समाजात गोसंवर्धनाबाबत जनजागृती होण्यास मदत होत असल्याचे उपस्थितांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमासाठी बाळासाहेब केदार व त्यांच्या संपूर्ण कुटुंबीयांची विशेष उपस्थिती होती. त्यांनी गोशाळेच्या कार्याचे कौतुक करत गोसेवा ही समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याचे मत व्यक्त केले. तसेच दादा जाधव पवार यांनीही कार्यक्रमात सहभागी होत गोशाळेच्या विविध उपक्रमांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमादरम्यान गोशाळेतील गाईंना पौष्टिक खाद्य देण्यात आले. उपस्थित भाविकांनी गोमातांचे दर्शन घेत गोसेवेचा आनंद अनुभवला. धार्मिक श्रद्धा, सामाजिक बांधिलकी आणि प्राणीप्रेम यांचा सुंदर संगम या कार्यक्रमात पाहायला मिळाला.

### अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्याने केळी बागांचे मोठे नुकसान...

## शेतकऱ्यांना एकरी एक लाख मदत द्या : किरण चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१० जून -**

मान्सूनपूर्व अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे वाशी तालुक्यातील केळी पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून केळी उत्पादक शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडला आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने तातडीने एकरी एक लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य केळी उत्पादक शेतकरी संघाचे अध्यक्ष किरणभाऊ चव्हाण यांनी केली आहे.

बुधवारी (दि.१०) किरणभाऊ चव्हाण यांनी तेरखेडा परिसरातील नुकसानग्रस्त केळी बागांची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यामुळे केळीची झाडे जमिनदोस्त झाली असून शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे यावेळी निदर्शनास आले. या पाहणी दौऱ्यात संघटनेचे राज्य उपाध्यक्ष डॉ. हनुमंत चिकने, वाशी तालुका अध्यक्ष बापूसाहेब घोलप, तालुका उपाध्यक्ष प्रदीप घुले, नुकसानग्रस्त शेतकरी आदेश घुले यांच्यासह परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते.

यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना किरणभाऊ चव्हाण म्हणाले की, केळी उत्पादक शेतकरी सध्या दुहेरी संकटाचा सामना करीत आहे. उत्पादन खर्चात सातत्याने वाढ होत असताना केळीला अपेक्षित बाजारभाव मिळत नाहीत. तसेच आंतरराष्ट्रीय घडामोडींचा बाजारपेठेवर परिणाम होत असल्याने केळीच्या दरात मोठी घसरण झाल्याचे शेतकरी सांगत आहेत. त्यातच अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे उभी केळी बाग उद्ध्वस्त झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.



नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे करून त्याचा अहवाल राज्याचे कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांच्याकडे सादर करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शासनाने तातडीने आर्थिक मदत जाहीर करून केळी उत्पादकांना दिलासा द्यावा व विशेष मदत पॅकेज जाहीर करावे, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

## नळदुर्ग, केरूर व इटकळमधील शिंदी अड्ड्यांवर कारवाई कधी?



### उत्पादन शुल्क विभागाकडे नागरिकांचा सवाल

**विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.१० जून -**

राज्यात विषारी दारू प्राशनामुळे अनेक नागरिकांचा मृत्यू झाल्याच्या घटना ताज्या असतानाच नळदुर्ग, केरूर आणि इटकळ परिसरातील कथित अवैध शिंदी विक्री अड्ड्यांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. काही अघटित घटना घडण्यापूर्वी उत्पादन शुल्क विभागाने या ठिकाणांवरील शिंदी विक्री बंद करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

राज्यातील विविध भागांत विषारी दारूमुळे झालेल्या दुर्घटनांनंतर शासन आणि प्रशासन सतर्क झाले असले तरी नळदुर्ग परिसरात कथितपणे रासायनिक मिश्रणापासून तयार करण्यात आलेल्या शिंदीची विक्री सुरू असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. उत्पादन शुल्क विभागाकडून अधूनमधून कारवाई होत असली तरी काही ठिकाणी पुन्हा अवैध विक्री सुरू होत असल्याची चर्चा आहे. नळदुर्ग येथील अक्कलकोट रस्त्यावरील शासकीय गोदाम परिसर तसेच गणेश मंदिर परिसरात खुलेआम शिंदी विक्री होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. याशिवाय केरूर व इटकळ येथेही अशाच प्रकारची विक्री सुरू असल्याचे सांगितले जात आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात ग्राहकांची गर्दी होत असल्याचेही स्थानिकांचे म्हणणे आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, सध्या विक्री होत असलेली शिंदी ही नैसर्गिकरित्या शिंदीच्या झाडापासून तयार केलेली नसून काही विशिष्ट गोळ्या किंवा रासायनिक पदार्थांच्या मिश्रणातून तयार केली जात आहे. अशा प्रकारचे पेय आरोग्यासाठी घातक ठरू शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

त्यामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या अवैध शिंदी विक्रेत्यांविरुद्ध उत्पादन शुल्क विभागाने तातडीने तपास करून आवश्यक ती कारवाई करावी तसेच नळदुर्ग, केरूर आणि इटकळ येथील कथित शिंदी विक्री अड्डे कायमस्वरूपी बंद करावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. नागरिकांच्या या मागणीवर उत्पादन शुल्क विभाग कोणती भूमिका घेतो, याकडे परिसरातील जनतेचे लक्ष लागले आहे.

### नागरिकांची मागणी...

- ✻ अवैध शिंदी विक्री अड्ड्यांवर तात्काळ छापे टाकावेत...
- ✻ विक्री होत असलेल्या शिंदीचे नमुने तपासणीसाठी पाठवावेत...
- ✻ दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी...
- ✻ परिसरात जनजागृती मोहीम राबवून विषारी मद्याच्या धोक्यांविषयी माहिती द्यावी...

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

## महादेवी मठपती यांना पुरस्कार




तभा वृत्तसेवा

लातूर दि. १० जून : येथील श्री गोदावरीदेवी लाहोटी कन्या पाठशाळेतील शिक्षिका महादेवी मठपती यांना ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्यावतीने देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्काराने पनवेल येथे सन्मानित करण्यात आले. मठपती यांना आ. प्रवीण स्वामी, माजी आमदार बळीराम पाटील, दत्तात्रय सावंत, अनिल नाचपले, रेखा सुळे, संतोष भोजने यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. मठपती यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले शैक्षणिक कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय बहुजन शिक्षक महासंघाचे राज्याध्यक्ष अनिल नाचपल्ली, रेखा सुडे उपस्थित होते.

### विलासराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाच्या २.४५ हेक्टर जागेचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी -- वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी बैठक घ्या

# आ. अभिमन्यू पवार यांची मागणी

तभा वृत्तसेवा

औसा दि. १० जून : विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाच्या नावावर हस्तांतरित करण्यात आलेल्या २.४५ हेक्टर जागेचा वापर अद्यापही विविध प्रशासकीय व कायदेशीर कारणांमुळे प्रलंबित आहे.हा विषय लातूर जिल्ह्याच्या दुष्टीने जागेचा विषय महत्वाचा असून या महत्त्वपूर्ण प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी लातूर जिल्ह्यातील खासदार-आमदार, रेल्वे विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच राज्य शासनाच्या संबंधित विभागांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात यावी, अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे केली आहे.

लातूर येथील जुने रेल्वे स्थानक ते हरंगुळ स्थानक दरम्यानची सुमारे ३२ हेक्टर ८१ आर जागा महाराष्ट्र शासनाकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली २९ मार्च २००७ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला होता. या बदल्यात रेल्वे विभागाला पुण्यातील लोहगाव व हडपसर येथील जागा तसेच ४५ निवासी घरे उपलब्ध करून देण्याचे निश्रि्चत करण्यात आले होते.त्यानुसार शासनाने आवश्यक कार्यवाही करून रेल्वे विभागासाठी ४५ निवासस्थाने उभारून त्यांचा ताबाही रेल्वे प्रशासनाला दिला. तसेच लातूर येथील २.४५ हेक्टर जागा विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयासाठी हस्तांतरित करण्यात आली. संबंधित जागेचा ताबा जिल्हा प्रशासनामार्फत वैद्यकीय महाविद्यालय प्रशासनाकडे



देण्यात आला असून अभिलेखांमध्येही आवश्यक नोंदी करण्यात आल्या असल्याचे या निवेदनात म्हटले आहे.

मात्र या पुर्ण ३२ हेक्टर ८१ आर जागेच्या मोबदल्याबाबत काही बाबी प्रलंबित असल्याचा दावा रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आला आहे. यासंदर्भात रेल्वे विभागाने न्यायालयात दिवाणी दावा दाखल केल्यामुळे वैद्यकीय महाविद्यालयाच्या नावावर जागा हस्तांतरित होऊनही तिचा प्रत्यक्ष वापर करता येत नाही. परिणामी रुग्णालयाचा विस्तार, सुपरस्पेशालिटी इमारतींची उभारणी, वैद्यकीय शिक्षण सुविधांचा विकास आणि रुग्णसेवा वाढविण्याच्या योजना रखडल्या आहेत.आ. अभिमन्यू पवार यांनी निवेदनात नमूद केले आहे की, जागा नवीन सुपरस्पेशालिटी रुग्णालय इमारत आणि विद्यमान वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने तिचा उपयोग वैद्यकीय सुविधांच्या विस्तारासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. जागेचा प्रश्न्न निकाली निघाल्यास रुग्णालयाच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी वाढ होऊन लातूरसह संपूर्ण मराठवाड्यातील नागरिकांना अधिक दर्जेदार व आधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध होऊ शकतील.

या पार्श्र्वभूमीवर वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली रेल्वे विभागाचे वरिष्ठ अधिकारी, विधी व न्याय विभाग, महसूल विभाग, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव, जिल्हाधिकारी लातूर, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाचे अधिष्ठाता तसेच लातूर जिल्ह्यातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी यांची संयुक्त आढावा बैठक तातडीने आयोजित करण्यात यावी, अशी मागणी आ. पवार यांनी केली आहे.लातूर शहरासह जिल्ह्यातील रुग्णांच्या आरोग्याच्या दृष्टीने जागेचा प्रश्र्न अत्यंत महत्त्वाचा असून शासनाने सकारात्मक भूमिका घेऊन लवकरात लवकर मार्ग काढावा, अशी अपेक्षाही आ. पवार यांनी व्यक्त केली आहे.

## रेल्वेखाली सापडून वृद्ध महिला ठार

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १० जून : शहरातील फुलेनगर येथील एक ७० वर्षीय वयोवृद्ध महिला रेल्वेखाली सापडून ठार झाली आहे.

उदगीर शहरातील टाइम्स पब्लिक स्कूलच्या पाठीमागे असलेल्या रेल्वे रुळावर मयत केवळबाई कोंडीबा कोंगे (वय ७० वर्षे, रा. फुलेनगर उदगीर) यांचा रेल्वे खाली सापडून मृत्यू झाल्याने रविवारी (दि. ७) सायंकाळी मृतदेह आढळून आला आहे.

या प्रकरणी संतोष सुरेश तोकटे (रा. फुलेनगर उदगीर) यांनी पोलिसात दिलेल्या माहितीवरुन उदगीर ग्रामीण पोलिसात अकस्मात मृत्यू क्रमांक ३६ / २६ कलम १९४ बीएनएसएस प्रमाणे नोंद घेण्यात आली आहे.

## विवेकानंद जुनिअर कॉलेजचे घवघवीत यश



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १० जून : महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षाएमएचटी सीईटी (पीसीबी) २०२५-२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून यामध्ये जे.एस.पी.एम. लातूर संचलित श्री स्वामी विवेकानंद ज्युनीअर कॉलेज, एमआयडीसी, लातूरच्या दोन विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून कॉलेजच्या लौकीकामध्ये भर पाडण्याचे कार्य केलेले आहे.

यामध्ये पांढरे ज्ञानेश्र्वरी सुरज हिने ९९.३० पर्सेंटाइल मिळवून उज्ज्वल यश संपादन केले. तसेच यश आनंदकुमार गटागट याने ९७.६० पर्सेंटाइल मिळवून उत्कृष्ट यश संपादन केलेले आह. यांच्यासह इतर अनेक विद्यार्थ्यांनीही घवघवीत यश मिळवत संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची जिद्द, कठोर परिश्रम, पालकांचे प्रोत्साहन तसेच शिक्षकांचे मार्गदर्शन कारणीभूत ठरले आहे.

## लातूर जिल्ह्यास मंजूर खताची रॅक परजिल्ह्याकडे वळवली

# आ. निलंगेकरांच्या तक्रारीनंतर जिल्हाधिकार्यांनी दिले चौकशीचे आदेश

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १० जून : खरीपाचा हंगाम तोंडावर आला असून जिल्ह्यातील शेतकरी खरीप पेरणीसाठी बियाणे व खताची जुळवाजुळव करण्यासाठी लगबग करीत आहेत. खरीपाचा हंगाम शेतकर्यांसाठी अत्यंत महत्वाचा असून या हंगामात शेतकर्यांना बियाणे व खताची टंचाई भासू नये यासाठी शासनाने स्पष्ट निर्देश दिले आहेत. मात्र यादरम्यानच लातूर जिल्ह्यास मंजूर झालेली खताची रॅक परजिल्ह्याकडे वळविल्याची माहिती माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांना मिळाली. या संदर्भात कांहीजणांनी त्यांच्याकडे तक्रारसुद्धा केलेली होती. याचा परिणाम खरीपाच्या पेरणीवर होण्याची शक्यता असल्याने आणि शेतकर्यांना वेळेवर खत उपलब्ध व्हावे या उद्देशाने माजी मंत्री आ. निलंगेकरांनी तात्काळ यासंदर्भात जिल्हाधिकारी यांच्याकडे पत्र देऊन तक्रार दिली होती. या तक्रारीनुसार जिल्हाधिकार्यांनी तात्काळ चौकशीचे आदेश दिलेले आहेत.

शेतकर्यांच्या दृष्टीने खरीपाचा हंगाम अंत्यत महत्वाचा असून या हंगामावरच शेतकर्यांचे अर्थचक्र अवलंबून असते. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात खरीपाची पेरणी होत असते. या पेरणीसाठी आता लगबग सुरु झालेली असून शेतकर्यांकडून बियाणे व खताची जुळवाजुळव करण्यास सुरुवात झाली आहे. या हंगामात शेतकर्यांना बियाणे व खताची टंचाई भासू नये असे स्पष्ट निर्देश राज्य शासनाने जिल्हाप्रशासनाला दिले आहेत. मात्र लातूर जिल्ह्यास मंजूर झालेली खताची रॅक परजिल्ह्याकडे वळवली गेली असल्याची माहिती माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांना प्राप्त झाली. या माहितीची खातरजमा करून घेतल्यानंतर माजी मंत्री आ. निलंगेकर यांनी तात्काळ या बाबत चौकशी करण्यात यावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे केलेली होती. याप्रकरणी माजी मंत्री आ. निलंगेकर यांनी केलेल्या तक्रारीनुसार जिल्ह्याधिकार्यांनी तात्काळ याप्रकरणीची चौकशीचे आदेश दिलेले असून आगामी काळात या प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी ठोस उपाय योजना करण्यासाठी संबंधीत विभागास निर्देश दिले आहेत. त्याचबरोबर आगामी काळातही जिल्ह्यातील शेतकर्यांना वेळेवर व मुबलक खत होऊन खताच्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी योग्य कार्यवाही करण्याची मागणी माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केली आहे. त्या अनुषंगाने जिल्हाधिकार्यांनी संबंधीत विभागास तात्काळ निर्देश देऊन यासंदर्भात कोणतीही दिरंगाई करू नये अशी सुचना दिली आहे.

## हरणाच्या धडकेत उंबडग्याच्या शेतकऱ्याचा मृत्यू

तभा वृत्तसेवा



लातूर दि. १० जून : औसा तालुक्यातील उंबडगा खुर्द येथील स्वस्त धान्य दुकानदार बबन नामदेव डोंबाळे (वय ५२) यांचा हरणाच्या धडकेमुळे झालेल्या भीषण अपघातात मृत्यू झाला. या घटनेमुळे गावासह परिसरात शोककळा पसरली आहे.

सोमवारी रात्री डोंबाळे हे आपल्या मावसभावाच्या मुलासोबत खरेदीसाठी औसा येथे गेले होते. खरेदी करून दुचाकीवरून गावाकडे परतत असताना माशाळे यांच्या शेताजवळ अचानक एका हरणाने दुचाकीवर उडी मारली. त्यामुळे दुचाकीचा तोल जाऊन ते सिमेंट रस्त्यावर जोरात आपटले. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. नाक व तोंडातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होऊन ते बेशुद्ध पडले. रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनचालकांनी गावातील नागरिकांना घटनेची माहिती दिल्यानंतर नातेवाईकांनी त्यांना तातडीने औसा येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. प्रथमोपचारानंतर पुढील उपचारासाठी लातूरला हलविण्यात येत असताना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला.

मंगळवारी सकाळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शवविच्छेदन करून पार्थिव नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. त्यानंतर दुपारी १२ वाजता उंबडगा खुर्द येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्र्चात आई, पत्नी, दोन मुले, सून, बहीण व भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने उंबडगा खुर्द गावावर शोककळा पसरली आहे.

## वाहतूक कॉन्स्टेबलचे निलंबन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १० जून : येथील मिनी मार्केट येथे वाहतूक नियंत्रण शाखेतील अंमलदार पोकॉ शरद कांदे हे वाहतूक नियमानासाठी थांबले असता त्या ठिकाणी दुचाकीस्वारास चुकीच्या पद्धतीने थांबवण्याचा प्रयत्न केला होता. दुचाकीस्वार पडल्याची क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाली होती. याप्रकरणी कांदे यांचे निलंबन करण्यात आले आहे.

## वीजेच्या तडाख्यात बैल दगावला; शेती वाचविण्यासाठी पत्नीच जुंपली औताला...!

तभा वृत्तसेवा

वलांडी दि. १० जून : देवणी तालुक्यातील बोंबळी येथील शेतकरी काशिनाथ गायकवाड यांच्यावर निसर्गाने मोठे संकट ओढवले आहे. ५ जून रोजी झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसादरम्यान वीज कोसळून त्यांच्या एका बैलाचा मृत्यू झाला. आधीच आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या या शेतकऱ्यापुढे शेतीची कामे कशी करावीत, असा प्रश्र्न निर्माण झाला. अखेर शेतीची मशागत थांबू नये म्हणून त्यांनी पत्नीला औताला जुंपून शेतातील कामे सुरू ठेवली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

बोंबळी हे गाव वलांडी परिसरालगत असून येथील बहुतांश नागरिक शेतीवर अवलंबून आहेत. ५ जून रोजी झालेल्या वादळात काशिनाथ गायकवाड यांच्या शेतातील बैलावर वीज कोसळली. यात बैलाचा जागीच मृत्यू झाला. बैल हा शेतकऱ्याचा खरा साथीदार मानला जातो. मात्र, अचानक झालेल्या या नुकसानीमुळे गायकवाड कुटुंबासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले.



पावसाळ्याच्या तोंडावर शेतीची मशागत आणि पेरणीपूर्व कामे सुरू असताना बैल नसल्याने शेतीची कामे ठप्प होण्याची भीती निर्माण झाली. नवीन बैल खरेदी करण्याची आर्थिक क्षमता नसल्याने काशिनाथ गायकवाड यांनी पत्नीच्या मदतीने औत चालवून शेतीची कामे सुरू ठेवली. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी आणि शेती वाचविण्यासाठी त्यांनी घेतलेला हा निर्णय सध्या चर्चेचा विषय ठरला आहे.

या घटनेमुळे नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या पशुधन नुकसानीची तीव्रता पुन्हा एकदा समोर आली आहे. शेतकऱ्यांच्या पशुधनाचे संरक्षण आणि नुकसानभरपाईची तातडीने अंमलबजावणी करण्याची गरज या निमित्ताने अधोरेखित झाली आहे. काशिनाथ गायकवाड यांना शासनाने त्वरित आर्थिक मदत द्यावी, तसेच मृत बैलाच्या नुकसानीचा पंचनामा करून नुकसानभरपाई मंजूर करावी, अशी मागणी परिसरातील ग्रामस्थ व शेतकरी वर्गातून होत आहे.

> एक बैल गेला, शेती संकटात ग्रामीण भागात आजही अनेक लहान व अल्पभूधारक शेतकरी बैलजोडीच्या साहाय्याने शेती करतात. अशा परिस्थितीत एका बैलाचा मृत्यू म्हणजे केवळ पशुधनाचे नुकसान नसून संपूर्ण शेती व्यवस्थेवर परिणाम होतो. बोंबळी येथील घटना ही शेतकऱ्यांच्या विदारक वास्तवाचे जिवंत उदाहरण ठरत आहे.

# २ दशकापासून फरार असलेला आरोपी अखेर पोलिसांच्या जाळ्यात

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १० जून : गुन्हेगार कितीही चलाखीने कायद्यापासून दूर पळण्याचा प्रयत्न करत असला तरी कायद्याचा हात शेवटी त्याच्यापर्यंत पोहोचतो, याची प्रचिती पुन्हा एकदा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दिली आहे. तब्बल २० वर्षांपासून प्रशासनाला गुंगारा देत, आपली ओळख, वास्तव्य आणि हालचाली सतत बदलत राहणाऱ्या आर्म क्टमधील फरार गुन्हेगारास लातूर पोलिसांनी परजिल्ह्यातून शोधून काढत अटक केली आहे. या कारवाईमुळे दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या गंभीर गुन्ह्याचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे.

पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, पोलीस स्टेशन शिवाजीनगर, लातूर येथे सन २००६ मध्ये भारतीय हत्यार कायद्यांतर्गत दाखल असलेल्या गुरनं. ३०४१/२००६ कलम २५(१) (३) मधील सिद्धेश्र्वर ऊर्फ सिद्राम ऊर्फ पिंटू वसंत मुळे (वय ४१ वर्षे, रा. डाळींब, ता. उमरगा, जि. धाराशिव) हा मागील दोन दशकांपासून फरार होता. न्यायालयीन प्रक्रिया सुरू असतानाही आरोपी सातत्याने ठिकाणे बदलत राहिल्याने त्याला अटक करणे पोलिसांसाठी मोठे आव्हान ठरत होते.

लातूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील फरार आरोपी, पाहिजे गुन्हेगार आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने या आरोपीचा शोध घेण्याचे काम हाती घेतले

होते. तपासादरम्यान पथकातील दत्तात्रय शिंदे यांना सिद्धेश्र्वर मुळे हा उमरगा परिसरात वास्तव्य करत असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली. मिळालेल्या माहितीची गुप्तपणे पडताळणी करण्यात आली. माहिती विश्र्वसनीय असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवून विशेष पथकाने उमरगा येथे रवाना होत नियोजनबद्ध सापळा रचला. त्यानुसार त्याला हनुमान मंदिर, डाळींब, ता. उमरगा परिसरातून ताब्यात घेण्यात आले. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आरोपीस पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे हजर करण्यात आले.

या गुन्ह्याची सुरुवात दि. १० जुलै २००६ रोजी झाली होती. त्यावेळी पोलिसांना गुप्त



बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, दोन इसम बेकायदेशीर

शस्त्रास्त्रांसह संशयास्पदरीत्या फिरत आहेत. त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी मिरा हॉटेल परिसरात सापळा रचून दोन संशयितांना ताब्यात घेतले होते.

त्यांची चौकशी केली असता त्यांनीट्र आपली नावे देविदास रघुनाथ पांचाळ ऊर्फ सुतार (रा. तोरंबा, ता. उमरगा) आणि सिद्धेश्र्वर ऊर्फ पिंटू वसंत मुळे (रा. डाळींब, ता. उमरगा) अशी सांगितली. पोलिसांनी त्यांची अंगझडती घेतली असता सिद्धेश्र्वर मुळे याच्या कमरेला अडकवून ठेवलेले एक गावठी पिस्तूल (कट्टा) आढळून आले. तसेच त्याच्या पँटच्या खिशातून कागदात गुंडाळलेले जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. दुसरा आरोपी देविदास पांचाळ याच्याकडील नायलॉन पिशवीची तपासणी केली असता त्यामध्ये गावठी कट्टा तयार करण्यासाठी लागणारे विविध साहित्य आढळून आले होते.

या घटनेनंतर भारतीय हत्यार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र गुन्हा दाखल झाल्यानंतर सिद्धेश्र्वर मुळे याने विविध ठिकाणी वास्तव्य बदलले, आपली ओळख लपवली आणि सतत हालचाली बदलत राहिल्यामुळे तो पोलिसांच्या हाती लागत नव्हता.

फरार आरोपीचा शोध घेत असताना पथकाने विविध जिल्ह्यांमध्ये जाऊन त्याच्या नातेवाईकांची, परिचितांची तसेच संभाव्य वास्तव्याच्या ठिकाणांची माहिती गोळा केली. तपासादरम्यान दुसरा आरोपी देविदास रघुनाथ पांचाळ ऊर्फ सुतार याचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली. त्याबाबत त्याच्या पत्नींकडून अधिकृत मृत्यू प्रमाणपत्र प्राप्त करून तपासाची नोंद पूर्ण करण्यात आली. सिद्धेश्र्वर मुळे याने जवळपास दोन दशके पोलिसांना चकवा दिला असला तरी पथकाने अत्यंत संयम, कौशल्य आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा करून त्याचा शोध लावला. अखेर उमरगा परिसरातून त्यास अटक करण्यात यश आले.

अटक करण्यात आलेल्या आरोपीस न्यायालयासमोर हजर करण्यात आले असता मा. मुख्य न्यायदंडाधिकारी सतीश एन. पाटील यांनी त्यास न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. या प्रकरणातील पुढील तपास आणि न्यायालयीन प्रक्रिया सुरू आहे.

लातूर जिल्हा पोलीस दलाचे विशेष पथक जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या गुन्ह्यांतील फरार, पाहिजे व डारमंड फाईलमधील आरोपींचा शोध घेण्यासाठी सातत्याने काम करत असून अनेक आरोपींना अटक करून संबंधित पोलीस ठाण्यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर कारवाईमुळे कायद्यापासून पळ काढणाऱ्या गुन्हेगारांना स्पष्ट संदेश देण्यात आले आहे.

ही उल्लेखनीय कारवाई मा. पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार दत्तात्रय शिंदे, रसूल पठाण, चंद्रकांत केंद्रे यांनी केली आहे.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत


## बहिणीने दाखल केलेली केस मागे घेण्याच्या कारणावरून तरुणीला मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० जून -**

बहिणीने दाखल केलेली केस मागे घेण्यास सांगत एका तरुणीला शिवीगाळ, मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी सात जणांविरुद्ध वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ६ जून २०२६ रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास ईट (ता. भूम) येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेसमोर ही घटना घडली.

चिवुताई अतुल काळे (वय २२, रा. निपाणी, ता. भूम) यांना आरोपींनी तुझ्या बहिणीने आमच्यावर केलेली केस मागे घे या कारणावरून शिवीगाळ केली. तसेच लाथाबुक्क्यांनी व दगडाने मारहाण करून जखमी केले आणि जीवे ठार मारण्याची धमकी दिली.

याप्रकरणी रयास रघू भोसले, सुरज रयास भोसले, रोहिणी रयास भोसले (रा. झेडेवाडी, ता. भूम), विशाल आल्या भोसले (रा. नागेवाडी, ता. भूम), लाल्या गावा काळे, लक्ष्मी अमित काळे (रा. चिंचपूर बु., ता. परंडा) आणि बाबा पक्या भोसले (रा. भूम) यांच्याविरुद्ध वाशी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# मंगरुळ ग्रामपंचायत निवडणुकीचे पडघम; आरक्षण जाहीर होताच राजकीय हालचालींना वेग



## तुळजापूर तालुक्याच्या राजकारणातील केंद्रबिंदू असलेल्या गावाकडे सर्वांचे लक्ष...

**चांदसाहेब शेख**
**मंगरूळ, दि.१० जून -**

तुळजापूर तालुक्याच्या राजकारणाचा केंद्रबिंदू मानल्या जाणाऱ्या मंगरुळ ग्रामपंचायतीची मुदत संपुष्टात आली असून आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभागनिहाय आरक्षणाची सोडत बुधवारी (दि. १० जून) ग्रामपंचायत कार्यालयात पार पडली. आरक्षण जाहीर होताच गावातील राजकीय वातावरण तापू लागले असून इच्छुक उमेदवारांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे.

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून निवडणुकीची अधिकृत घोषणा अद्याप झालेली नसली तरी गावात निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. विविध राजकीय पक्षांनी आपापल्या पातळीवर तयारी सुरू केली असून इच्छुक उमेदवारांकडून मतदारांशी संपर्क वाढविण्यात येत आहे.

ग्रामपंचायत कार्यालयात तलाठी भैरवनाथ रोडगे आणि ग्रामसेवक लक्ष्मीकांत सुरवसे यांच्या उपस्थितीत रोटेशन पद्धतीने व चिठ्ठीद्वारे आरक्षण जाहीर करण्यात आले.

त्यानुसार प्रभाग क्रमांक १ मध्ये एक सर्वसाधारण महिला, एक सर्वसाधारण पुरुष व एक अनुसूचित जाती महिला, प्रभाग क्रमांक २ मध्ये दोन सर्वसाधारण महिला व एक सर्वसाधारण पुरुष, प्रभाग क्रमांक ३ मध्ये एक सर्वसाधारण महिला, एक सर्वसाधारण पुरुष व एक इतर मागासवर्गीय पुरुष, तर प्रभाग क्रमांक ४ मध्ये एक ओबीसी महिला व एक अनुसूचित जाती पुरुष अशी आरक्षणाची रचना निश्चित करण्यात आली आहे. या चार प्रभागांतून एकूण ११ सदस्यांची निवड होणार आहे.



यापूर्वीच सरपंचपद सर्वसाधारण पुरुष प्रवर्गासाठी आरक्षित झाले असून यंदा प्रथमच सरपंचाची थेट जनतेतून निवड होणार असल्याने या निवडणुकीबाबत विशेष उत्सुकता निर्माण झाली आहे. तुळजापूर तालुक्याच्या राजकारणात मंगरुळ गावाचे वेगळे स्थान आहे.

पंचायत समिती, जिल्हा परिषद, तुळजाभवानी साखर कारखाना, कुलस्वामिनी सूतगिरणी, मजूर फेडरेशन, तालुका खरेदी-विक्री संघ, बाजार समिती, दूध संघ तसेच विविध राजकीय पक्षांमधील जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष यांसारख्या महत्त्वाच्या पदांवर मंगरुळ येथील प्रतिनिधींनी काम केले आहे. त्यामुळे कोणतीही निवडणूक असो, मंगरुळकडे तालुक्यातील राजकीय वर्तुळाचे विशेष लक्ष लागलेले असते.

ग्रामपंचायत निवडणूक येत्या दोन ते तीन महिन्यांत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे ऐन पावसाळ्यात राजकीय घडामोडींना वेग येणार असून सर्वच पक्षांकडून जोरदार तयारी सुरू झाली आहे.

मंगरुळ ग्रामपंचायत निवडणुकीत यंदा कोण बाजी मारणार, याकडे तुळजापूर तालुक्यातील राजकीय धुरंधरांचे लक्ष लागले आहे.

## कत्तलीसाठी म्हशींची बेकायदेशीर वाहतूक; ११ म्हशींसह ५.८० लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० जून -**



भोसगी शिवारातील आष्टामोड परिसरात एनएच-६५ सर्व्हिस रोडवर म्हशींची कत्तलीसाठी बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या वाहनावर मुरुम पोलिसांनी कारवाई करत ११ म्हशींसह ५ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी मंहमद फिरोज बाडेवाले (वय ३५, रा. नळदुर्ग, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.८ जून रोजी रात्री ८.४७ वाजण्याच्या सुमारास भोसगी शिवारातील आष्टामोड येथे एनएच-६५ च्या सर्व्हिस रोडवरील बिराज बेकरीसमोर टेम्पो क्रमांक एमएच-२५ एजे-५२७५ मध्ये ११ म्हशींची वाहतूक केली जात असल्याची माहिती मुरुम पोलीस ठाण्याच्या पथकाला मिळाली. त्यानुसार कारवाई करण्यात आली.

तपासणीदरम्यान संबंधित जनावरांची चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता त्यांना निर्दयतेने कोंबून कत्तलीसाठी बेकायदेशीररीत्या वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी ८० हजार रुपये किंमतीच्या ११ म्हशी आणि ५ लाख रुपये किंमतीचा टेम्पो असा एकूण ५ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास मुरुम पोलीस करीत आहेत.

## रुईभर केंद्रातील २० शाळांना मोफत पुस्तक संचांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० जून -**

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि शालेय वाचनालये समृद्ध व्हावीत या उद्देशाने समकालीन प्रकाशन संस्था, पुणे, 'जागर वाचनाचा' उपक्रम आणि देणगीदारांच्या सहकार्याने रुईभर केंद्रातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांना विद्यार्थी वाचनालयासाठी प्रत्येकी सहा हजार रुपये किमतीचे पुस्तक संच मोफत वितरित करण्यात आले.

अल्पसंख्यांक शिक्षक कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात शिक्षणाधिकारी डॉ. रवींद्र खंदारे, गटशिक्षणाधिकारी प्रकाश पारवे, लालासाहेब मगर आणि जिल्हा समन्वयक बशीर तांबोळी यांच्या हस्ते रुईभर केंद्रातील सर्व शाळांना पुस्तक संचांचे वितरण करण्यात आले. रुईभर केंद्रातील जिल्हा परिषद व खाजगी माध्यमांच्या एकूण २० शाळांना प्रत्येकी सहा हजार रुपये किमतीचे पुस्तक संच देण्यात आले.

या पुस्तकांची एकूण किंमत सुमारे १ लाख २० हजार रुपये आहे. रुईभर केंद्रातील २० शाळांना एकूण १.२० लाख रुपयांची पुस्तके मोफत उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांना विविध विषयांवरील दर्जेदार साहित्य वाचनासाठी मिळणार आहे.

या उपक्रमामुळे शालेय वाचनालये अधिक समृद्ध होऊन विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजण्यास निश्चितच मदत होणार आहे.

यावेळी बाळासाहेब वाघमारे, सुरेश भालेराव, प्रमोद शिंदे, बालाजी भोसले, बापू कोळगे, मारुती काळे, इलाही बागवान, शिवाजी साखरे, मालोजी वाघमारे, मिलिंद जानराव, महावीर गडदे यांच्यासह रुईभर केंद्रातील जिल्हा परिषद व खाजगी माध्यमांच्या सर्व शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते.

## तुळजाभवानी मंदिर परिसरात थुंकणाऱ्यांवर कारवाई; १० जणांकडून ५ हजारांचा दंड वसूल



**स्वच्छता राखा, दंड टाळा!**
मंदिर परिसरातील पावित्र्य आणि स्वच्छता अबाधित राखण्यासाठी प्रशासनाची मोहीम यापुढेही अधिक कठोरपणे राबविण्यात येणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत.

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१० जून -**

श्री तुळजाभवानी मंदिर परिसर स्वच्छ, सुंदर आणि पवित्र राखण्याच्या उद्देशाने मंदिर प्रशासनाने सुरू केलेल्या विशेष स्वच्छता मोहिमेअंतर्गत मंदिर परिसरात थुंकताना आढळलेल्या १० जणांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात आली. संबंधितांकडून प्रत्येकी ५०० रुपये याप्रमाणे एकूण ५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या विशेष पथकांनी मंदिर परिसरात गस्त घालत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर ही कारवाई केली. मंदिर परिसरात थुंकणे, घाण करणे याविरोधात प्रशासनाने कठोर भूमिका घेतली असून स्वच्छता नियमांची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. या मोहिमेसाठी मंदिर संस्थानच्या सहायक स्वच्छता निरीक्षकांच्या नेतृत्वाखाली दोन विशेष पथके कार्यरत आहेत. ही पथके दररोज मंदिर परिसरात पाहणी करून स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करत आहेत.

दरम्यान, श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी मंदिर परिसरात स्वच्छता राखावी, कचरा केवळ कचरापेटीतच टाकावा तसेच परिसरात कोठेही थुंकू नये, असे आवाहन मंदिर संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

## नळदुर्गमध्ये ३.५८ लाखांचा गुटखा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० जून -**

शहरातील काझी गल्ली परिसरात अन्न व औषध प्रशासन आणि पोलिसांनी संयुक्त कारवाई करत महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त केला.



या कारवाईत बाबा तंबाखू, रत्ना ब्रँड तंबाखू आदींसह एकूण ३ लाख ५८ हजार ६१० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. याप्रकरणी इस्माईल जबिउल्ला खुदरतुल्ला काझी (रा. काझी गल्ली, नळदुर्ग) याच्याविरुद्ध नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## रेशन धान्य वितरणासाठी जूनअखेरपर्यंत मुदतवाढ द्या : दुकानदार संघटनांची मागणी

### जिल्ह्यातील २५० रास्तभाव दुकानांमध्ये अद्याप धान्य पोहोचले नाही...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० जून -**

चालू महिन्याच्या रेशन धान्य वाटपासाठी जूनअखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी जिल्ह्यातील रास्तभाव धान्य दुकानदार संघटनांच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

एप्रिल, मे आणि जून २०२६ या महिन्यांच्या धान्य वितरणासाठी यापूर्वी ३१ मेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र, जून महिन्यात अनेक तालुक्यांतील रास्तभाव दुकानदारांकडे धान्य वेळेत पोहोचले नसल्याने वितरण प्रक्रियेत अडचणी निर्माण झाल्या आहेत. तांदळाची आवक गोंदियामधून होत असल्याने पुरवठ्यात विलंब झाल्याचे संघटनांनी नमूद केले आहे. अनेक दुकानांमध्ये अद्याप धान्य उपलब्ध झालेले नसल्याने लाभार्थ्यांना धान्य वितरण करता आलेले नाही.

अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने ४ जून रोजी मे व जून महिन्यांच्या धान्य वितरणासाठी १५ जूनपर्यंत मुदतवाढ दिली आहे. मात्र, जिल्ह्यातील परिस्थिती लक्षात घेता ही मुदत अपुरी असून आणखी मुदतवाढ देण्याची आवश्यकता असल्याचे संघटनांनी निवेदनात म्हटले आहे. जिल्ह्यात एकूण १ हजार ८० रास्तभाव धान्य दुकाने असून, ९ जूनपर्यंत केवळ ८३० दुकानांमध्येच प्रत्यक्ष धान्य उपलब्ध झाले आहे. तर सुमारे २५० दुकानांमध्ये धान्य पोहोचले नसल्याचा दावा जिल्हा रास्तभाव दुकानदार संघटनांनी केला आहे. त्यामुळे सर्व रास्तभाव दुकानदारांना जून २०२६ च्या धान्य वितरणासाठी ३० जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच ढोकी ग्रामीण, उमरगा ग्रामीण, कळंब ग्रामीण आणि येरमाळा ग्रामीण येथील शासकीय गोदामांमध्ये तांदळाचा साठा उपलब्ध नसल्याकडेही निवेदनातून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे.

यावेळी काकासाहेब कासार, प्रसाद उज्वलसिंह राजेनिंबाळकर, राजकुमार पवार, प्रफुल्लकुमार शेटे, आदर्श साळुंके आदि उपस्थित होते.

## इटकळच्या विकासासाठी शंकर वाघमोडे यांची धडपड; हॉटेल व्यवसायातील २५ टक्के नफा गावासाठी खर्च करण्याचा संकल्प

### पाणीपुरवठा, १०० तरुणांना केले व्यसनमुक्त, शेतकऱ्यांना मदत आणि महिलांसाठी दर्शन यात्रा...

**दिनेश सलगरे**
**इटकळ, दि.१० जून -**

तुळजापूर तालुक्यातील इटकळ येथे सामाजिक कार्याची प्रेरणादायी चळवळ उभी राहत असून येथील राम भरोसा हॉटेलचे मालक शंकर रामचंद्र वाघमोडे यांनी विविध लोकहितकारी उपक्रम राबवून ग्रामस्थांची मने जिंकली आहेत. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी घेतलेल्या पुढाकाराचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

गेल्या सहा महिन्यांपासून वाघमोडे यांनी गावातील मूलभूत समस्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. पाणीटंचाईची समस्या सोडविण्यासाठी त्यांनी स्वतःच्या खर्चातून तब्बल ५५० फूट खोल बोअरवेल घेतली. पाणी उपलब्ध झाल्यानंतर टंचाईग्रस्त भागातील नागरिकांना नळयोजनेद्वारे नियमित पाणीपुरवठा सुरू करण्यात आला.



याशिवाय, विद्युत भारामुळे बंद पडलेल्या शेतकऱ्यांच्या डीपी (डिस्ट्रिब्युशन पॉइंट्स) बदलून देण्यासाठीही त्यांनी पुढाकार घेतला. त्यामुळे शेतीच्या कामांमध्ये येणारे अडथळे दूर होऊन अनेक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

गावातील वाढत्या व्यसनाधीनतेमुळे अनेक कुटुंबांवर होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन वाघमोडे यांनी विशेष व्यसनमुक्ती अभियान राबविले. त्यांनी स्वतःच्या खर्चातून सुमारे १०० तरुणांना व्यसनमुक्ती केंद्रात दाखल करून त्यांना नवजीवन मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

अधिक मासाच्या पवित्र कालावधीत गावातील महिलांना धार्मिक स्थळांचे दर्शन घडावे या उद्देशाने परळी वैजनाथ, गाणगापूर, अक्कलकोट आणि पंढरपूर येथे आरामदायी बसद्वारे दर्शन यात्रेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमालाही महिलांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मी या गावात लहानाचा मोठा झालो आहे. त्यामुळे माझ्या व्यवसायातून मिळणाऱ्या नफ्यापैकी २५ टक्के रक्कम गावाच्या विकासासाठी खर्च करणार आहे, असा संकल्प शंकर रामचंद्र वाघमोडे यांनी व्यक्त केला.

गाव व्यसनमुक्त करून सर्वांगीण विकास साधण्याचा त्यांचा निर्धार असून त्यांच्या सामाजिक कार्यामुळे ते ग्रामस्थांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत. महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्व ग्रामस्थांकडून त्यांच्या कार्याचे मनापासून कौतुक करण्यात येत आहे. भविष्यात इटकळ गावाला तालुक्यात एक वेगळी ओळख निर्माण करून देण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला.

## प्रधानमंत्री मातृत्व सन्मान योजनेअंतर्गत परंडा उपजिल्हा रुग्णालयात आरोग्य शिबिर संपन्न

### २५ गर्भवती मातांनी घेतला लाभ; तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन व मोफत तपासण्या

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१० जून -**

उपजिल्हा रुग्णालय परंडा येथे प्रधानमंत्री मातृत्व सन्मान योजना अंतर्गत आयोजित मासिक आरोग्य शिबिर उत्साहपूर्ण व जनहितकारी वातावरणात संपन्न झाले. दर महिन्याच्या ९ तारखेला नियमितपणे राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमातून गर्भवती माता भगिनींच्या सर्वांगीण आरोग्याची काळजी घेतली जाते.

या कार्यक्रमास वैद्यकीय अधीक्षक डॉ. जुबेर मोमीन (बालरोग तज्ज्ञ) यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांनी मातृआरोग्य, प्रसूतीपूर्व काळजी तसेच नवजात बालकांच्या आरोग्याविषयी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धनंजय चाकुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कार्यक्रमात डॉ. देवदत्त कुलकर्णी, डॉ. आनंद मोरे, डॉ. हाश्मी, डॉ. आकाश जाधवर आणि डॉ. बोराडे यांनी गर्भवती महिलांच्या नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व, सोनोग्राफी, रक्त तपासणी, पोषण आहार, लसीकरण तसेच प्रसूतीपूर्व आणि प्रसूतीनंतर घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहिती दिली.

तसेच डॉ. जुबेर मोमीन, डॉ. देवदत्त कुलकर्णी, डॉ. आनंद मोरे आणि वरिष्ठ परिचारिका थिटे सिस्टर यांनी प्रधानमंत्री मातृत्व सन्मान योजनेची उद्दिष्टे, लाभ, तपासण्यांचे वेळापत्रक आणि माता-बाल आरोग्य सुधारण्यासाठी शासनाच्या विविध उपक्रमांबाबत उपस्थित लाभार्थींना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास सह अधीक्षक पवार यांच्यासह रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, परिचारिका आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अमोल वाबुंरकर, सुलोचना केसकर, सवताडकर, कुठे, दूधकवडे तसेच इतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सक्रिय सहभाग नोंदविला.

परंडा परिसरातील सुमारे २५ गर्भवती माता भगिनींनी या शिबिरात सहभाग घेत आरोग्य तपासणी, रक्त तपासणी, सोनोग्राफी तसेच तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

शिबिरात सर्वांगीण आरोग्य तपासणी, रक्त तपासणी, सोनोग्राफी सुविधा, पोषण व आहार मार्गदर्शन, आवश्यकतेनुसार मोफत औषधोपचार तसेच समुपदेशन सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. माता व बाल आरोग्य



अधिक सक्षम करण्यासाठी अशा प्रकारचे उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत असून नियमित तपासण्या आणि जनजागृतीच्या माध्यमातून मातामृत्यू दर कमी करणे, सुदृढ बालक जन्मास प्रोत्साहन देणे आणि आरोग्यविषयक जागरूकता वाढविणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

वैद्यकीय अधिकारी, परिचारिका आणि कर्मचारी यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. भविष्यातही अशा आरोग्यविषयक उपक्रमांचे सातत्य राखून माता व बाल आरोग्य अधिक बळकट करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## रद्दी गोडाऊनला लागलेली आग २२ तासानी नियंत्रणात

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १० जून : एमआयडीसी रद्दी व भंगाराच्या गोडाऊनला सोमवारी भीषण आग लागली होती, या आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अग्निशमन दलाला तब्बल २२ तास लागले, यासाठी अग्निशमन दलाला १० अग्निशमन वाहने तसेच अडीच लाख लिटर पाणी लागले,

अग्निशमन दलाच्या जवानांनी दाखवलेल्या समय सूचकतेमुळे शेजारील हार्डवेअर आणि प्लास्टिक गोडाऊन पर्यंत आग पोहोचली नाही, त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. चालू वर्षात आगीच्या घटनेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे,

जानेवारी २६ ते आज पर्यंत ७ उद्योगांना आग लागली,२०२३ मध्ये ६,२०२४ मध्ये ८,२०२५ मध्ये११ उद्योगांना आग लागली होती



## विविध वृत्त...

### राजस्थानी सत्संग मंडळातर्फे विशाल जम्मा जागरण

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १० जून : राजस्थानी सत्संग मंडळाच्या वतीने लातुरात शनिवार दि. १३ जून रोजी बाबा रामदेव यांच्या विशाल जम्मा जागरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी जम्मा जागरणाचा हा कार्यक्रम झाल्यानंतर रविवारी

महाप्रसाद होणार आहे. यावर्षी हैद्राबादचे सुप्रसिद्ध भजन गायक सुशील गोपाल बजाज यांच्या भजनाचा कार्यक्रम शनिवारी रात्री ९ वाजता पडिले लॉन्स ग्राऊंड, साळाई मंगल कार्यालय, अंबाजोगाई रोड येथे होत आहे, तर महाप्रसादाचा कार्यक्रम रविवारी दुपारी १२.३० ते ४ या वेळेत होणार आहे. यावर्षीच्या जम्मा जागरण सोहळ्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे बाबा रामदेवजी यांचे १८ वे वंशज प्रेमसिंहजी तंवर यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने रविवारी १२ ते ३ या वेळेत रक्तदान शिबिराचे आयोजनही करण्यात आले आहे. या सोहळ्याचा लातूरच्या भाविकांनी लाभ घ्यावा.

### बियाण्यांसाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १० जून : खरीप हंगाम २०२६ साठी विविध शासकीय योजनांतर्गत प्रमाणित बियाणे वितरणाची प्रक्रिया सुरू झाली असून, लातूर विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक महेशकुमार तिर्थकर यांनी शेतकऱ्यांना 'महाडीबीटी' प्रणालीद्वारे त्वरित अर्ज करण्याचे आवाहन केले आहे. 'कडधान्य आत्मनिर्भरता अभियाना'अंतर्गत तूर, मूग आणि उडीद या पिकांसाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या योजनेतील तरतुदींनुसार पाच वर्षांच्या आतील वाणासाठी ६ हजार रुपये प्रति क्विंटल अनुदान, पाच ते दहा वर्षांच्या आतील वाणासाठी ३ हजार रुपये प्रति क्विंटल अनुदान दिले जाईल. सन २०२६ हे 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' म्हणून साजरे केले जात आहे. याची दखल घेत, या योजनेतील एकूण लाभार्थ्यांपैकी किमान ३० टक्के निवड महिला शेतकऱ्यांची केली जाणार आहे.

या योजनेसाठी शेतकऱ्यांनी 'ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी'चा वापर करून महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावा. लाभार्थी निवड 'प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर केली जाईल. योजनेच्या अधिक माहितीसाठी कृषी विभागाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच, आपल्या परिसरातील मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी किंवा उपकृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. अर्जदार शेतकऱ्यांना योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार असलेल्या सर्व अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक आहे. शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन कृषी विभागातर्फे करण्यात आले आहे.

# अनुदान पूर्ववत करा अथवा योजनाच बंद करा

तभा वृत्तसेवा / प्रमोद सुरवसे

लातूर दि. १० जून : उज्वला गॅस ही योजना२०१६ पासून सुरु झाली आणि हा गॅस मोफत मिळत होता, या गॅसकडे महिला वर्ग मोठ्या प्रमाणात आकर्षित झाला, मग सरकारने रॉके ला व्यवहारातून तडीपार केले




महिलांना त्या वेळी रॉकेल मिळत नसल्याचे दुःख कधी झाले नाही, कारण गॅस तर फुकट मिळत होता, शिवाय सबसिडी ही मिळत असल्यामुळे महिलांनी सरकारला धन्यवाद दिले, त्यावेळी वर्षाला१२ सिलेंडर मिळत असत, तेही अनुदानित म्हणजे सर्व सिलेंडरवर सबसिडी मिळत असत, त्यामुळे महिला वर्ग खुश होता, कालांतरानी सरकारने सबसिडी सिलेंडरची संख्या१२ वरून९ केली, तरी ही महिला वर्ग नाराज झाल्या चे दिसले नाही, पण आता आणखीन सबडिसी सिलेंडरच्या संख्येत कपात करून९ ऐवजी फक्त४ सिलेंडरवर सबसिडी दिली जाणार असल्या कारणांनी महिला वर्ग कमालचा नाराज झाल्याचे दिसत आहे, नाराज होणे अगदी स्वाभाविक आहे, कारण एकतर सबडिसी दिली जाणारी सिलेंडरची संख्या कमी केली आणि गॅसच्या किमती वाढविल्या, आज गॅस हजारच्या घरात गेला असल्याने सर्वसामान्य जनतेला तो परवडत नाही, मोलमजुरी करून किती कमवायचे आणि त्यात गॅस हजार रुपये कसे भरती करायचे तसेच स्वस्तात मिळणारे रॉकेल बंद केल्याने आम्ही करायचे कसे ? आपली उपजिवीका कशी भागवायची ? हा मुख्य प्रश्न आमच्या समोर असल्याचे बऱ्याच महिला वर्गानी सांगितले आहे, मुळात हे कटूसत्य नाकारून चालणार आहे का?

लोक सभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी म्हणाले की, उज्वला योजनेंतर्गत मनुरानित सिलेंडरची ९ वरून४ वर आणली, इतकेच नाही नर गेल्या तीन महिन्यांत घरगुती एलपीजी सिलेंडरच्या दरात८९ रूपयांची वाढ केली, याचा अर्थ आधी किंमत वाढवा, मग अनुदान कमी करा, आणि गरिबांच्या चुली विझवा, स्थलांतरीत मजुरांची जीवनरेखा असलेल्या५ किलोच्या सिलेंडरच्या दरात३२३ रुपयांची वाढ केली, ते काय कमावणार, काय खाणार आणि काय वाचवणार, अब्जाधीश मित्रांचे कोट्यवधी रुपयांचे कर्ज माफ करणे आणि स्वतः च्या अपयशाचे बिल गरिबांच्या माथी मारणे मोदींच्या लुटीचे मॉडेल आहे

खासरांचा पगार, आमदारांचा पगार ,त्यांना मिळणारे भत्ते, इतर सुविधा यावर करोडो रुपये खर्च होत असतात, हे सर्वश्रुत आहेच, त्यांच्यासाठी कमी दरात कॅंटिंग सुविधा मिळत असते तेही ए वन, म्हणून यांच्या सोयीसुविधा कमी करणे , पगारामध्ये कपात करणे, इतर मिळणाऱ्या सोई कमी कराव्यात आणि तो पैसा गोर गरिबांच्या हितासाठी वापरावा,

खासदार, आमदार यांच्या साठी जशी कमी दरात कॅंटिंग ची सुविधा असते, तशी सुविधा असलेली कॅंटिंग गरिबांसाठी खेडोपाडी सुरु करावी, म्हणजे खऱ्या अर्थानी गरिबांना न्याय मिळेल, .

या प्रकरणावरून एक गोष्ट लक्षात येते की, गरीब , गरीबच बनत असून श्रीमंत, श्रीमंत बनत चालला आहे, आजकाल कोणताही नेता, पुढारी किंवा मंत्री यांच्याकडे बघितले की नवल वाटते, कारण पाच वर्षात त्यांच्या अशा सुधारणा होतात की, त्यांना बघून तोंडात बोट घातले जाते तरीही सगळं मलाच पाहिजे ही त्यांची भावना कमी होत नाही, म्हणूनच तर आज गरिबांचा वाली कोणीच नाही असता तर देशात गरीब कोणीच राहिला नसता, हे कटू सत्य नाकारून चालेल का ? सरकार कोणाचेही असो, ते स्वतःच्या फायद्याचे प्रथम बघतात नंतर इतरांचे, म्हणूनच तर यांचे पगार वाढविण्याचे बिल येते तेव्हा कोणाचाही विरोध होत नाही, त्यावर तासंतास चर्चा होत नाही, तर काही मिनिटात बिल पास होते, झाले आहे, अशा वेळी ते सर्व जण एक असतात हे वेगळे सांगायला नको

आज महागाई प्रचंड वाढली आहे, प्रत्येक वस्तू महाग झाली असल्यामुळे सर्वसामान्यांना जगणे मुश्किल झाले आहे, सरकार मात्र मुग गिळून गप्प आहे, गरिबांच्या पगारात कधी वाढ होत नाही, झाली तर अल्प वाढ होते अन्यथा मोठमोठ्या घोषणा होताना दिसत असतात, म्हणूनच सरकारला कोणाचेही काही घेणेदेणे नसून आपली पोळी भाजण्यातच ते गुंग असतात म्हणूनच देशातील गरिबी नष्ट होत नाही तर बरचेवर वाढत जाणार किंबहुना ती येण तेण कारणांनी वाढवली जाणार मग गरिबांचा वाली कोणीच नाही असेच म्हणावे लागेल

गॅस चे विळणारे अनुदान पूर्ववत करा अथवा ही योजनाच बंद करा असे असंख्य महिलांचे म्हणणे आहे

## स्मशानभूमीच्या नोंदी घेण्याची मागणी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १० जून : लातूर तालुक्यातील मुरुड येथील चर्मकार व ढोर समाजाच्या स्मशानभूमीची महसूल अभिलेखात नोंद करून सदर जागा अधिकृतपणे समाजाच्या ताब्यात हस्तांतरित करण्याच्या मागणीसाठी निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे लातूर जिल्हाध्यक्ष रवि कुरिल यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. याप्रसंगी महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र साबळे, मुरूड शहर अध्यक्ष सुजित साबळे, अशोकराव जाधव सर, भिमराव वाघमारे, बिभिषण शेरखाने, मल्हारी साबळे, विष्णूदास साबळे, अतुल शेरखाने, परमेश्र्वर साबळे, पांडुरंग वाघमारे, श्रीधर साबळे, वैजेनाथ कांबळे, शुभम साबळे, रमाकांत कदम, पिंटू सातपुते यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते.

समाजाच्या अंत्यसंस्काराच्या ही जागा त्वरित अधिकृत करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. अन्यथा मुरुड येथील चर्मकार आणि ढोर समाजाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

## वन विभाग करणार ३ लाख वृक्ष लागवड

### नागरिकांना मिळणार सवलतीच्या दरात, २५ रोपवाटिकांतून ८ लाख रोपे तयार

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १० जून : वृक्षलागवड मोहिमेसाठी लातूरचा वन विभाग सज्ज झाला आहे. या विभागाकडून उन्हाळ्यातच जिल्ह्यातील विविध ठिकाणच्या २५ रोपवाटिकांमध्ये सुमारे ८ लाख वृक्ष रोपे तयार करण्यात आली आहेत. १५ जून ते सप्टेंबरअखेरपर्यंतच्या वन महोत्सवात वन क्षेत्रावर तब्बल ३ लाख वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे.



लातूर जिल्ह्यात अवघे दीड टक्के क्षेत्रावर वृक्षाच्छादन आहे. मागील दोन वर्षे चांगला पाऊस झाल्याने वन विभागाने साखरा, गातेगाव, मुरूड अशा वन विभागाच्या जागेवर मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड केली. साखरा येथील वन विभागात तर तब्बल ४५ हेक्टर माळरानावर ग्रामस्थांच्या मदतीने वृक्ष लागवड करण्यात आली. ते वृक्ष आज मोठे झाले आहेत. त्या माळरानावर आज नंदनवन फुलले आहे.

यावर्षी अलनिनो वादळामुळे कमी पावसाचे संकेत देण्यात आले असल्याने पाऊस किती होतो, यावर वृक्ष लागवडीला किती गती येते, हे ठरणार आहे. अद्यापपर्यंत तरी पावसाला सुरुवात झाली नाही. परंतु, मान्सून सुरू होताच लातूर जिल्ह्यात पाऊस

होण्याची शक्यता आहे. वन विभागाने यावर्षी जिल्ह्यातील तब्बल २५ रोप वाटिकांतून ८ लाख रोपे तयार केल आहेत. त्यातील अर्धी रोपे शासनाच्य वृक्ष लागवड मोहिमेसाठी मोफत देण्यात येणार आहेत.

उर्वरित रोपे ज्या नागरिकांना वृक्ष लागवड करायची आहे, अशा नागरिकांन सवलतीच्या दरात देण्यात येणार आहेत जिल्ह्यात वृक्षाच्छादन वाढविण्यासाठ जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनीह मनावर घेतले आहे. अधिकाऱ्यांच्या बैठक घेऊन वृक्षारोपणाच्या सूचना अधिकारी-कर्मचाऱ्यांसह शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना केल्या आहेत.

**कमी पाण्यावर येणारी वृक्षरोपे तयार**

वन विभागाने उन्हाळ्यातच २५ रोप वाटिकांमध्ये तब्बल ८ लाख रोपे तयार केली आहेत. त्यामध्ये अवर्षणप्रवण भागात येणाऱ्या वृक्षांचाच समावेश आहे. कमी पावसावरही ही झाडे तग धरावीत व ती जतन व्हावीत, यासाठी वन विभागाने आंबा, चिंच, वड, पिंपळ, कडूनिंब, आवळा, करंज, सीताफळ, रामफळ, जांभळ, रुद्राक्ष, माहगनी, हेळा, भेडा, बांबू अशा कमी पाण्यावर येणाऱ्या वृक्षांची रोपे तयार केली आहेत.

## प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाला १० वर्षे पूर्ण; विशेष आरोग्य शिबिरांमध्ये ३४५८ गरोदर मातांची तपासणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १० जून : भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाद्वारे राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाला ९ जून २०२६ रोजी १० वर्षे पूर्ण झाली. ९ जून २०१६ रोजी सुरू झालेल्या या अभियानांतर्गत दर महिन्याच्या ९, १८ आणि २७ तारखेला गर्भवती महिलांना मोफत, सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण प्रसूतीपूर्व आरोग्य सेवा पुरविल्या जातात. गेल्या दहा वर्षांत उच्च जोखीम गर्भधारणा असलेल्या महिलांची लवकर ओळख, योग्य व्यवस्थापन आणि संदर्भ सेवा बळकट करण्यात या अभियानाने मोलाची भूमिका बजावली आहे. या महत्वपूर्ण टप्प्याचे औचित्य साधून देशभर 'पीएमएसएमए'ची १० वर्षः सुरक्षित गर्भधारणा, निरोगी माता, सक्षम भारत या संकल्पनेअंतर्गत विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.



या विशेष दिना निमित्त लातूर परिमंडळाच्या आरोग्य उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड यांनी जवळा बु. (ता. लातूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन तेथील आरोग्य शिबिराचा आढावा घेतला. या शिबिरात एकूण ५२ गरोदर मातांची तपासणी करण्यात आली, तर १२ अतिजोखमीच्या मातांना विशेष सेवा व संदर्भ सेवा पुरविण्यात आल्या. यावेळी डॉ. रेखा गायकवाड यांनी उपस्थित मातांना आहार, विश्रांती आणि गरोदरपणातील धोक्याच्या लक्षणांबाबत मार्गदर्शन केले.

विशेष शिबिराच्या दिवशी ग्रामीण भागातील एकूण ३ हजार ४५८ गरोदर मातांना उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर आरोग्य सेवा देण्यात आल्या. यामध्ये ६५५ अतिजोखमीच्या मातांना विशेष उपचार व आवश्यकतेनुसार संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमावेळी प्रभारी सहायक संचालक (वैद्यकीय) डॉ. प्रीती बादाडे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी बरुरे, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. नितीन बोडके, वैद्यकीय अधिकारी डॉ. भताने, डॉ. तोंडारे, सी.पी.एम. पवन वाडेकर, संदीप यादव यांच्यासह आरोग्य केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.

## शाळांकडून शैक्षणिक साहित्य विक्री थांबवा

### लातूर व्यापारी महासंघाची शिक्षण विभागाकडे मागणी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १० जून : लातूर जिल्ह्यातील काही शैक्षणिक संस्थांकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी सक्ती केली जात असल्याचा गंभीर आरोप करत लातूर व्यापारी महासंघाने जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे निवेदन सादर केले आहे. या प्रकाराची तातडीने दखल घेऊन संबंधित शाळांवर कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही महासंघाने दिला आहे.

लातूर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष यांच्या स्वाक्षरीने जिल्हा परिषदेचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, जिल्ह्यातील काही मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये ज्युनिअर केजी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य थेट शाळेमार्फत विक्री केले जात आहे. वह्या, पुस्तके, गणवेश, स्टेशनरी शाळेवाले/संस्थाचालक

तसेच इतर शैक्षणिक साहित्य विशिष्ट ठिकाणाहूनच खरेदी करण्याची सक्ती केली जाते. काही ठिकाणी विशिष्ट प्रकाशकांची पुस्तके किंवा विशिष्ट कंपनीचे साहित्य खरेदी करण्यासाठी पालकांवर दबाव टाकला जात आहे. परिणामी पालकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

शिक्षण देण्याचे काम करणाऱ्या संस्थांनी व्यवसायाचे स्वरूप धारण करणे योग्य नसून, यामुळे स्थानिक व्यापाऱ्यांवर अन्याय होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या निवेदनावर लातूर शहरातील व्यापारी रामेश्र्वर भराडीया, गोकुळ जैन, साहिल कुलकर्णी, मनोज इंदुरे, गणेश काकडे, कीर्ती जीएम स्टोअर्स, मानसी पुस्तकालय, बालाजी ट्रेडर्स, शिवम ट्रेडर्स, नेहा स्टेशनरी शॉपी, वरवटे सुधीर, शेख सत्तार, मारुती रतन पवार, श्री गणेश, श्री समर्थ बुक सेल्स, पियुष कचोरिया, भारतीय पुस्तकालय, सुपर शॉपी एजन्सी, यश बुक स्टॉल, शिवसागर जनरल, शिवकृष्णा डिपार्टमेंटल, सिद्धेश्र्वर पांचाळ, वैभव ढोले, रज्जाक शेख आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## भाजपा शहराच्यावतीने केशवराज मंदिर परिसरात स्वच्छता करून जागतिक पर्यावरण दिन साजरा



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १० जून : भाजपा शहर जिल्ह्याच्यवतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त लातूरमधील स्वयंभू श्रीकेशवराज मंदिर, रामगल्ली तसेच रामलिंगेश्र्वर मंदिर परिसर येथे विश्र्वास, विकास व जनकल्याण अभियानांतर्गत विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

यामध्ये भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या नेतृत्वाखाली देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या यशस्वी बारा वर्षांच्या कार्यपूर्तीनिमित्त स्वच्छता हीच सेवा हा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी मंदिर परिसराची स्वच्छता करून समाजात स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

नरेंद्रजी मोदी यांनी सुरू केलेल्या स्वच्छ भारत अभियानाने देशात स्वच्छतेविषयी जनजागृती निर्माण केली असून भारताला स्वच्छ, सुंदर आणि संस्कारित राष्ट्र बनवण्याचा संकल्प प्रत्येक भारतीयामध्ये जागृत केला आहे. मंदिर हे केवळ श्रद्धेचे केंद्र नसून आपल्या सनातन संस्कृतीचे, अध्यात्माचे आणि हिंदुत्वाच्या विचारांचे जिवंत प्रतीक आहेत. त्यामुळे मंदिर परिसराची स्वच्छता म्हणजे केवळ साफसफाई नसून ती आपल्या संस्कारांची आणि श्रद्धेची सेवा आहे.

भगवान श्री महाविष्णू यांच्या दशावतारांचे दर्शन घडविणारे स्वयंभू श्रीकेशवराज मंदिर तसेच भक्ती आणि अध्यात्माचा वारसा जपणारे रामलिंगेश्र्वर मंदिर परिसर स्वच्छतेच्या माध्यमातून अधिक पवित्र आणि प्रेरणादायी बनविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## आयएमएच्या शहर स्वच्छता उपक्रमास चंद्रनगरातून सुरुवात




तभा वृत्तसेवा

लातूर दि. १० जून : लातूर शहर हरीत स्वच्छ व पयार्वरणाणुकुल करण्याचा संकल्प आयएमएच्या लातूर शाखेने केला असून या विधायक उपक्रमास त्यांनी सुरुवातही केली आहे. शहर स्वच्छतेचे वर्षभराचे नियोजन करण्यात आले असून त्याची सुरुवात मंगळवार दि. ९ जून रोजी येथील चंद्रनगर येथून परिसर स्वच्छतेने करण्यात आली. या सेवाकार्यात डॉक्टर्स, मनपा कर्मचारी तसेच त्या परिसरातील नागरीक सहभागी झाले होते.

चंद्रनगर येथील वर्धमान उद्यानात स्वच्छता करण्यात आली. पालापाचोळा, प्लास्टिक संकलीत करण्यात आले. उद्यानातील झाडांना आळे करण्यात आले. २ ट्रॅक्टर कचरा संकलीत करण्यात आला. यात कॅरीबॅग्जही असल्याने डॉक्टरांनी तेथील नागरीकांना प्लास्टिकचा

कॅरीबॅग्जचा वापर करु नका कापडी पिशव्या वापरा असे आवाहन केले. त्यानंतर डॉक्टरांनी त्या परिसरातील रसत्यांची स्वच्छता केली. दरम्यान आयएमएचे हे स्वच्छता अभियान वर्षभर सुरू राहणार आहे.

दर महीन्याच्या ९, १९ व २९ तारखेला ही स्वच्छता होणार आहे. यासाठीचे वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. स्वच्छता श्रमदानाच्या तारखेची पूर्वकल्पना त्या भागातील नागरीकांना देण्यात येणार असून त्यांनाही या उपक्रमात

उडए-छ ड-ढणठ-कए-डढक्ध ड-ढणठ

सहभागी करुन घेतले जाणार आहे. शहर स्वच्छतेत लोकसहभाग वाढावा व हे अभियान लोकचळवळ व्हावी, असा आएमएमएचा मानस असून त्यासाठी आम्ही प्रयत्नशिल राहणार असल्याचे लातूर आयएमएचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत व सचिव डॉ. विश्रांत भारती यांनी सांगितले.

लातूर महापालिका आयुक्त मानसी मीना, उपायुक्त वसुधा फड व त्याच्या टिमचे या कामी सहकार्य लाभत असल्याचे ते म्हणाले. चंद्रनगर येथील स्वच्छता कामात डॉ. हर्षवर्धन राऊत, डॉ. विश्रांत भारती, डॉ. श्र्वेता पवार, डॉ. वर्षा दराडे, डॉ. आकांक्षा अवस्थी, डॉ. शुभांगी राऊत, डॉ. वेदांत अवस्थी, डॉ. गणेश पवार, डॉ. सुबोध सोमाणी, डॉ. शैला सोमाणी, डॉ. आंनद कलमे, जयप्रकाश चितकोटे, सुनीता चितकोटे, अजय शहा, संजय बोरा, सुमन कलंत्री, आशिष कलंत्री, सुभाष दुर्गवाड यांच्यासह त्या परिसरातील नागरीक व महानगरपालिकेचे सफाई कर्मचारी सहभागी झाले होते.